# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२६-२०२७

## सामान्य प्रशासन विभाग

# सामान्य प्रशासन विभाग खुद्द

## अनुक्रमणिका


| कार्यक्रमाचा क्रमांक | कार्यक्रमाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **विवरणपत्र "अ"** | १ |
| १ | राज्यपाल, सचिव व राज्यपाल परिवार प्रबंधक यांचे कार्यालय | ७ |
| २ | मंत्रिपरिषद | १५ |
| ३ | निवडणुका | १९ |
| ४ | सचिवालय सर्वसाधारण सेवा | |
| | (१) मागासवर्ग कक्ष | २४ |
| | (२) मंत्र्यांचा स्वीय कर्मचारीवृंद | २४ |
| | (३) मंत्रीपरिषद | २४ |
| | (४) राजशिष्टाचार | २४ |
| | (५) शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे | २५ |
| | (६) ठेव संलग्न विमा योजना | २५ |
| | (७) निवासी आयुक्तांच्या कार्यालयाचे कार्य | २६ |
| | (८) प्रशिक्षण व परीक्षा | २७ |
| | (९) सामाजिक विकास समन्वय कक्ष | २७ |
| | (१०) मा. मुख्यमंत्री महोदयांसमवेत आमदार/खासदारांच्या बैठका | २७ |
| ५ | लोकसेवा आयोग | |
| | (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोग | ४३ |
| ६ | इतर कार्यालये | |
| | (१) लोकआयुक्त व उप-लोकआयुक्त यांचे कार्यालय | ५० |
| | (२) नागरिक संरक्षण समिती (महाराष्ट्र) | ५० |
| | (३) जनगणना | ५१ |
| | (४) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे | ५१ |
| | (५) मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद | ५१ |
| | (६) डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती | ५२ |
| | (७) राज्य प्रशिक्षण धोरण | ५२ |
| | (८) महाराष्ट्र धोरण संशोधन संस्था | ५४ |
| | (९) एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम | ५४ |
| | (१०) भारतीय प्रशासकीय सेवेकरिता निवडलेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण | ५५ |
| | (११) मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी | ५५ |
| | (१२) राज्य निवडणूक आयोग | ५५ |
| | (१३) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण | ५५ |
| | (१४) राज्य माहिती आयोग | ५५ |
| | (१५) राज्य सेवा हक्क आयोग | ५७ |

| कार्यक्रमाचा क्रमांक | कार्यक्रमाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ७ | निवास व्यवस्था नियंत्रक | ६८ |
| ८ | संकीर्ण सर्वसाधारण सेवा | |
| | ( १ ) उपाहारगृह योजना | ७३ |
| | ( २ ) स्वातंत्र्य सैनिकांना निवृत्तिवेतन | ७३ |
| | ( ३ ) हुतात्मा स्मारके | ७४ |
| | ( ४ ) मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव | ७५ |
| | ( ५ ) आणीबाणीच्या कालावधीमध्ये कारावास भोगलेल्या व्यक्तींना मानधन योजना | ७५ |
| | ( ६ ) महाराष्ट्र -कर्नाटक सीमा आंदोलनातील हुतात्म्यांच्या कुटुंबियांना निवृत्तिवेतन | ७६ |
| ९ | इतर कार्यक्रम | |
| | ( १ ) सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे | ८३ |
| | ( २ ) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये | ८३ |
| | ( ३ ) छात्रपूर्व प्रशिक्षण योजना | ८३ |
| | ( ४ ) सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छ. संभाजीनगर | ८३ |
| | ( ५ ) क्वीन मेरी तंत्रशाळेस सहायक अनुदान | ८४ |
| | ( ६ ) दुसऱ्या महायुद्धातील माजी सैनिकांना आथिर्क मदत | ८५ |
| | ( ७ ) धारातीर्थी पडलेल्या शहीद जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत | ८५ |
| | ( ८ ) महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना | ८५ |
| | ( ९ ) पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर, खडकी, पुणे या चॅरीटेबल संस्थेस सहाय्यक अनुदान | ८५ |
| | ( १० ) सैन्य भरती मेळाव्यावरील खर्च | ८६ |
| | ( ११ ) मुलींची सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था नाशिक | ८६ |
| १० | परिवहन व प्रशिक्षण | |
| | ( १ ) शासकीय परिवहन सेवा | १०१ |
| | ( २ ) विमान चालन संचालनालय | १०१ |
| | ( ३ ) नागपूर उड्डाण क्लब, नागपूर | १०१ |
| | ( ४ ) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी | १०१ |
| ११ | ( १ ) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय | १०८ |
| | ( २ ) राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग | ११२ |
| १२ | माहीती व जनसंपर्क महासंचालनालय | ११५ |

# सामान्य प्रशासन विभाग
# मुख्यमंत्री / राज्यमंत्री / मुख्य सचिव विभागांच्या सचिवांकडील कार्यभाराचे विषयनिहाय विवरणपत्र

**सर्वसाधारण**

**सामान्य प्रशासन**

**मुख्यमंत्री / राज्यमंत्री/**

**विभागाच्या सचिवांकडील कार्यभाराचे**

| अपर मुख्य सचिव (सेवा) (१) | अपर मुख्य सचिव विशेष चौकशी अधिकारी (१) (२) | सचिव (राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि संपर्क) (३) | सचिव (सामाजिक विकास समन्वय) तथा विशेष चौकशी अधिकारी-२ (४) |
|---|---|---|---|
| १. म.लो. आयोग, अनुकंपा नेमणूक इ. | १. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी (सादरकर्ता अधिकारी) | १. राज्यपाल सचिव / परिवार प्रबंधक आस्थापना | १. सामाजिक विकास समन्वय |
| २. आस्थापना मंडळे, गोपनीय अहवाल इ. | २. जनगणना, विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या संविधानाशी संबंधित कामकाजाचे समन्वयन | २. राजशिष्टाचार /अतिमहत्त्वाच्या व्यक्ती | २. आरक्षण व सवलती / समांतर आरक्षण |
| ३. विभागीय परीक्षा | | ३. शासकीय परिवहन सेवा | ३. मागासवर्गीय आरक्षण |
| ४. सेवा बाबी | ३. स्वा. सैनिक सर्व बाबी | ४. अतिथीगृहे महाराष्ट्र सदन | ४. राज्य सेवा अधिकारी विभागीय चौकशी |
| ५. भारतीय प्रशासन सेवाविषयक बाबी/ भारतीय प्रशासन सेवा चौकशी/ न्यायालयीन प्रकरणे | ४. माजी सैनिक कल्याण योजना. | ५. राज्य निवडणूक आयोग आस्थापना | ५. महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परीक्षण अधिनियम |
| | | ६. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आस्थापना | ६. शासकीय कर्मचारी संघटना मान्यता |
| ६. विभागीय चौकशी | | | |
| ७. चौकशी अधिकारी आस्थापना, भ्रष्टाचार निर्मूलन, अण्णा हजारे यांच्या तक्रारीवरील कार्यवाही, श्वेतपत्रिका, दक्षता आयोग | | ७. मंत्री स्वीय कर्मचारी वृंद आस्थापना / गृह व्यवस्थापन / मंत्री आस्थापना / रोख शाखा | |
| | | ८. कार्यालयीन जागा व दूरध्वनी | |
| ८. भविष्यनिर्वाह निधी | | ९. निवास व्यवस्था नियंत्रक | |
| ९. पुनर्विलोकन, लोक आयुक्त | | १०. साप्रवि अर्थसंकल्प मुख्यमंत्री धर्मादाय निधी | |
| १०. मंत्रालयीन सेवा वर्ग-अ, ब, क, ड यांचे संवर्गनिहाय नियंत्रण | | ११. मंत्रालय उपाहारगृहे | |
| | | १२. शासकीय निवासस्थाने | |
| ११. सा.प्र.वि. आस्थापनाविषयक बाबी | | | |
| १२. प्रशिक्षण धोरण व समन्वय | | | |

**प्रस्तावना**

**विभाग**

**मुख्य सचिव**

**विभागनिहाय विवरणपत्र**

| प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी (५) | अपर मुख्य सचिव (प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन) (६) | प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) (७) | प्रधान सचिव माहिती व जनसंपर्क (८) | अपर मुख्य सचिव (विशेष प्रकल्प) (९) |
|---|---|---|---|---|
| १. निवडणूक | १. प्रशासकीय सुधारणा / रचना व कार्यपद्धती / लोकशाही दिन | १. माहिती व तंत्रज्ञान | १. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | विशेष प्रकल्प (सुवर्ण त्रिकोण) |
| | २. विधानमंडळ कामकाज समन्वय | २. कार्याभ्यास पथक | | |
| | ३. सार्वजनिक सुट्ट्या पुतळेविषयक धोरण, जयंती, पुण्यतिथी इ. | ३. विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष | | |
| | | ४. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग | | |
| | ४. युद्ध पुस्तक हाताळणे | | | |
| | ५. सीमा प्रश्न | | | |
| | ६. माहितीचा अधिकार, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम | | | |
| | ७. कार्यासनांना नेमून दिलेल्या विषयाव्यतिरिक्त अन्य संकीर्ण विषय | | | |
| | ८. न्यायालयीन नोटिसा / याचिका समन्वय | | | |
| | ९. चौकशी आयोग | | | |

# विवरणपत्र 'अ' /STATEMENT 'A'
## कार्यक्रम अंदाजपत्रकामधील अर्थसंकल्पासंबंधित तक्ते (वित्तीय अधिकारी) [1(vii-ix)]

(रुपये हजारांत / Rs. in thousands)

| अ. क्र. | अ) कार्याचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actual Expenditure 2024-2025 | | | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | | | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | | | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | | | Name of the Programme |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महसूल Revenue | भांडवली Capital | एकूण Total | महसूल Revenue | भांडवली Capital | एकूण Total | महसूल Revenue | भांडवली Capital | एकूण Total | महसूल Revenue | भांडवली Capital | एकूण Total | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) | (14) | (15) |
| १. | राष्ट्रपती/उप राष्ट्रपती/ राज्यपाल संघराज्य क्षेत्राचे प्रशासक | 298364 | 0 | 298364 | 442155 | 0 | 442155 | 442155 | 0 | 442155 | 461408 | 0 | 461408 | 1. President/Vice-President / Governor / Administrators of Union Territories. |
| २. | मंत्रिपरिषद | 252220 | 0 | 252220 | 436326 | 0 | 436326 | 406253 | 0 | 406253 | 451469 | 0 | 451469 | 2. Council of Ministers |
| ३. | निवडणुका | 34459546 | 0 | 34459546 | 16835017 | 0 | 16835017 | 11130525 | 0 | 11130525 | 7934361 | 0 | 7934361 | 3. Elections |
| ४. | सचिवालय सर्वसाधारण सेवा | 6725754 | 0 | 6725754 | 13384181 | 0 | 13384181 | 9877715 | 0 | 9877715 | 17686140 | 0 | 17686140 | 4. Secretariate General Services |
| ५. | लोकसेवा आयोग | 915586 | 0 | 915586 | 1266250 | 0 | 1266250 | 1221725 | 0 | 1221725 | 1312127 | 0 | 1312127 | 5. Public Service Commission |
| ६. | इतर कार्यालये | 202246 | 0 | 202246 | 437184 | 0 | 437184 | 437407 | 0 | 437407 | 811096 | 0 | 811096 | 6. Other Offices |
| ७. | निवास व्यवस्था नियंत्रक | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 7 | 7 | 0 | 7 | 7 | 0 | 7 | 7. Housing |
| ८. | संकीर्ण सर्वसाधारण सेवा | 197209 | 0 | 197209 | 318955 | 0 | 318955 | 223358 | 0 | 223358 | 307548 | 0 | 307548 | 8. Miscellaneous General Services |
| ९. | इतर कार्यक्रम | 335021 | 0 | 335021 | 1471197 | 0 | 1471197 | 1097362 | 0 | 1097362 | 849051 | 0 | 849051 | 9. Other Programmes |
| १०. | परिवहन व प्रशिक्षण | 1455156 | 876956 | 2332112 | 1648152 | 2540006 | 4188158 | 2863591 | 1628006 | 4491597 | 3243286 | 1168305 | 4411591 | 10. Transport and Training |
| ११. | माहिती व प्रसिद्धी | 3753114 | | 3753114 | 6440516 | 0 | 6440516 | 4946774 | | 4946774 | 6811029 | | 6811029 | 11. Information and Public Relations |
| | **एकूण** | 48594216 | 876956 | 49471172 | 42679940 | 2540006 | 45219946 | 32646872 | 1628006 | 34274878 | 39867522 | 1168305 | 41035827 | **Gross Total** |

# कार्यक्रम क्रमांक १ ते ११
# Programmes 1 to 11

## कार्यक्रम क्रमांक १

## महाराष्ट्राचे राज्यपालांचे सचिव व राज्यपालांचे परिवार प्रबंधक यांचे कार्यालय (२०१२)

## राजभवन, मुंबई ४०००३५

मा. राज्यपाल हे मा. राष्ट्रपतीचे व पर्यायाने केंद्र सरकारचे राज्यातील प्रतिनिधी असतात. राज्याचे प्रमुख या नात्याने मा. राज्यपालांना कार्यकारी, कायदेविषयक व न्यायविषयक अधिकार बहाल केले आहेत. याशिवाय मा. राज्यपालांना स्वेच्छाधिकार देखील आहेत. त्यानुसार न्यायालयाने अपराधी ठरविलेल्या व्यक्तींना माफी करणे, अथवा त्यांना देण्यात आलेली शिक्षा कमी करणे किंवा ती सौम्य करणे असे अधिकार त्यांना आहेत. विधानसभेत बहुमत प्राप्त झालेल्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या प्रतिनिधीला सरकार स्थापनेसाठी निमंत्रित करणे तसेच नियुक्त केलेल्या मुख्यमंत्र्यांना विधानसभेच्या पटलावर बहुमत आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी मा. राज्यपालांची आहे. मा. मुख्यमंत्री तसेच मंत्री परिषदेच्या सल्ल्याने विधान मंडळाचे सत्र बोलाविणे व संस्थगित करणे किंवा विधानसभा बरखास्त करणे हे देखील मा. राज्यपालांच्या अधिकार कक्षेत येते. मा. राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नेमणूक करतात व मा. मुख्यमंत्री यांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्यांची नियुक्ती करतात. मा. राज्यपालांची मर्जी असेपर्यंत ते पद धारण करतात. विधीमंडळाचे अधिवेशन चालू नसताना वटहुकूम काढण्याचे अधिकार मा. राज्यपालांना आहेत. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती या नात्याने मा. राज्यपालांना राज्याच्या उच्च शिक्षण प्रक्रियेमध्ये विशेषतः विद्यापीठांचे कुलगुरु यांच्या निवड प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका आहे. तसेच मा. राष्ट्रपतींनी प्राधिकृत केल्यानुसार वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याचे अधिकारही मा. राज्यपालांना आहेत तद्नुसार १९९४ पासून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यात आली आहेत.

२. मा. राज्यपालांचे आस्थापनेचे दोन कार्यालय आहेत. (१) राज्यपालांचे सचिव कार्यालय व (२) राज्यपालांचे परिवार प्रबंधक कार्यालय, मा. राज्यपालांचे सचिव हे दोन्ही कार्यालयाचे विभागप्रमुख आहेत या नात्याने असलेली विविध कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. मा. राज्यपालांचे संविधानातील तरतुदीनुसार विधीमंडळविषयक, उच्च न्यायालयासंबंधी, लोकसेवा आयोगासंबंधीची कार्य, मुख्य न्यायाधीश व मंत्रीमंडळ यांचा शपथविधी व शपथविधीसंबंधात कामकाज, विद्यापीठ विषयक कामकाज, आदिवासी कक्ष, वैधानिक विकास मंडळे कामकाज शासनाकडून येणाऱ्या मा. राज्यपालांच्या मान्यतेसाठी येणाऱ्या विविध अध्यादेश, बिले, इतर धोरणात्मक नस्ती यासंबंधीचे कामकाज, सेवा प्रवेश नियम नस्ती विषयक कामकाज, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये सेवाविषयक अपील कामकाज आणि खाजगी संस्था व नागरिक यांच्याशी होणारा पत्रव्यवहार मा. राज्यपालांचे सचिव कार्यालयाकडून हाताळला जातो.

३. राज्यपालांचे परिवार प्रबंधक कार्यालयाचे मुख्य कार्य म्हणजे मुंबई, पुणे, नागपूर व महाबळेश्वर येथील राजभवन वास्तुची देखभाल व निगा ठेवणे, वने व उपवनांची देखभाल करून ती अद्ययावत व सुशोभित ठेवणे, राजभवनामध्ये वास्तवात असलेल्या राज्य, आंतर्देशीय व विदेशी अतिमहत्त्वाच्या व्यक्ती व केंद्रीय मंत्री इत्यादींच्या वास्तव्याची व्यवस्था करणे. शिवाय विदेशी राष्ट्रप्रमुख, सरकार प्रमुख यांचे सन्मानार्थ आयोजित लागणाऱ्या मेजवान्या तसेच, स्वातंत्र्य दिन, गणतंत्र दिन या राष्ट्रीय सणांच्या प्रसंगी आयोजित करावयाचे स्वागत समारंभ व राजभवनात पार पडणाऱ्या इतर शासकीय, निमशासकीय व सांस्कृतिक कार्यक्रमांची व्यवस्था करण्याचे काम हे कार्यालय करते व मा. राज्यपालांचे दौरे आखणे तसेच राजभवन आस्थापना सुव्यवस्थितरित्या चालविण्याकरिता करावी लागणारी सर्व प्रकारची कामे व राज्यपालांचे (भत्ते व विशेषाधिकार) नियम, १९८७ नुसार सर्व लेखा शीर्षाखालील मंजूर खर्चावर नियंत्रण ठेवणे ही जबाबदारी या कार्यालयास पार पाडावी लागते.

४. राज्यपालांचे (भत्ते व विशेषाधिकार) नियम, १९८७ नुसार राज्यपालांचे वेतन, त्यांचे कुटुंबीय व त्यांच्या आस्थापनेवर होणाऱ्या विहित करण्यात आलेले आहेत.

# तक्ता-एक
# TABLE-I
## (१) वित्तीय आवश्यकता
## (i) Financial Requirements

**तक्ता क्र. १**

**(१) वित्तीय आवश्यकता**

## (i) Financial Requirement

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | | A— Activity Classification |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यपालांचे सचिवालय | 60914 | 137163 | 137163 | 145595 | (1) | Secretariat of the Governor. |
| २ | राज्यपालांचे वित्तलब्धी भत्ते | 4200 | 4200 | 4200 | 4200 | (2) | Emoluments and allowances of the Governor. |
| ३ | राज्यपालांनी दिलेली स्वेच्छा अनुदाने | 50000 | 50000 | 50000 | 50000 | (3) | Discretionary Grants of the Governor. |
| ४ | राज्यपालांची परिवार आस्थापना | 173204 | 235177 | 235177 | 244316 | (4) | Household Establishment of the Governor. |
| ५ | राज्यपालांचा करमणूक खर्च | 4630 | 7000 | 7000 | 7700 | (5) | Entertainment Expenditure of the Governor. |
| ६ | राज्यपालांचा ठराविक भत्त्यातील खर्च | 4054 | 5815 | 5815 | 6597 | (6) | Expenditure from Contract Allowance of the Governor. |
| ७ | राज्यपालांचा व त्यांच्या आस्थापनेचा दौराविषयक खर्च | 1362 | 2800 | 2800 | 3000 | (7) | Tour Expenses of the Governor and his Establishment. |
| | **एकूण (अ)** | **298364** | **442155** | **442155** | **461408** | ... | **Total (A)** |
| | (ब) वित्तीय व्यवस्थेतील साधने— | | | | | | (B) Source of Finance |
| | मागणी क्र. प्रधानशीर्ष | | | | | | Demand No. Major Head |
| | ए-१ २०१२ | 298364 | 442155 | 442155 | 461408 | | A— 1 2012 |
| | **एकूण (ब) . .** | **298364** | **442155** | **442155** | **461408** | ... | **Total (B)** |

## (३) कर्मचारी वर्गाचा सारांश

## (iii) Personnel Summary

### महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या सचिवांचे कार्यालय
### Establishment of the Secretary to the Governor of Maharashtra

**तक्ता २ / Table 2**

| अनु. क्रमांक Sr. No. | पदनाम | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर Pay level in Revised Pay matrix | पदांची संख्या/ No. of Post 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|
| | **राजपत्रित - गट - अ** | | | *Gazetted— Group A* |
| १ | राज्यपालांचे सचिव | संवर्ग पद | 1 | Secretary to the Governor |
| २ | राज्यपालांचे उप-सचिव (वै.वि.मं.) | संवर्ग पद | 1 | Deputy Secretary to the |
| ३ | उप सचिव (शिक्षण) | S-25-78800-208200 | 1 | Dy. Secretary (Education) |
| ४ | अवर सचिव | S-23-67700-208700 | 2 | Under Secretary |
| ५ | राज्यपालांचे खासगी सचिव (1 व 2) | S-23-67700-208700 | 2 | Private Secretary to the Governor |
| ६ | मानववंशशास्त्रज्ञ (आदिवासी कक्ष) | S-23-67700-208700 | 1 | Anthropologist (Tribal Cell) |
| ७ | विधि अधिकारी (आदिवासी कक्ष) | S-23-67700-208700 | 1 | Law Officer (Tribal Cell) |
| ८ | विशेष कार्यकारी अधिकारी | S-23-67700-208700 | 1 | Officer on Special Duty |
| ९ | संशोधन अधिकारी (वै.वि.म) (तात्पुरत्या स्वरूपात सहसंचालक गट-अ पदावर श्रेणी उन्नत) | S-25-78800-208200 | 1 | Research Officer (Statutory Development Board) Joint Director Temporary |
| | | **एकूण (राजपत्रित गट-अ)** | **11** | **Total—(Group A)** |
| | **राजपत्रित - गट - ब** | | | *Gazetted— Group B* |
| १ | लेखा अधिकारी (म.वि.व ले. संवर्ग) | S-16-44900-142400 | 1 | Accounts Officer (M.F.A.S. Cadre) |
| २ | लघुलेखक (निवडश्रेणी) | S-17-47600-151100 | 1 | Stenographer (Selection Grade) |
| ३ | कक्ष अधिकारी | S-17-47600-151100 | 5 | Section Officer |
| ४ | सहायक लेखाधिकारी (वै.वि.म.) (म.वि.व.ले.संवर्ग) | S-15-41800-132300 | 1 | Assistant Account Officer (M.F.A.S. Cadre) (Statutory Development Board) |
| | | **एकूण (राजपत्रित गट-ब)** | **08** | **Total—(Group B)** |
| | **अराजपत्रित - गट - ब** | | | *Non-Gazetted, Group B* |
| १ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | S-16-44900-142400 | 1 | Stenographer (Higher Grade) |
| २ | लघुलेखक (उच्च श्रेणी) (वै.वि.म.) | S-16-44900-142400 | 1 | Stenographer (Higher Grade) |
| ३ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | S-15-41800-132300 | 1 | Stenographer (Lower Grade) |
| ४ | सहायक कक्ष अधिकारी | S-14-38600-122800 | 14 | Assistant Section Officer |
| ५ | सहायक कक्ष अधिकारी (वै.वि.म) | S-14-38600-122800 | 1 | Assistant Section Officer (Statutory Development Board) |
| ६ | सहायक कक्ष अधिकारी* (अधीसंख्य) | S-14-38600-122800 | 1 | Assistant Section Officer*(Supernumrary) |
| | | **एकूण (अराजपत्रित गट-ब)** | **19** | **Total— (NGO Group-B)** |

| अनु. क्रमांक Sr. No. | पदनाम | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर Pay level in Revised Pay matrix | पदांची संख्या/ No. of Post 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|
| | **अराजपत्रित गट – क** | | | *Non-Gazetted, Group-C* |
| १ | लघुटंकलेखक | S-08-25500-81100 | 1 | Steno-Typist |
| २ | दूरध्वनी चालक | S-07-21700-69100 | 5 | Telephone Operator |
| ३ | लिपिक-टंकलेखक | S-06-19900-63200 | 14 | Clerk-Typists |
| ४ | लिपिक-टंकलेखक (वै.वि.मं.) | S-06-19900-63200 | 1 | Clerk-Typist (Statutory Development Board) |
| ५ | वाहन चालक | S-06-19900-63200 | 2 | Driver |
| ६ | वाहन चालक (वै.वि.म.) | S-06-19900-63200 | 1 | Driver (Statutory Development Board) |
| | | **एकूण (गट-क)** | **24** | **Total— (Group C)** |
| | **अराजपत्रित गट –ड** | | | *Non-Gazetted, Group - D* |
| १ | जमादार | S-06-19900-63200 | 2 | Jamadar |
| २ | हवालदार | S-03-16600-52400 | 5 | Havaldar |
| ३ | बहुउद्देशिय शिपाई | S-01-15000-47600 | 24 | Multitasking Peon |
| ४ | बहुउद्देशिय शिपाई (वै.वि.म) | S-01-15000-47600 | 2 | Multitasking Peon (Statutory Development Board) |
| | एकूण अराजपत्रित (गट-ड) | | 33 | Total— (Group C ) |
| | एकूण पदे (अ+ब+क+ड) | | 95 | Grand Total (A+B+C+D) |

## (३) कर्मचारी वर्गाचा सारांश

## (iii) Personnel Summary

### महाराष्ट्राचे राज्यपालांचे परिवार प्रबंधकाचे कार्यालय

### Office of the Comptroller of the Household to the Governor of Maharashtra

### तक्ता ३ / Table 3

| अ.क्र. | पदनाम | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर Pay level in Revised Pay matrix | पदांची संख्या/ No. of Post 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|
| | **राजपत्रित गट-अ** | | | *Gazetted— Group A* |
| १ | राज्यपालांचे परिवार प्रबंधक | S-25-78800-209200 | 1 | Comptroller of the Household to the Governor |
| २ | राज्यपालांचे अतिरिक्त परिवार प्रबंधक | S-23-67700-208700 | 1 | Additional Comptroller of the Household to the Governor |
| ३ | राज्यपालांचे अतिरिक्त परिवार प्रबंधक (व्यवस्थापन) | S-23-67700-208700 | 1 | Additional Comptroller of the Household to the Governor (Management) |
| ४ | राज्यपालांचे परिसहायक | S-23-67700-208700 | 2 | A.D.C. to the Governor |
| ५ | राज्यपालांचे भिषक | S-20-56100-177500 | 1 | Physician to the Governor |
| | | एकूण (राजपत्रित गट-अ) | 6 | *Total— (Gazetted Group-A)* |
| | **राजपत्रित गट-ब** | | | *Gazetted— Group B* |
| १ | कक्ष अधिकारी | S-17-47600-151100 | 2 | Section Officer |
| २ | कक्ष अधिकारी (उद्यान) | S-17-47600-151100 | 2 | Section Officer (Garden) |
| ३ | कक्ष अधिकारी (खाद्यपेय) | S-17-47600-151100 | 1 | Section Officer (Catering) |
| २ | कक्ष अधिकारी (व्यवस्थापन) | S-17-47600-151100 | 1 | Section Officer (Management) |
| ५ | सहायक लेखा अधिकारी (म.वि. व ले. संवर्ग) | S-15-41800-132300 | 1 | Assistant Account Officer (M.F.A.S Cadre) |
| | | एकूण (राजपत्रित गट-ब) | 7 | *Total— (Gazetted Group-B)* |
| | **अराजपत्रित-गट ब** | | | *Non-Gazetted– Group B* |
| १ | सहायक कक्ष अधिकारी | S-14-38600-122800 | 6 | Assistant Section Officer |
| | | एकूण (अराजपत्रित गट-ब) | 6 | *Total— (Non-Gazetted Group-B)* |
| | अराजपत्रित-गट क | | | *Non-Gazetted– Group C* |
| १ | परिचारिका | S-13-35400-112400 | 1 | Nurse |
| २ | औषधनिर्माता | S-10-29200-92300 | 2 | Pharmacists |
| ३ | खाद्यपेय सहायक | S-09-26400-83600 | 1 | Catering Assistant |
| ४ | लघु-टंकलेखक | S-08-25500-81100 | 1 | Steno-Typist |
| ५ | गृहपाल | S-09-26400-83600 | 1 | Housekeeper |
| ६ | सहायक उद्यान पर्यवेक्षक | S-09-26400-83600 | 1 | Assistant Garden Supervisor |
| ८ | जलतरण तलाव प्रशिक्षक तथाजीवरक्षक | S-08-25500-81100 | 1 | Swimming Coach-Cum-Life Guard |
| ९ | लिपिक टंकलेखक | S-06-19900-63200 | 7 | Clerk Typist |
| ११ | वाहन चालक | S-06-19900-63200 | 12 | Driver |
| | | एकूण अराजपत्रित (गट-क) | 27 | Total— (Non-Gazetted Group C) |

| अ.क्र. | पदनाम | सुधारित वेतन संरचनेतील वेतन स्तर Pay level in Revised Pay matrix | पदांची संख्या/ No. of Post 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|
| | अराजपत्रित-गट ड | | | *Non-Gazetted Group D* |
| १ | लष्कर तांडेल | S-06-19900-63200 | 1 | Lascar Tandel |
| २ | आचारी | S-08-25500-81100 | 1 | Chef |
| ३ | मुख्य बटलर | S-8-25500-81100 | 1 | Head Butler |
| ४ | दफ्तरी | S-03-16600-52400 | 1 | Daftary |
| ५ | बहुउद्देशिय शिपाई | S-01-15000-47600 | 10 | Multasking Peon |
| ६ | सहायक आचारी | S-07-21700-69100 | 3 | Assistant Chef |
| ७ | कनिष्ठ स्वयंपाकी | S-05-18000-56900 | 5 | Junior Cook |
| ८ | बटलर | S-06-19900-63200 | 2 | Butler |
| ९ | सहायक (खाद्यपेय) | S-06-19900-63200 | 16 | Assistant (Catering) |
| १० | बहुउद्देशिय खाद्यपेय कर्मचारी | S-01-15000-47600 | 9 | Multasking catering Staff |
| ११ | माळी मुकादम | S-08-25500-81100 | 3 | Mali Mukadam |
| १२ | माळी | S-07-21700-69100 | 34 | Mali |
| १३ | मोटार स्वच्छक | S-01-15000-47600 | 3 | Motor Cleaner |
| १४ | कक्ष सेवक मुकादम | S-03-16600-52400 | 2 | Head Room Boy |
| २१ | कक्ष सेवक | S-01-15000-47600 | 22 | Room Boy |
| २४ | लष्कर | S-03-16600-52400 | 5 | Lascar |
| २५ | सफाईगार मुकादम | S-03-16600-52400 | 1 | Sweeper Mukadam |
| २६ | सफाईगार | S-01-15000-47600 | 13 | Sweeper |
| २७ | कचरा मजदूर | S-01-15000-47600 | 6 | Rubbish Mazdoor |
| २८ | धोबी | S-03-16600-52400 | 2 | Dhobi |
| ३० | शिंपी (लिनन) | S-05-18000-56900 | 1 | Tailor (linen) |
| ३१ | शिंपी | S-03-16600-52400 | 1 | Tailor |
| | | एकूण अराजपत्रित (वर्ग-ड) | 142 | Total— (Gazetted Group-C) |
| | | एकूण पदे (अ+ब+क+ड) | 188 | Total Post (A+B+C+D) |

## कार्यक्रम क्रमांक २

## मंत्रिपरिषद (२०१३)

संविधानाच्या अनुच्छेद १६३ अन्वये मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिपरिषद स्थापन करण्यात येते. मा. राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार प्रत्येक मंत्र्याकडे एक किंवा अधिक विभाग नेमून देऊन शासनाचे कामकाज मंत्र्यांमध्ये वाटून देतात. मा. मुख्यमंत्र्यांना व मा. मुख्यमंत्र्यांशी विचारविनिमय करून मंत्र्यांना एखाद्या विभागाच्या काही भागाशी संबंधित असे कोणतेही कामकाज मा. राज्यमंत्र्यांकडे किंवा उप मंत्र्यांकडे नेमून देता येते. मंत्रिपरिषद मा. राज्यपालांना दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या सल्ल्याबाबत सामुदायिकरित्या जबाबदार असते. मग असा सल्ला एखाद्या मंत्र्याने त्यांच्याकडे असलेल्या विभागाशी संबंधित असलेल्या बाबींसंबंधी दिलेल्या असो किंवा मंत्रिपरिषदेच्या बैठकीतील चर्चेच्या निर्णयानुसार दिलेल्या असो किंवा अन्य कोणत्याही प्रकारे दिलेला असो, या बाबीस बाधा न आणता एखाद्या विभागाचा प्रभारी मंत्री त्या विभागाशी किंवा त्याच्या भागाशी संबंधित असलेले कामकाज निकालात काढण्यास प्रथमतः जबाबदार असतो. जी माहिती वेळोवेळी आपणाकडे पाठविणे आवश्यक आहे. असे मुख्यमंत्र्यांना वाटते, अशी शासकीय कामकाजाबाबतची सर्व माहिती प्रत्येक मंत्री/राज्यमंत्री/उप मंत्री यांनी मा. मुख्यमंत्र्यांना पाठविणे आवश्यक असते. मा. मुख्यमंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतात. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रभारी मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित मंत्रालयीन विभागाकडून करण्यात येते.

तक्ता-एक

# TABLE-I

(२) वित्तीय आवश्यकता

## (ii) Financial Requirements

**तक्ता क्र. १**

**(२) वित्तीय आवश्यकता**

**(ii) Financial Requirement**

(रुपये हजारात/ Rs. in thousand)

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | A— Activity Classification | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (1) | |
| १ | मंत्र्यांचे व राज्यमंत्र्यांचे वेतन ... | 118782 | 242200 | 219498 | 252045 | Salary of Ministers and State Ministers | |
| २ | करमणूक व अतिथ्य खर्च ... | 0 | 1000 | 700 | 1000 | Entertainment and Hospitality Expenses | |
| ३ | दौऱ्याचा खर्च ... | 17184 | 55513 | 38859 | 57013 | Tour Expenses | |
| ४ | इतर खर्च ... | 116254 | 137613 | 147196 | 141411 | Other Expenditure | |
| | **एकूण (अ)** ... | **252220** | **436326** | **406253** | **451469** | **Total (A)** | |
| ब) | वित्त व्यवस्थेतील साधने— | | | | | | |
| | मागणी क्र. प्रधान शीर्ष ... | | | | | Demand No. | Major Head |
| | ए - १ २०१३ | 252220 | 436326 | 406253 | 451469 | ए - १ | 2013 |
| | **एकूण (ब)** ... | **252220** | **436326** | **406253** | **451469** | **Total (B)** | |

## कार्यक्रम क्रमांक ३

## निवडणुका (२०१५)

१. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३२४ मधील तरतुदीनुसार लोकसभा, राज्य सभा, राज्य विधानमंडळ, राष्ट्रपती व उप राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या मतदार याद्या तयार करणे, प्रत्येक नोंदणीकृत मतदाराला छायाचित्र ओळखपत्र देणे, वरील सर्व निवडणुका घेणे, त्यावर देखरेख करणे, या संदर्भातील आदेश काढणे व मतदारांच्या याद्या तयार करण्यावर नियंत्रण ठेवणे तसेच **परिसीमन** आयोगाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व विधानसभा व लोकसभा मतदारसंघाच्या सीमा ठरविणे ही सर्व जबाबदारी भारताच्या निवडणूक आयोगाकडे सोपवि-ण्यात आलेली आहे. या अनुच्छेदाच्या उपखंड (६) अनुसार निवडणूक आयोगाकडे प्रदान केलेली कामे योग्य रीतीने पार पाडण्यासाठी प्रत्येक राज्याच्या राज्यपालांना **राजपत्रित** व **अराजपत्रित** कर्मचारीवर्ग यांच्या सेवा भारत निवडणूक आयोगाला उपलब्ध करून द्याव्या लागतात.

२. राज्य शासनाच्या सचिवांमधून एका सचिवाची लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य म्हणून नियुक्ती करण्यात येते. मुख्य निवडणूक अधिकारी हे महाराष्ट्र राज्यापुरते निवडणूक कार्यक्रमांचे प्रभारी अधिकारी आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी यांना आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी मंत्रालय पातळीवर उप सचिव व सहमुख्य निवडणूक अधिकारी, अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी, कक्ष अधिकारी हे अधिकारी व इतर कर्मचारी सहाय्य करतात.

३. जिल्ह्यामध्ये मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना निवडणूक कार्यात जिल्हाधिकारी सहाय्य करतात. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा निवडणूक अधिकारी असे अधिसूचित केले जाते. जिल्हाधिकारी आपापल्या जिल्ह्यातील निवडणुकीबाबतचे संपूर्ण कामकाज जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने पाहतात.

मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांकरिता आयुक्त, बृहनमुंबई महानगर पालिका यांना जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना वेळोवेळी मंजूर करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्या सहाय्याने, मतदार याद्या तयार करणे, त्या अद्ययावत ठेवणे, मतदारांना छायाचित्र ओळख पत्रे देणे, निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेवर देखरेख ठेवणे इत्यादी कामे पार पाडावी लागतात.

४. संसद व विधानमंडळाच्या निवडणुकांशी संबंधित असलेले काम पार पाडण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर मंजूर करण्यात आलेल्या स्थायी पदांवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन, भत्ते व इतर खर्चाच्या ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून केली जाते. त्याचप्रमाणे मतदार याद्या तयार करण्यासाठी व छापण्यासाठी येणाऱ्या, तसेच लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्यास त्यासाठी होणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून केली जाते. परंतु जर संसद व राज्य विधानमंडळ ह्यांच्या निवडणुका स्वतंत्रपणे घेण्यात आल्यास, त्यासाठी होणारा संपूर्ण खर्च अनुक्रमे केंद्र शासनास व राज्य शासनास करावा लागतो.

तक्ता-एक

# TABLE-I

(३) वित्तीय आवश्यकता

## (iii) Financial Requirements

**तक्ता क्र. १/ Table No. I**

(३) **वित्तीय आवश्यकता**

(iii) **Financial Requirements**

(रुपये हजारात/ Rs. in thousand)

| अ.क्र. (1) | (अ) कार्याचे वर्गीकरण (2) | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 (3) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 (4) | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2026-2026 (5) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Revised Estimates 2026-2027 (6) | A— Activity Classification (1) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | निवडणूक आयोग ... | 0 | 176510 | 248236 | 183222 | |
| २ | निवडणूक अधिकारी ... | 585603 | 766794 | 664688 | 846607 | Electoral Officers |
| ३ | मतदारांच्या याद्या तयार करणे व त्यांचे मुद्रण ... | 1689704 | 2562212 | 2232220 | 2686381 | Preparation and Printing of Electoral Rolls |
| ४ | लोकसभा व राज्य/संघराज्य क्षेत्र विधानसभा यांच्या एकाच वेळेस घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांचा खर्च ... | 300000 | 1 | 1 | 1 | Charges for conduct of Election for Loksabha and State/Union Territory Legislative Assemblies when held simultaneously. |
| ५ | संसद निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च ... | 20656327 | 4316900 | 706900 | 360000 | Charges for conduct of Election to Parliament |
| ६ | राज्य/संघराज्य क्षेत्र विधान मंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च ... | 10716170 | 8655600 | 6924480 | 3528700 | Charges for conduct of Election to State/Union Territory Legislature. |
| ७ | मतदारांना देण्यात येणारी ओळखपत्रे देणे ... | 466674 | 262000 | 262000 | 234000 | Issue of Photo Identity Cards |
| ८ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची साठवणूक व वाहतूक ... | 45068 | 95000 | 92000 | 95450 | Storage and transportation of electronic voting machines |
| | **एकूण (अ)** ... | **34459546** | **16835017** | **11130525** | **7934361** | **Total (A)** |
| ब) | वित्त व्यवस्थेतील साधने— ... | | | | | |
| | मागणी क्र. प्रधान शीर्ष ... | | | | | Demand No. Major Head |
| | ए - २ २०१५ | 34459546 | 16835017 | 11130525 | 7934361 | No. A–2 2015 |
| | **एकूण (ब)** ... | **34459546** | **16835017** | **11130525** | **7934361** | **Total (B)** |

**तक्ता ३**

TABLE NO. 3

**(4)कर्मचारीविषयक गोषवारा (मंत्रालयीन स्तर)**

**(iv) Personnel Summary (State Level)**

| अनुक्रमांक Sr. No. (1) | पदनाम (2) | वेतनश्रेणी/ Scale of Pay (3) | पदांची संख्या / No. of Post 2024-2025 (4) | 2025-2026 (5) | Designation (6) |
|---|---|---|---|---|---|
| **राजपत्रित—** | | | | | *Gazetted—* |
| १ | सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी | ... L-15 : 182200-224100 ... | 1 | 1 | Secretary and Chief Electoral Officer |
| २ | अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी | ... L-13 : 123100-215900 ... | 2 | 2 | Additional Chief Electoral Officer |
| ३ | उप सचिव व सहमुख्य निवडणूक अधिकारी | ... S-25 : 78800-209200 ... | 2 | 2 | Deputy Secretary and Joint Chief Electoral Officer |
| ४ | अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी | ... S-23 : 67700-208700 ... | 3 | 3 | Under Secretary and Deputy |
| ५ | वरिष्ठ स्वीय सहायक | ... S-23 : 67700-208700 | 1 | 1 | Chief Electoral Officer |
| ६ | सहायक मुख्य निवडणूक अधिकारी | ... S-20 : 56100-177500 ... | 4 | 4 | Assistant Chief Electoral Officer |
| ७ | कक्ष अधिकारी | ... S-17 : 47600-151100 ... | 15 | 14 | Section Officer |
| | | **एकूण ...** | **28** | **27** | **Total** |
| **अराजपत्रित—** | | | | | *Non-Gazetted—* |
| १ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ... S-15 : 41800-132300 ... | 4 | 2 | Higher Grade Stenographer |
| २ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ... S-14 : 38600-122800 ... | 1 | 1 | Lower Grade Stenographer |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी | ... S-14 : 38600-122800 ... | 30 | 29 | Assistant Section Officer |
| ४ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ... S-7 : 21700-69100 ... | 23 | 23 | Data Entry Operator |
| ५ | लिपिक-टंकलेखक | ... S-6 : 19900-63200 ... | 48 | 48 | Clerk--Typist |
| ६ | वाहनचालक | ... S-6 : 19900-63200 ... | 2 | 1 | Driver |
| | | **एकूण ...** | **108** | **104** | **Total** |
| **अराजपत्रित, वर्ग—४** | | | | | *Non-Gazetted, Class IV—* |
| १ | शिपाई | ... S-1 : 15000-47600 ... | 26 | 21 | Peon |
| | | **एकूण ...** | **26** | **21** | **Total** |

**(4)कर्मचारीविषयक गोषवारा (जिल्हास्तर)**

**(iv) Personnel Summary (District Level)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **राजपत्रित वर्ग—** | | | | | *Gazetted—* |
| १ | उप जिल्हाधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी | ... S-20 : 56100-177500 ... | 36 | 36 | Deputy Collector and Deputy / District Electoral Officer |
| २ | तहसीलदार | ... S-19 : 55100-175100 ... | 14 | 14 | Tahsildar |
| | | **एकूण ...** | **50** | **50** | **Total** |
| **अराजपत्रित, वर्ग—२** | | | | | *Non-Gazetted, Class II—* |
| १ | नायब तहसीलदार | ... S-14 : 38600-122800 ... | 479 | 479 | Naib Tahsildar |
| | | **एकूण ...** | **479** | **479** | **Total** |
| **अराजपत्रित, वर्ग—३** | | | | | *Non-Gazetted, Class III—* |
| १ | अव्वल कारकून | ... S-12 : 32000-101600 ... | 427 | 427 | Awal Karkun |
| २ | वरिष्ठ निरीक्षक | ... S-8 : 25500-81100 ... | 6 | 6 | Senior Inspector |
| ३ | कनिष्ठ लिपिक | ... S-6 : 19900-63200 ... | 6 | 6 | Junior Clerk |
| ४ | प्रगणक | ... S-6 : 19900-63200 ... | 17 | 17 | Enumerator |
| ५ | लिपिक टंकलेखक | ... S-6 : 19900-63200 ... | 107 | 107 | Clerk Typist |
| ६ | रोखपाल | ... S-6 : 19900-63200 ... | 4 | 4 | Cashier |
| ७ | लघुलेखक (नि.श्रे.) | ... S-14 : 38600-122800 ... | 4 | 4 | Lower Grade Stenographer |
| | | **एकूण ...** | **571** | **571** | **Total** |
| **अराजपत्रित, वर्ग—४** | | | | | *Non-Gazetted, Class IV—* |
| १ | शिपाई | ... S-1 : 15000-47600 ... | 132 | 132 | Peon |
| | | **एकूण ...** | **1393** | **1384** | **Total** |

## कार्यक्रम क्रमांक ४

## सचिवालय सर्वसाधारण सेवा

**(१) मागासवर्ग कक्ष (२०७० ०५८६)**

मागासवर्ग कक्षाकडून शासनाच्या विविध सेवेतील मागावसर्गीयांचे भरती, बढतीमध्ये आरक्षणासंबंधीचे धोरण व अंमलबजावणीबाबतचे कामकाज हाताळले जाते. सद्यःस्थितीत आरक्षण अधिनियम, २००१ अनुसार व शासनाच्या विविध आदेशानुसार मागासवर्गीयांना, विहित केलेल्या आरक्षण टक्केवारीप्रमाणे सरळसेवेत रिक्त पदे भरण्यासाठी आरक्षणनिश्चिती करुन देण्यात येते. त्याचप्रमाणे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम-२०२४ अन्वये विहित केलेल्या आरक्षण टक्केवारी प्रमाणे व आदिवासीबहुल जिल्ह्यातील पदे भरण्यासाठी मोठ्या संवर्गाकरीता दिनांक २९ जुलै, २०२५ व छोट्या संवर्गाकरीता दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या आरक्षण टक्केवारीप्रमाणे सरळ सेवेतील रिक्त पदे भरण्यासाठी आरक्षणनिश्चिती करुन देण्यात येते.

मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या संदर्भात ज्या काही सवलती जाहीर करण्यात आलेल्या आहेत, त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येते किंवा कसे हे पाहिले जाते व या संदर्भात अडचणी उद्‌भवल्यास त्या अडचणी दूर केल्या जातात. पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने सद्यःस्थितीत पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्यात येत नाही. सद्यःस्थितीत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नत्या करण्यात येत आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २०/०४/२०२३ व दिनांक २९/०७/२०२४ अन्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करण्यात आले असून त्यानुसार आरक्षणनिश्चिती करण्यात येते.

२. मंत्रालयीन मागासवर्ग कक्षामार्फत गट 'अ' आणि 'ब' च्या सरळसेवा भरती संदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात येणारी मागणीपत्रे यामध्ये मागासवर्गीयांना कर्मचाऱ्याचे प्रमाण आरक्षण कायद्यातील तरतुदीनुसार ठेवण्यात आलेले आहे किंवा कसे, पदोन्नती देताना विशेष सहानुभूती न दाखवता अधिक्रमित केले जात नाही ना ही बाब तपासून पाहिली जाते. मागासवर्गातील कर्मचाऱ्यांची पदे प्राधान्याने भरण्याबाबत सूचना दिल्या जातात. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती किंवा सेवाविषयक बाबीबाबत त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत या कक्षाकडे त्यांनी अर्ज केल्यास त्यावर कार्यवाही करण्यात येते. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची पदे अधिक्रमित केली जातात किंवा कसे याचीही तपासणी केली जाते.

३. राज्य शासनाच्या गट 'क' व 'ड' सेवेमधील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर झालेल्या अन्यायासंदर्भात त्यांना त्वरित न्याय मिळावा या दृष्टीने प्रत्येक विभागीय आयुक्त यांच्या अधिपत्याखालील मागासवर्ग कक्षाची स्थापना १९८६ पासून करण्यात आली आहे. या विभागीय स्तरावरील मागासवर्ग कक्षाकरिता मे, १९९० पासून स्वतंत्र कर्मचारीवृंद देण्यात आलेला आहे. या कक्षांनी शासकीय, निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे इत्यादी कार्यालयामधील गट 'क' आणि गट 'ड' च्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक निवेदनावर / गा-हाण्यांवर अंतिम निर्णय घेण्याचे अधिकारही संबंधित विभागीय आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. तसेच मंत्रालयीन विभागाच्या अधिनस्त सर्व राज्यस्तरीय विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखालील विभागीय स्तारावरील गट 'ब' आणि 'अ' (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील पदोन्नतीकरिता आरक्षण निश्चितीचे व बिंद्धामावली तपासणी करण्याचे अधिकार विभागस्तरावर विभागीय आयुक्त यांनी दिनांक ५ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहे. तसेच राज्यस्तरीय शैक्षणिक संस्था विद्यापीठे व राज्यस्तरीय विभाग प्रमुख यांच्या अखत्यारितील कार्यालयामधील गट-क आणि गट ड या संवर्गातील सरळसेवा पदोन्नतीच्या बिंदुनामावली तपासणी व आरक्षण निश्चितीचे अधिकार विभाग स्तरावर सहायक आयुक्त (मावक) यांना दि.५ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहे.

४. मंत्रालयीन मागासवर्गीय कक्षाकडून राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे इ. कार्यालय येथे भेटी देऊन बिंदुनामावली कशी लिहावी व अनुशेष कसा काढावा व सेवाविषयक बाबींसंबंधी अनौपचारिक संदर्भ व प्रत्यक्ष चर्चेद्वारे योग्य ते मार्गदर्शन केले जाते.

५. राज्यातील सर्व संवर्गातील मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष राहू नये यासाठी सदरची पदे दरवर्षी पदभरतीच्या वेळी प्राथम्याने भरण्याचे निर्देश प्रशासकीय विभागांना देण्यात येतात.

**(२) मंत्र्यांचा स्वीय कर्मचारीवृंद (२०५२ ००३४)**

मा. मुख्यमंत्री, मंत्री व राज्यमंत्री यांना त्यांच्या प्रभाराखाली असलेल्या विभागाशी संबंधित असलेले कामकाज पार पाडण्यासाठी त्यांना स्वीय कर्मचारीवृंद देण्यात आलेला आहे. सदर स्वीय कर्मचारीवृंदाचे वेतन देयके व इतर देयके सादर करणे व त्या अनुषंगाने येणारे लेखाविषयक कामकाज केले जाते.

**(३) मंत्रीपरिषद (२०१३)**

स्वतंत्र शाखा, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन २१) या कार्यासनात मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री व राज्यमंत्री यांची कार्यालयीन खर्चाविषयक तसेच त्यांच्या कार्यालयाचे गृहव्यवस्थापन, त्यांच्या कर्मचारी वृंदाची आस्थापना तसेच वेतन-भत्ते, प्रवास, दौरा, दूरध्वनी, वर्तमानपत्रे इत्यादींची देयके सादर करणे व त्या अनुषंगाने येणारे लेखाविषयक कामकाज केले जाते. मंत्री आस्थापनेवर शा. नि. सा.प्र.वि. क्र. एमआयएन १२२४/प्र.क्र. १५०/कार्या-२१, (मआस्था-१), दिनांक १४ जानेवारी, २०२५ व दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अन्वये मा. मुख्यमंत्री सचिवालयाच्या आस्थापनेवर एकूण १६४ सावधी पदे, मा. उप मुख्यमंत्री कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण ७२ सावधी पदे, तसेच प्रत्येक मा. मंत्री यांचे कार्यालयीन आस्थापनेवर १६ सावधी पदे व प्रत्येक मा. राज्यमंत्री यांचे कार्यालयीन आस्थापनेवर १४ सावधी पदे निर्माण केलेली आहेत. मतदार संघातील स्वीय सहायकाची ३९ पदे आहेत (मंत्रीमंडळातील मा. मंत्री महोदय/मा. राज्यमंत्री महोदय यांचे संख्येत बदल झाल्यास त्यांचे आस्थापनेवरील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांच्या संख्येत बदल होऊ शकतो.) सदर पदावरील अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणुका, रजा, वेतन व भत्ते तसेच त्यांच्या सेवाविषयक व सेवानिवृत्ती विषयक अनुषंगीक इ. सर्व कामे या कार्यासनाद्वारे केली जातात. स्वतंत्र शाखेत गट 'अ' चे ३ पद, गट 'ब' ची ३ पदे, गट 'क' ची ३९ पदे आणि गट 'ड' ची १ पदे आहेत.

**(४) राजशिष्टाचार (२०७० ०२०९) राशि-२ (३१)**

महाराष्ट्र राज्य अतिथी नियम १ जानेवारी २००४ मधील तरतुदीनुसार ज्या व्यक्तींना राज्य अतिथींचा दर्जा देण्यात आलेला आहे त्यांची तसेच ज्या मान्यवर अति अति-महत्त्वाच्या व्यक्ती आहेत त्या सर्वांची राजशिष्टाचार या संज्ञेनुसार त्यांच्या दर्जाप्रमाणे स्वागत, वाहन, निवास, भोजन, करमणूक, स्थळप्रदर्शन, भेटवस्तू प्रदान करणे, निरोप देणे इत्यादी व्यवस्था करण्यांत येते. याशिवाय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातर्फे आयोजण्यात येणाऱ्या विदेशी पाहुण्यांच्या महाराष्ट्र भेटीची सर्व व्यवस्था राजशिष्टाचार कार्यासनामार्फत परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शन व सल्ल्यानुसार करण्यात येते. <u>अशा विदेशी पाहुण्यांच्या निवास व परिवहन व्यवस्थेवरील खर्च परराष्ट्र व्यवहार मंत्रालय करते. अति अति महत्त्वाच्या व्यक्तींची निवास व भोजन व्यवस्था साधारणतः राजभवन येथे व परदेशी पाहुण्यांची व्यवस्था पंचतारांकित हॉटेलमधून करण्यात येते. साधारणतः अन्य राज्य अतिथींची व्यवस्था 'सह्याद्री व नंदगिरी' या राज्य अतिथीगृहात केली जाते. ही राज्य अतिथीगृहे राजशिष्टाचार शाखेच्या नियंत्रणाखाली आहेत. काही वेळा गरजेनुसार राज्य अतिथीगृहात कक्ष उपलब्ध नसल्यास राज्य अतिथींची व्यवस्था पंचतारांकित हॉटेलमध्येसुद्धा करण्यात येते. सह्याद्री राज्य अतिथीगृहाचा वापर वरील प्रयोजनासाठी तसेच वरिष्ठ स्तरावरील सभा/बैठका आयोजित करण्यासाठी केला जातो.</u>

२. राज्य अतिथींच्या व मान्यवरांच्या परिवहनासाठी डी. व्ही. गाड्यांचा ताफा या कार्यासनाने नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई व जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली ठेवला आहे. या गाड्यांची देखभाल करणे व जुन्या गाड्या निकाली काढून नवीन गाड्या खरेदी करणे ही कार्यवाही या कार्यासनामार्फत करण्यात येते.

३. "प्रजासत्ताक दिन" व "स्वातंत्र्य दिन" या राष्ट्रीय दिनांच्या दिवशी, तसेच 'महाराष्ट्र दिन' या दिवशी समारंभपूर्वक ध्वजारोहण, संचलन व रोषणाई याबाबतची व्यवस्था तसेच राज्यपाल, मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांचा शपथविधी समारंभाची सर्व व्यवस्था राजशिष्टाचार शाखा करते.

४. मुंबईतील परदेशी वाणिज्य निकाया संबंधीच्या सर्व बाबी राजशिष्टाचार शाखेत हाताळल्या जातात.

५. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने भारतीय ध्वज संहितेत राष्ट्रध्वजाचा वापर कसा करावा, ध्वजाचा आकार किती असावा, ध्वज केंव्हा लावावा व केंव्हा खाली उतरवावा तसेच ध्वज अर्ध्यावर केंव्हा फडकवावा याबाबतच्या सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. राष्ट्रध्वजाचा अवमान झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, पोलीस आयुक्त, अधीक्षक यांच्या अहवालानुसार कार्यवाही करण्यात येते.

६. राष्ट्रगीतासंबंधी केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत. यासंदर्भातील काही उपस्थित झालेल्या नवीन बाबींवर गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्याशी विचारविनिमय करून कार्यवाही करण्यात येते.

७. महनीय व्यक्तीचे (उदा. राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, पंतप्रधान) निधन झाल्यास केंद्रीय गृह मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या संदेशानुसार कार्यवाही करण्यात येते. सर्वसाधारणतः अशावेळी राज्यातील शासकीय कार्यालये बंद ठेवण्याबाबत, राष्ट्रीय दुखवटा पाळण्याबाबत, तसेच राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकविण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात येतात. राज्यातील महनीय व्यक्तींचे निधन झाल्यास केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार दुखवटा व पुष्पचक्र वाहणे, शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार इत्यादींची व्यवस्था करण्यात येते.

८. विशेष अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटीच्या वेळी सभामंच व्यवस्था, विद्युत व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था यावरील खर्चही राजशिष्टाचार कार्यासन करते.

९. केंद्र शासनातर्फे दरवर्षी पद्म पुरस्कार, जीवनरक्षा पुरस्कार, दिले जातात. या पुरस्कारांकरिता राज्यामधून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार छाननी केली जाते व शिफारसयोग्य प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविले जातात.

१०. राजशिष्टाचार विभागाअंतर्गत सह्याद्री व नंदगिरी राज्य अतिथीगृहाच्या पदांचा सुधारित आकृतिबंधाचा शासन निर्णय दिनांक ९ मार्च २०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार पदांचा गोषवारा पुढील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**शासकीय परिवहन सेवा, मुंबईः (२०७० ०१४७)**

शासकीय परिवहन सेवा हे कार्यालय सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई येथे असून त्या कार्यालयाची स्वतःची कार्यशाळा आहे. (सहसचिव/उप सचिव (राजशिष्टाचार)), सामान्य प्रशासन विभाग हे या कार्यालयाचे विभागप्रमुख असून नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा हे प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख आहेत. त्याचप्रमाणे या कार्यालयाच्या आस्थापनेवर लेखा अधिकारी, कार्यालय अधीक्षक व सहायक अधीक्षक (कर्म) ही राजपत्रित पदे आहेत. दि. २८ जुलै २०२२ पासून मंजूर झालेल्या पदांच्या आढाव्यानुसार उपरोक्त राजपत्रित पदांसह एकूण १३८ नियमित पदे व १७ पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यास परवानगी देण्यात आली आहे.

२. वर उल्लेख केल्याप्रमाणे शासकीय परिवहन सेवेची स्वतःची कार्यशाळा असून यासह प्रशासन व वाहतूक असे ३ विभाग कार्यरत आहेत. या कार्यशाळेत शासकीय परिवहन सेवेच्या विख्यात अभ्यागतांच्या वाहन ताफ्याव्यतिरिक्त अन्य शासकीय कार्यालयांच्या वाहनांच्या परिरक्षणाचे व दुरुस्तीचे काम पार पाडले जाते. अशा दुरुस्तीसाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ति केवळ ५ टक्के सेवा आकारासह संबंधित कार्यालयाकडून वसूल केली जात शासकीय परिवहन सेवेच्या कार्यशाळेत वाहनांची दुरुस्ती होऊ शकत नसल्यास अशी दुरुस्ती शासनमान्य खाजगी कार्यशाळेत करण्यात येते व शासकीय परिवहन सेवेकडून अशा वाहनाची तपासणी करून सदर दुरुस्तीचे देयक प्रमाणित करण्यात येते.

३. वर उल्लेख केल्याप्रमाणे शासकीय परिवहन सेवा कार्यालयासाठी राज्यस्तरीय वाहन धोरण आढावा समितीने एकूण ६३ वाहने मंजूर केली असून ही वाहने मा. राज्य अतिथी, विदेशी पाहुणे तसेच मा. पंतप्रधान, मा. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती महोदय, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश इत्यादी अतिमहत्त्वाच्या मान्यवरांच्या वाहतूक व्यवस्थेसाठी वापरण्यात येतात.

राज्यशिष्टाचार शाखेमार्फत कोणतीही योजनांतर्गत योजना राबविली जात नाही. ज्या योजनेतर योजना राबविण्यात येतात त्याची माहिती खालीलप्रमाणे आहेः—

| अ.क्र. | अनिवार्य खर्च | संकेतांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | सा.प्र.वि., राज्यशिष्टाचार शाखा | २०५२०३२१ |
| २ | विख्यात अभ्यागतांसाठी मोटार गाड्या परिरक्षण | २०५२००४३ |
| ३ | विख्यात अभ्यागतांसाठी मोटार गाड्यांची खरेदी | २०५२००८१ |
| ४ | अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीच्या भेटीची व्यवस्था | २०७००२०९ |
| ५ | परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (शासकीय परिवहन सेवा) | २०७००१४७ |

**विख्यात अभ्यागतांसाठी मोटारगाड्यांची खरेदी (२०५२ ००८१)**

**(५) शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे:**

**शासकीय कर्मचाऱ्यांना अग्रिमे.**—सामान्य प्रशासन विभागात काम करणाऱ्या आणि या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांच्या/ कार्यालय प्रमुखांच्या नियंत्रणाखालील कार्यालयामध्ये काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना शासनाच्या मंजुरीने मुंबई वित्तीय नियम, १९५९ अनुसार पुढील प्रयोजनासाठी अग्रिमे मंजूर करण्यात येतात.

(एक) घरबांधणी अग्रिमे (७६१० १३७९)

(दोन) मोटार वाहन/मोटार सायकल खरेदीसाठी अग्रिमे (७६१० १३९७)

(तीन) वैयक्तिक संगणक खरेदीकरिता अग्रिमे (७६१० १७९१)

**(६) ठेव संलग्न विमा योजना (२२३५ ००२४).**—शासनाने सुरू केलेल्या ठेव संलग्न विमा या योजनेनुसार, भविष्यनिर्वाह निधीच्या अभिदात्यांना (सबस्क्रायबर्स) विम्याचा हप्ता न भरता विम्याचे संरक्षण मिळते. सेवेत असताना अभिदात्यांचे निधन झाले तर, विहित नियमानुसार भविष्यनिर्वाह निधीतील शिल्लक रक्कम मिळण्यास पात्र असलेल्या वारसदारास सदर योजनेचा लाभ मिळू शकतो.

**(७) निवासी आयुक्तांच्या कार्यालयाचे कार्यः (२०५२ ०१२३)**

दिल्लीस्थित महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्तांचे कार्यालय इतर राज्यांच्या दिल्लीतील निवासी आयुक्तांच्या कार्यालयाप्रमाणे राज्य शासनाचे जवळपास एक छोटे दुतावास म्हणून कार्य करीत आहे. या कार्यालयाची स्थापना १९६४ मध्ये झाली आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ मे १९९७ च्या शासन निर्णयानुसार निवासी आयुक्तांना सचिवाचा दर्जा देऊन दिल्लीच्या या कार्यालयापुरते प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून घोषित केले आहे. तसेच दिनांक २ मे २००० च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली ह्या कार्यालयाचे प्रशासकीय नियंत्रण (आस्थापना वगळता) निवासी आयुक्तांच्या अखत्याराखाली आणल्यामुळे निवासी आयुक्तांच्या कामात व जबाबदाऱ्यात वाढ झालेली असून मंत्रालयातील इतर विभागाप्रमाणे निवासी आयुक्त कार्यालयही हा एक विभाग म्हणून सध्या कार्य करीत आहे. पूर्वी या कार्यालयाचे नाव विशेष आयुक्त असे होते. आता कार्यालयीन आदेश क्र. विआ/आस्था/११/२००६/१९१३, दिनांक १६ मार्च, २००६ अन्वये या कार्यालयाचे नाव निवासी आयुक्त करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/अनौ. ३९/प्र.क्र. १२९/२०-अ, दिनांक ७ ऑक्टोबर २०२२ अन्वये निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या कार्यालयाचा पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधानुसार निवासी आयुक्त व सचिव १ संवर्ग पद, अपर निवासी आयुक्त, १ संवर्ग पद, सहाय्यक निवासी आयुक्त, ३ पदांसह विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

हे कार्यालय म्हणजे महाराष्ट्र शासनाचे नवी दिल्ली - मुंबई व मुंबई - नवी दिल्ली असे दुहेरी काम करणारे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. या कार्यालयाचे काम प्रामुख्याने राज्य व केंद्र यांच्यातील समन्वयाचा व संपर्क साधण्याचा आहे. निवासी आयुक्तांना प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून घोषित केल्यापासून व महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली हे कार्यालय त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणल्यापासून मंत्रालयातील इतर विभागाप्रमाणे अनौपचारिक प्रस्ताव तयार करून त्यास आवश्यक त्या मंत्रालयीन विभागाच्या जसे, वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग सेवा वगैरेच्या सहमतीने शासन निर्णय काढण्यात येत आहेत. आतापर्यंत जवळ जवळ ३०० पेक्षा अधिक अनौपचारिक संदर्भास वित्त व इतर आवश्यक मंत्रालयीन विभागाची सहमती घेऊन शासन निर्णय/शासन अधिसूचना व ज्ञापन निर्गमित केलेले आहेत.

केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या राज्य शासनाच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणे, राज्यात जास्तीत जास्त उद्योग व परदेशी गुंतवणूक वाढविण्याकरिता पाठपुरावा करणे, अनिवासी भारतीय प्रकरणे यांचे संदर्भात पाठपुरावा करणे, मुंबई शहरामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सहाय्यकारी प्रकल्पांचे संनियंत्रण करणे व यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे, तसेच महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे राज्य शासनाच्या अति महत्त्वाच्या व्यक्तींना राजशिष्टाचार व इतर सुविधा देणे व केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयांनी आयोजित केलेल्या बैठकांसाठी उपस्थित राहणे याकरिता निवासी आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे सचिव दर्जाचे पद सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/अनौ.३९/प्र.क्र. १२९/२०-अ, दिनांक ७ ऑक्टोबर २०२२ नुसार कायम ठेवण्यात आलेले आहे.

राज्य शासन व केंद्र शासन यामध्ये समन्वय साधण्याच्या कामांत प्रामुख्याने खालील कामे मोडतातः—

१. राज्य शासनाने केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा/प्रकरणांचा पाठपुरावा करणे.

२. विधीमंडळ कायद्यांचे प्रस्ताव आणि वटहुकूमाकरिता महामाहिम राष्ट्रपतींची मंजुरी मिळवणे.

३. राज्याच्या निरनिराळ्या योजनांतर्गत कार्यक्रमासाठी परकीय चलनाचे अनुदान व अर्थ सहाय्य मिळविणे.

४. केंद्रीय मंत्रालयास राज्य शासनाच्या विविध विभागाकडून हवी असलेली माहिती मिळविण्याबाबत केंद्र शासनास मदत करणे.

५. मंत्रिमहोदयांच्या व उच्च अधिकाऱ्यांच्या विदेशी दौऱ्यासाठी आवश्यक ते पारपत्र व्हिसा आणि परकीय चलन मिळवून देणे.

६. मा. राज्यपाल / मुख्यमंत्री / उप मुख्यमंत्री / मंत्री यांच्या दिल्लीतील शासकीय भेटीत आवश्यक ते सहाय्य पुरविणे. त्यांच्या बैठकीबाबतचे संपूर्ण आयोजन करणे तसेच त्यांना ज्यांच्या भेटी घ्यावयाच्या आहेत त्यांच्याशी अगोदर संपर्क साधून त्या निश्चित करून त्यांची आगाऊ सूचना देणे तसेच त्यांच्या बैठकीसंबंधातील कागदपत्रे मिळविणे वगैरे.

७. दिल्लीत होणाऱ्या निरनिराळ्या बैठकीत/कार्यक्रमात राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणे मुख्यत्वेकरून ज्यावेळी राज्य शासनाचे मंत्री आमदारांना निश्चित अशा एखाद्या विषयाबाबत हवी असलेली माहिती राज्य शासन किंवा केंद्र शासन यांच्याकडून मिळवून ती पुरविणे.

८. महाराष्ट्रातून आलेल्या खासदारांना/आमदारांना निश्चित अशा एखाद्या विषयाबाबत हवी असलेली माहिती राज्य शासन किंवा केंद्र शासन यांच्याकडून मिळवून ती पुरविणे.

९. केंद्र शासनाच्या अधिसूचना, आदेश व निर्णयाच्या प्रती मिळविणे व त्या राज्य शासनास वेळीच पाठविणे.

१०. दिल्लीत भेट देणाऱ्या व दिल्लीहून पुढे जाणाऱ्या महाराष्ट्राच्या अतिविशिष्ट व्यक्तींना विमानतळावरून आणणे व निरोप देणे, त्यांची राहण्याची, वाहनाची व्यवस्था करणे, वगैरे.

निवासी आयुक्त कार्यालय नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींना त्यांच्या संसदीय कामकाजात मदत करण्यासाठी म्हणून लोकप्रतिनिधी कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षातून महाराष्ट्रातील प्रतिनिधींना केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या राज्याच्या प्रश्नाबाबतची माहिती पुरविली जाते. तसेच संसदीय कामकाजासाठी खासदार महोदयांना टंकलेखन/लघुलेखन या संदर्भात सहाय्य दिले जाते.

निवासी आयुक्तांच्या कार्यालयाकडून करण्यात येणाऱ्या उपरोक्त कामावरून एकंदर कामाचे स्वरूप लक्षात येऊ शकेल. सरदहू कामाशिवाय बरीच कामे अशी असतात की, ज्यांची दप्तर दखल ठेवली जाऊ शकत नाही. कधी त्या कामाच्या स्वरुपामुळे तर कधी अत्यंत तातडीमुळे या कामाचे यशापयश संपूर्ण मुंबई व दिल्ली मधील अत्यंत प्रभावी अशा जनसंपर्कावर अवलंबून असते. त्यात केंद्र शासनाबरोबर संपर्क साधताना/राखताना महाराष्ट्राचे अधिअधिक हित लक्षात ठेवून जाणीवपूर्वक व मुत्सदेगिरीने प्रयत्न करावे लागतात.

निवासी आयुक्त कार्यालयाच्या अंतर्गत कस्तुरबा गांधी मार्ग येथील नवीन महाराष्ट्र सदन शासकीय अतिथीगृहाचे उद्घाटन दिनांक ४ जून २०१३ रोजी महामहिम राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते करण्यात आले. नवीन महाराष्ट्र सदन या शासकीय विश्रामगृहात एकूण १४० वातानुकूलित कक्षबंध असून, मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. आमदार, मा. खासदार व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या नवी दिल्ली भेटीत राहण्याची व्यवस्था करण्याकरिता नवीन महाराष्ट्र सदन हे शासकीय अतिथीगृह आहे. **यात मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांच्यासाठी स्वतंत्र प्रशस्त कक्ष अत्याधुनिक सोईसुविधासह उभारण्यात आलेले आहेत. (मा. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश/**

**यांच्यासाठी १ कक्षबंध, मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री (कॅबिनेट व तत्सम दर्जा प्राप्त) महोदयांकरिता ७ कक्षबंध, मा. राज्यमंत्री व तत्सम दर्जा प्राप्त यांचेकरिता १५ कक्षबंध, मा. विधानपरिषद व विधानसभा सदस्य यांच्यासाठी ५० कक्षबंध, मा. मुख्य सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव प्रधान सचिव (कार्यरत तथा सेवानिवृत्त) यांच्यासाठी ६ कक्षबंध, अधिकारी/अतिथी यांच्याकरिता ५२ कक्षबंध राखीव ठेवलेले आहेत. तर विकलांगांसाठी व वैद्यकीय सहाय्यतेकरिता एक-एक कक्षबंध आरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच अत्यावश्यक सेवांसाठी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी राखीव व अनारक्षित ४ कक्षबंध आहेत.)** नवीन महाराष्ट्र सदनात किमान २५० लोकांचे सोय असलेले आधुनिक बँक्वेट हॉल, ७० पत्रकार एकाच वेळी बसू शकतील असा परिपूर्ण वार्ताहर कक्ष, अत्याधुनिक सोईसुविधायुक्त असा व्हिडीओ कॉन्फरसिंग हॉल, खासदार कक्ष, ग्रंथालय, शॉपिंग आर्केड, व्यायामशाळा अशा प्रकारचे प्रयोजन नवीन महाराष्ट्र सदनात करण्यात आलेले आहे. कस्तुरबा गांधी मार्ग व कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली येथील शासकीय अतिथी गृहातील कक्षबंध आरक्षणाची व्यवस्था निवासी आयुक्त कार्यालय तर्फे करण्यात येते.

**(८) प्रशिक्षण व परीक्षा: (२०५२ ००२५)**

१. विभागीय परीक्षासंबंधी सर्वसाधारण धोरण व त्या अनुषंगाने विभागांना सल्ला देणे.

२. मंत्रालयीन संवर्गातील लिपिक-टंकलेखक व सहायक कक्ष अधिकारी यांच्याकरिता खालीलप्रमाणे प्रशिक्षण घेणे व परीक्षेचे आयोजन करणे.

(अ) मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक यांच्यासाठी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा.

(ब) सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा.

(क) सहायक कक्ष अधिकाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय परीक्षा.

**(९) सामाजिक विकास समन्वय कक्ष.**—सन २००३-०४ चा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना सामाजिक न्यायाची स्थापना ही शासनाची प्रमुख जबाबदारी असल्याचे प्रतिपादन मा. मंत्री, वित्त व नियोजन यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात केले. याकरिता " मानव विकासासाठी अर्थसंकल्प" ही प्रक्रिया सुरू करण्यात आली. या प्रक्रियेचा अविभाज्य घटक म्हणून सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात काही नवीन संकल्पना अंतर्भूत करण्यात आल्या होत्या. जसे, प्रकल्प एकसंघ (प्रोजेक्ट युनाईट), सामाजिक न्याय निर्देशांक व सामाजिक न्याय अहवाल, सामाजिक उत्तरदायित्व अधिनियम, सामाजिक लेखापरीक्षण, नवीन योजना व संकल्पनांचा समन्वय इत्यादी त्याकरिता सामाजिक विकास समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

**(१०) मा. मुख्यमंत्री महोदयांसमवेत आमदार/खासदारांच्या बैठका.**— राज्याचे प्रमुख या नात्याने मा. मुख्यमंत्री यांचेकडे केंद्रीय मंत्री, राज्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी मान्यवर व अन्य यांच्या जनहिताच्या कामासंदर्भातील पत्रे/निवेदने प्राप्त होत असतात. सदर प्रकरणांचा मंत्रालयीन विभागीय स्तरावर पाठपुरावा करण्याचे काम विशेष कार्य कक्षामार्फत केले जाते.

तक्ता-एक

# TABLE-I

(४) वित्तीय आवश्यकता

## (iv) Financial Requirements

## (४) वित्तीय आवश्यकता
## (iv) Financial Requirement

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. (1) | (अ) कार्याचे वर्गीकरण (2) | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 (3) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 (4) | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 (5) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 (6) | A— Activity Classification (1) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) ... | 830844 | 1219999 | 1051617 | 1292265 | (1) Secretariat-General Administration Dept. (Proper) |
| २. | सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) ... | 173000 | 207521 | 184156 | 221670 | (2) Secretariat-General Administration Dept. (Protocol) |
| ३. | मंत्र्यांचा स्वीय कर्मचारी वर्ग ... | 445088 | 999982 | 693053 | 1094351 | (3) Ministers' Personal Staff |
| ४. | विख्यात अभ्यागतांसाठी मोटारगाड्या ... | 72751 | 58252 | 58252 | 60000 | (4) Distinguished Visitor's Cars |
| ५. | नागपूर येथील राज्य विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासंबंधीचा खर्च. ... | 34802 | 66809 | 66809 | 66809 | (5) Expenditure in connection with Nagpur Session |
| ६. | स्वतंत्र शाखा सामान्य प्रशासन विभाग | 35081 | 60427 | 43317 | 64473 | (6) Separate Branch-General Administration Department. |
| ७. | राज्य माहिती आयोग | 0 | 161319 | 147446 | 183520 | (7) State Information Commission (Committed) |
| ८. | राज्य सेवा हक्क आयोग | 0 | 0 | 0 | 349049 | (8) State Commission for Right to Services |
| ९. | खासदार/ आमदार यांचेशी मुंबई/ नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या बैठकीसाठीचा खर्च. ... | 0 | 200 | 160 | 200 | (9) The expenditure towards the meetings arranged with M. L. As./M. Ps. of the state. |
| १०. | विख्यात अभ्यागतांसाठी मोटारगाड्यांची खरेदी ... | 41737 | 40000 | 40000 | 40000 | (10) Purchase of Cars for Distinguished Visitors. |
| ११. | विभागीय चौकशीकरिता विशेष अधिकारी ... | 30765 | 59494 | 54201 | 66318 | (11) Regional Departmental Enquiry Officer |
| १२. | निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन ... | 136400 | 155690 | 192239 | 147731 | (12) Residential Commissioner, Maharashtra Sadan. |
| १३. | मागासवर्गीय कक्ष ... | 45698 | 61051 | 50379 | 59399 | (13) Backward Class Cell |
| १४. | माहिती व तंत्रज्ञान संचालनालय ... | 1231638 | 2980565 | 2057800 | 3440229 | (14) Directorate of Information Technology |
| १५. | ई-गव्हर्नन्सचे प्रकल्प राबविण्यासाठी सहाय्यक अनुदान. ... | 3040985 | 7090000 | 4963000 | 10000000 | (15) Grant in Aid for E-governance Project |
| १६. | इतर खर्च ... | 334036 | 510974 | 402277 | 160510 | (16) Other Expenditure |
| | **एकूण (अ)** ... | **6452825** | **13672203** | **10004706** | **17246524** | **Total (A)** |

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | A— Activity Classification | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | | (3) | (4) | (5) | (6) | (1) | |
| (ब) वित्तीय व्यवस्थेतील साधने— | | | | | | | | |
| मागणी क्र. | प्रधान शीर्ष | .... | | | | | Demand No./Sr. No. | Major Head |
| ए - ४ | २०५२* | .... | 6073091 | 12938859 | 9404604 | 16494046 | A—4 | 2052* |
| ए - ४ | २०७०* | .... | 379734 | 572025 | 452656 | 219909 | A—4 | 2070* |
| | **एकूण (ब)** | **....** | **6452825** | **13510884** | **9857260** | **16713955** | **Total (B)** | |

## सामान्य प्रशासन विभाग (खुद्द)
## General Administration Department (Proper)
### तक्ता १ / Table I

**(४) कर्मचारी विषयक गोषवारा**
**(iv) Personnel Summary**

| अनुक्रमांक Sr. No. (1) | पदनाम Designation (2) | वेतनश्रेणी/ Scale of Pay (3) | पदांची संख्या/ No. of Posts 2024-2025 (4) | पदनाम Designation (5) |
|---|---|---|---|---|
| १ | **राजपत्रित गट अ–** | Rs. | | *Gazetted—* |
| | मुख्य सचिव | संवर्ग पद | 1 | Chief Secretary |
| | अपर मुख्य सचिव | संवर्ग पद | 4 | Additional Chief Secretary |
| | प्रधान सचिव | संवर्ग पद | 1 | Principal Secretary |
| | सचिव | संवर्ग पद | 1 | Secretary |
| | सहसचिव | 1,23,100-2,15,900 (S-27) | 8 | Joint Secretary |
| | उप सचिव | 78,800-2,09,200 (S-25) | 9 | Deputy Secretary |
| | अवर सचिव | 67,700-2,08,700 (S-23) | 35 | Under Secretary |
| | अवर सचिव (विधि) | 67,700-2,08,700 (S-23) | 2 | Under Secretary (Law) |
| | वरिष्ठ स्वीय सहायक | 67,700-2,08,700 (S-23) | 5 | Senior Personal Assistant |
| | निवडश्रेणी लघुलेखक/ स्वीय सहायक | 44,900-1,42,400 (S-16) | 3 | Selection Grade Stenographer |
| | उपसंचालक | 5,600-1,77,500 (S-20) | 1 | |
| | | **एकूण ...** | **70** | **Total** |
| २ | **अराजपत्रित–(गट-" ब ")** | | | *Non-Gazetted, Class II—* |
| | कक्ष अधिकारी | 47,600-1,51,100 (S-17) 56,100-1,77,500 (S-20) (चार वर्षाच्या सलग सेवेनंतर अकार्यात्मक वेतनश्रेणी) | 81 | Section Officer |
| | लेखा अधिकारी | 44,100-1,42,400 (S-16) | 1 | Account Officer |
| | सहायक लेखा अधिकारी | 41,800-1,32,300 (S-15) | 1 | Assistant Account Officer |
| | | **एकूण ...** | **83** | **Total** |
| ३ | **अराजपत्रित–(गट-" ब ")** | | | *Non-Gazetted, Class II—* |
| | संशोधन सहायक | 38,600-1,22,800 (S-14) | 1 | Research Assistant |
| | सहायक कक्ष अधिकारी/ रोख लेखापाल | 38,600-1,22,800 (S-14) | 139 | Assistant Section Officer Cash Accountant |
| | उच्च श्रेणी लघुलेखक | 41,800-1,32,300 (S-15) | 19 | Higher Grade Stenographer |
| | निम्न श्रेणी लघुलेखक | 38,600-1,22,800 (S-14) | 10 | Lower Grade Stenographer |
| | | **एकूण ...** | **169** | **Total** |
| ४ | **अराजपत्रित–(गट-" क ")** | | | *Non-Gazetted, Class III—* |
| | दूरध्वनी चालक | 21,700-69,100 (S-7) | 2 | Telephone Operator |
| | लिपिक-टंकलेखक/देयक लेखापाल | 19,900-63,200 (S-6) | 182 | Clerk-Typist/Bill Accountant |
| | विभाग निरीक्षक | 25,500-81,100 (S-8) | 1 | Departmental Inspector |
| | | **एकूण ...** | **185** | **Total** |
| | | **एकूण ...** | **507** | **Total** |
| ५ | **बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे मनुष्यबळ–(गट-क, गट-ड)** | | | *Class III— IV* |
| | वाहनचालक | 19,900-63,200 (S-6) | 10 | Driver |
| | बहुउद्देशीय वर्ग-4 कर्मचारी | 15,000-47,600 (S-1) | 87 | Multi Governmental Class-4 Employees |
| | शिपाई | 15,000-47,600 (S-1) | 8 | Peon |
| | नाईक | 16,000-52400 (S-3) | 7 | Naik |
| | | **एकूण ...** | **112** | **Total** |
| | | **एकूण बेरीज ...** | **619** | **Grand Total** |

## मंत्र्यांचा स्वीय कर्मचारी वर्ग

**Ministers Personal Staff**

तक्ता २ / Table II

| अ. क्र. Sr. No. (1) | पदनाम (2) | वेतनश्रेणी Pay Band + G.P. (Rs.) (3) | पदांची संख्या No. of Posts 2025-2026 (4) | Designation (5) |
|---|---|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्र्यांचे/उप मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव ... | 2,25,000 (Fixed) (Level 17)<br>1,82,200-2,24,100 (Level 15)<br>1,44,200–2,18,200 (Level 14) | 5 | ... Additional Chief Secretary/ Principal Secretary/ Secretary to Chief Minister /Deputy Chief Minister |
| (२) | मुख्यमंत्र्यांचे/उप मुख्यमंत्र्यांचे सह सचिव/उप सचिव ... | 1,23,100–2,15,900 (Level 13)<br>78,800-2,09,200 (Level 12)<br>67,700-2,08,700 (Level 11)<br>1,23,100– 2,15,900 (S-27)<br>78,800-2,09,200 (S-25)<br>67,700-2,08,700 (S-23) | 11 | ... Joint Secretary/ Deputy Secretary to Chief Minister/ Deputy Chief Minister |
| (३) | संचालक/सह संचालक/ उप संचालक/सहायक संचालक (निधी व लेखा.) ... | 1,31,100-2,16,600 (S-29)<br>78,800-2,09,200 (S-25)<br>67,700-2,08,700 (S-23)<br>56,100-1,77,500 (S-20) | 1 | ... Director/Joint Director/ Deputy Director/Asst. Director (Account & Fund) |
| (४) | अवर सचिव ... | 78,800-2,09,200 (S-25)<br>67,700-2,08,700 (S-23) | 5 | ... Under Secretary. |
| (५) | खाजगी सचिव ... | 1,31,100–2,16,600 (S-29)<br>1,23,100-2,15,900 (S-27)<br>78,800-2,09,200 (S-25)<br>67,700-2,08,700 (S-23)<br>56,100-1,77,500 (S-20)<br>55,100-1,75,100 (S-19)<br>49,100-1,55,800 (S-18)<br>47,600-1,51,100 (S-17) | 49 | ... Private Secretary |
| (६) | जनसंपर्क अधिकारी ... | 78,800-2,09,200 (S-25)<br>67,700-2,08,700 (S-23)<br>49,100-1,55,800 (S-18)<br>44,900-1,42,400 (S-16)<br>41,800-1,32,300 (S-15)<br>38,600-1,22,800 (S-14) | 6 | ... Public Relation Officer |
| (७) | विशेष कार्य अधिकारी ... | 1,31,100–2,16,600 (S-29)<br>1,23,100-2,15,900 (S-27)<br>78,800-2,09,200 (S-25)<br>67,700-2,08,700 (S-23)<br>56,100-1,77,500 (S-20)<br>55,100-1,75,100 (S-19)<br>49,100-1,55,800 (S-18)<br>47,600-151,100 (S-17)<br>44,900-1,42,400 (S-16)<br>41,800-1,32,300 (S-15)<br>38,600-1,22,800 (S-14)<br>35,400-1,12,400 (S-13) | 141 | ... Officer on Special Duty |

## मंत्र्यांचा स्वीय कर्मचारी वर्ग

**Ministers Personal Staff**

तक्ता २ / Table II

| अ. क्र. Sr. No. (1) | पदनाम (2) | वेतनश्रेणी Pay Band + G.P. (Rs.) (3) | पदांची संख्या No. of Posts 2025-2026 (4) | Designation (5) |
|---|---|---|---|---|
| (८) | प्रशासकीय अधिकारी ... | 57,700-1,82,400 (Level-10) | 5 | ... Administrative Officer |
| | | 1,23,100-2,15,900 (S-27) | | |
| | | 78,800-2,09,200 (S-25) | | |
| | | 67,700-2,08,700 (S-23) | | |
| | | 56,100-1,77,500 (S-20) | | |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| (९) | कार्यकारी अधिकारी ... | 78,800-2,09,200 (S-25) | 4 | ... Executive Officer |
| | | 67,700-2,08,700 (S-23) | | |
| | | 56,100-1,77,500 (S-20) | | |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| | | 44,900-1,42,400 (S-16) | | |
| (१०) | वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी ... | 78,800-2,09,200 (S-25) | 2 | ... Senior Programme Officer |
| | | 67,700-2,08,700 (S-23) | | |
| | | 56,100-1,77,500 (S-20) | | |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| (११) | कार्यक्रम अधिकारी ... | 78,800-2,09,200 (S-25) | 2 | ... Programme Officer |
| | | 67,700-2,08,700 (S-23) | | |
| | | 56,100-1,77,500 (S-20) | | |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| (१२) | सहायक अधिकारी ... | 67,700-2,08,700 (S-23) | 5 | ... Assistant Officer |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| | | 44,900-1,42,400 (S-16) | | |
| | | 41,800-1,32,300 (S-15) | | |
| | | 38,600-1,22,800 (S-14) | | |
| | | 35,400-1,12,400 (S-13) | | |
| (१३) | सचिव/सह सचिव/उप सचिव यांचे स्वीय सहायक/लघुलेखक ... | 71,100-2,11,900 (S-24) | 68 | ... Personal Assistant/ Stenographer to Secretary/Joint Secretary/Deputy Secretary |
| | | 67,700-2,08,700 (S-23) | | |
| | (अ) वरिष्ठ स्वीय सहायक | 47,600-1,51,100 (S-17) | | (A) Senior P. A. |
| | (ब) निवडश्रेणी | 44,900-1,42,400 (S-16) | | (B) Selection Grade |
| | (क) उच्चश्रेणी | 41,800-1,32,300 (S-15) | | (C) Higher Grade |
| | (ड) निम्नश्रेणी | 38,600-1,22,800 (S-14) | | (D) Lower Grade |
| | | 35,400-1,12,400 (S-13) | | |
| | | 25,500-81,100 (S-8) | | |
| (१४) | स्वीय सहायक ... | 67,700-2,08,700 (S-23) | 133 | ... Personal Assistant |
| | | 56,100-1,77,500 (S-20) | | |
| | | 49,100-1,55,800 (S-18) | | |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| | | 44,900-1,42,400 (S-16) | | |
| | | 41,800-1,32,300 (S-15) | | |
| | | 38,600-1,22,800 (S-14) | | |
| | | 35,400-1,12,400 (S-13) | | |
| | | 25,500-81,100 (S-8) | | |

## मंत्र्यांचा स्वीय कर्मचारी वर्ग

**Ministers Personal Staff**

तक्ता २ / Table II

| अ. क्र. Sr. No. | पदनाम | वेतनश्रेणी Pay Band + G.P. (Rs.) | पदांची संख्या No. of Posts 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| (१५) | कक्ष अधिकारी | ... 67,700-2,08,700 (S-23) | 13 | ... Section Officer |
| | | 56,100-1,77,500 (S-20) | | |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| (१६) | माहिती अधिकारी | ... 49,100-1,55,800 (S-18) | 2 | ... Information Officer |
| | | 41,800-1,32,300 (S-15) | | |
| | | 38,600-1,22,800 (S-14) | | |
| (१७) | सहायक कक्ष अधिकारी | ... 67,700-2,08,700 (S-23) | 22 | ... Assistant Section Officer |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| | | 38,600-1,22,800 (S-14) | | |
| (१८) | लेखा अधिकारी | ... 44,900-1,42,400 (S-16) | 1 | ... Account Officer |
| (१९) | सहायक लेखा अधिकारी | ... 41,800-1,32,300 (S-15) | 4 | ... Assistant Account Officer |
| (२०) | कनिष्ठ लेखापाल/कनिष्ठ लेखापरिक्षक | ... 35,400-1,12,400 (S-13) | 1 | ... Junior Accountant |
| (२१) | देयक लेखापाल | ... 19,900-63,200 (S-6) | 3 | ... Bill Accountant |
| (२२) | लघुटंकलेखक | ... 25,500-81,100 (S-8) | 4 | ... Steno Typist |
| (२३) | लिपिक-टंकलेखक | ... 67,700-2,08,700 (S-23) | 87 | ... Clerk-Typist |
| | | 47,600-1,51,100 (S-17) | | |
| | | 38,600-1,22,800 (S-14) | | |
| | | 21,700-69,100 (S-7) | | |
| | | 19,900-63,200 (S-6) | | |
| (२४) | वाहनचालक | ... 19,900-63,200 (S-6) | 46 | ... Driver |
| (२५) | जमादार | ... 21,700-69,100 (S-7) | 4 | ... Jamadar |
| | | 19,900-63,200 (S-6) | | |
| (२६) | चोपदार | ... 21,700-69,100 (S-7) | 44 | ... Chopdar |
| | | 19,900-63,200 (S-6) | | |
| (२७) | शिपाई | ... 19,900-63,200 (S-6) | 252 | ... Peon |
| | | 16,600-52,400 (S-3) | | |
| | | 15,000-47,600 (S-1) | | |
| | | **एकूण पदे** | **920** | **... Total Posts** |

**टीप.—** सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. एमआयएन-१२२४/प्र.क्र. १५०/मंआस्था-१, दिनांक १४ जानेवारी २०२५ व दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अन्वये मा. मुख्यमंत्री सचिवालयाच्या कार्यालयीन आस्थापनेसाठी १६४, मा. उपमुख्यमंत्री कार्यालयासाठी ७२ व मंत्रीमंडळातील प्रत्येक मंत्री कार्यालयासाठी १६ व प्रत्येक राज्यमंत्री कार्यालयासाठी १४ याप्रमाणे साविध पदे मा. मुख्यमंत्री/मा. उपमुख्यमंत्री/ मा. मंत्री /मा. राज्यमंत्री महोदयांच्या शपथविधी झाल्याच्या दिनांकापासून मंत्रिमंडळाच्या पदावधीपर्यंत निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. मंत्री मंडळातील मा. मंत्री महोदय/मा. राज्यमंत्री महोदय यांचे संख्येत बदल झाल्यास त्यांचे आस्थापनेवरील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांच्या संख्येत बदल होऊ शकतो.

## मा. मंत्रीगण मतदारसंघातील स्वीय सहायक

Ministers Personal Legislative Assistant

**तक्ता ३** / Table III

| अ.क्र. Sr. No. | पदनाम | | वेतनश्रेणी Pay Band + G.P. (Rs.) | पदांची संख्या No. of Posts 2025-2026 | | Designation |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | | (3) | (4) | | (5) |
| १ | मतदारसंघातील स्वीय सहायक | ... | 30,000 | 39 | | Legislative Personal Assistant |
| | | | **एकूण पदे . .** | **39** | **...** | **Total Posts** |

**टीप.—** मंत्रीमंडळातील मा. मंत्री महोदय/मा. राज्यमंत्री महोदय यांचे संख्येत बदल झाल्यास त्यांचे आस्थापनेवरील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांच्या संख्येत बदल होऊ शकतो.

## स्वतंत्र शाखा, सामान्य प्रशासन विभाग

### Separate Branch, General Administration Department

### तक्ता ४ / Table IV

| अ. क्र. Sr. No. | पदनाम Designation | वेतनश्रेणी/ Pay Band+G.P. | पदांची संख्या/ No. of Posts 2023-2024 | | पदनाम Designation |
|---|---|---|---|---|---|
| | | | 2023-2024 | 2024-2025 | |
| (१) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| १ | **राजपत्रित—वर्ग १ (गट अ)** | Rs. | | | *Gazetted, Class I— (Group A)* |
| | १ उप सचिव ... | S-25-78,800-2,09,200 ... | 1 | 1 | Deputy Secretary |
| | २ अवर सचिव ... | S-23-67700-208700 ... | 2 | 2 | Under Secretary |
| २ | **राजपत्रित—वर्ग २ (गट ब)** ... | ... | | | Gazetted, Class II— *(Group B)* |
| | कक्ष अधिकारी ... | S-17-47600-151100 ... | 3 | 3 | Section Officer |
| | | **एकूण पदे** | **6** | **6** | **Total posts** |
| ३ | **अराजपत्रित—वर्ग ३—(गट क)** | | | | *Non-Gazetted, Class III— (Group C)* |
| | १ रोख लेखापाल ... | S-17-47600-151100 ... | 1 | 1 | Cash Accountant |
| | २ सहायक ... | S-14-38600-122800 ... | 8 | 7 | Assistant |
| | ३ उच्च श्रेणी लघुलेखक ... | S-14-41800-132300 ... | 1 | 1 | Higher Grade Stenographer |
| | ४ निम्न श्रेणी लघुलेखक ... | S-14-38600-122800 ... | 1 | 1 | Lower Grade Stenographer |
| | ५ देयक रोखपाल ... | S-6-19900-63200 ... | 21 | 20 | Bill Accountant |
| | ... | S-14-38600-122800 ... | .. | .. | |
| | ... | S-17-47600-151100 ... | .. | .. | |
| | ६ लिपिक-टंकलेखक | S-6-19900-63200 ... | 6 | 6 | Clerk-Typist |
| | ... | S-14-38600-122800 ... | | | |
| | ७ रोखपाल ... | S-6-19900-63200 ... | 1 | 1 | Cashier |
| | ८ दूरध्वनी चालक | S-7-21700-69100 ... | 2 | 2 | Telephone Operator |
| | ९ वाहन चालक | S-6-19900-63200 ... | 1 | – | Driver |
| | | **एकूण पदे** | **42** | **39** | **Total posts** |
| ४ | **अराजपत्रित—वर्ग (४—गट ड)** | | | | |
| | १ नाईक ... | S-3-16600-52400 ... | .. | .. | Naik |
| | २ शिपाई | S-3-16600-52400 ... | 1 | 1 | Peon |
| | ३ स्वच्छक | S-3-16600-52400 ... | .. | .. | Sweeper |
| | | S-1-15000-47600 ... | .. | .. | |
| | | **एकूण पदे** ... | **1** | **1** | **Total posts** |
| | | अ. क्र. (१) व (२) | 6 | 6 | Sr. No. (1) & (2) |
| | | अ. क्र. (३) | 42 | 39 | Sr. No. (3) |
| | | अ. क्र. (४) | 1 | 01 | Sr. No. (4) |
| | | **एकूण ...** | **49** | **46** | **Grand Total** |

## राजशिष्टाचार

Protocol

सह्याद्री, हायमाऊंट व नंदगिरी राज्य अतिथी गृह

Sahyadri, Highmount and Nandgiri State Guest House

**तक्ता ४** / Table IV

| अ. क्र. Sr. No. | पदनाम Designation | वेतनश्रेणी/ Scale of Pay P.B. + G.P. | पदांची संख्या/ No. of Posts 2022-2023 | 2023-2024 | पदनाम Designation |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| १ | **राजपत्रित–वर्ग १–** | Rs. | | | *Gazetted, Class I—* |
| | स्वागत अधिकारी ... | (S-20) 56100-177500 ... | 3 | 3 | Reception Officer |
| | (नागपूर-१, पुणे-१, औरंगाबाद-१) | | | | (Nagpur-1, Pune-1, Aurangabad-1) |
| २ | **राजपत्रित–वर्ग २–** | | | | *Gazetted, Class II—* |
| | नायब तहसीलदार (औरंगाबाद-१, नागपूर-१, पुणे-१) ... | (S-14) 38600-122800 ... | 3 | 3 | Nayab Tahsildar (Aurangabad-1, Nagpur-1, Pune-1) |
| ३ | **अराजपत्रित–वर्ग ३–** | | | | *Non-Gazetted, Class III—* |
| | अव्वल कारकून ... | (S-12) 32000-101600 | 3 | 3 | Avval Clerk (Aurangabad-1) |
| | (औरंगाबाद-१, नागपूर-१, पुणे-१) ... | | | | *(Nagpur-1, Pune-1)* |
| | वाहनचालक ... | (S-6) 19900-63200 | 3 | 3 | Driver |
| | (नागपूर-१, पुणे-१, औरंगाबाद-१) ... | | | | (Nagpur-1, Pune-1, Aurangabad-1) |
| ४ | **अराजपत्रित–वर्ग ४–** | | | | *Non-Gazetted, Class IV—* |
| | शिपाई ... | (S-1) 19900-63200 ... | 3 | 3 | Peon |
| | (नागपूर-१, पुणे-१, औरंगाबाद-१) ... | | | | (Nagpur-1, Pune-1, Aurangabad-1) |
| | | **राज्य अतिथीगृहात असलेली पदे** | | | |
| १ | **अराजपत्रित–वर्ग–** | | | | *Non-Gazetted, Class II—* |
| | व्यवस्थापक ... | (S-15) 41800-132300 ... | 1 | 1 | Manager |
| २ | **अराजपत्रित–वर्ग–** | | | | *Non-Gazetted, Class III—* |
| | सहायक व्यवस्थापक ... | (S-10) 29200-92300 ... | 5 | 5 | Asst. Manager |
| | स्त्री स्वागतकार ... | (S-7) 21700-69100 ... | | | Lady Receptionist |
| | दूरध्वनी चालक ... | (S-7) 21700-69100 ... | | | Telephone Operator |
| | लिपिक-टंकलेखक ... | (S-6) 19900-63200 ... | 6 | 6 | Clerk-cum-Typist |
| | मुख्य बटलर ... | (S-6) 19900-63200 ... | 10 | 10 | Head Butler |
| | भांडारपाल ... | (S-6) 19900-63200 ... | 1 | 1 | |
| ३ | **अराजपत्रित–वर्ग–** | | | | *Non-Gazetted, Class IV—* |
| | खानसामा ... | (S-7) 21700-69100 | 7 | 7 | Khansama |
| | बटलर–१ ... | (S-5) 18000-56900 ... | | | Butler-1 |
| | बटलर–२ ... | (S-3) 16600-52400 ... | | | Butler-2 |
| | खानसामा–१ ... | (S-7) 21700-69100 ... | | | Khansama-1 |
| | खानसामा–२ ... | (S-3) 16600-52400 ... | | | Khansama-2 |
| | स्टोअरमन ... | (S-3) 16600-52400 ... | 2 | 2 | Storeman |
| | कक्ष परिचर ... | (S-2) 15300-48700 ... | | | Room Attendent |

| अ. क्र. Sr. No. | पदनाम Designation | | वेतनश्रेणी/ Scale of Pay P.B. + G.P. | | पदांची संख्या/ No. of Posts 2022-2023 | 2023-2024 | पदनाम Designation |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (2) | | (3) | | (4) | (5) | (6) |
| | शिपाई | ... | (S-2) 15300-48700 | ... | 3 | 3 | Peon |
| | बटलर | ... | (S-2) 15300-48700 | ... | 32 | 32 | Butler |
| | वेटर | ... | (S-2) 15300-48700 | ... | | | Waiters |
| | रूमबॉय | ... | (S-2) 15300-48700 | ... | | | Roomboy |
| | किचन हेल्पर | ... | (S-2) 15300-48700 | ... | 13 | 13 | Kitchen Helper |
| | पॅन्ट्रीमॅन | ... | (S-2) 15300-48700 | ... | | | Pantryman |
| | प्लेटवॉशर | ... | (S-2) 15300-48700 | ... | | | Platewasher |
| | हमाल | ... | (S-2) 15300-48700 | | | | Hamal |
| | मदतनीस | ... | (S-2) 15300-48700 | | | | Helper |
| | सफाईगार | ... | (S-2) 15300-48700 | ... | | | Sweeper |
| | मेडसर्व्हंट | ... | (S-2) 15300-48700 | ... | | | Maid Servant |
| | | | एकूण ... | | **95** | **95** | Total |

## शासकीय परिवहन सेवा

### कर्मचारीविषयक गोषवारा

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदांची संख्या 2022-2023 |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | नियंत्रक | (S-20) 56100-177500 | १ |
| | **एकूण गट अ** | | |
| २ | लेखाअधिकारी | (S-16) 44900-142400 | १ |
| ३ | कार्यालयीन अधीक्षक | (S-15) 41800-132300 | १ |
| ४ | सहा. अधीक्षक (कर्मशाळा) | (S-15) 41800-132300 | १ |
| ५ | प्रमुख लिपिक | (S-14) 38600-122800 | १ |
| ६ | सहा. लेखाअधिकारी | (S-15) 41800-132300 | २ |
| ७ | वरिष्ठ लिपिक | (S-8) 25500-81100 | ७ |
| ८ | लिपिक - टंकलेखक | (S-6) 19900-63200 | १२ |
| ९ | नोंदणी पर्यवेक्षक | (S-8) 25500-81100 | २ |
| १० | नोंदणी लिपिक | (S-6) 19900-63200 | ७ |
| ११ | वाहन चालक | (S-6) 19900-63200 | ५५ |
| १२ | कार्यदेशक | (S-10) 29200-92300 | १ |
| १३ | मुख्य यांत्रिक | (S-8) 25500-81100 | १३ |
| १४ | सहायक यांत्रिक | (S-6) 19900-63200 | १२ |
| १५ | प्रमुख विजतंत्री (मृत संवर्ग) | (S-8) 25500-81100 | ० |
| १६ | विजतंत्री तथा वातानुकुलित यांत्रिक | (S-6) 19900-63200 | २ |
| १७ | सज्जक | (S-8) 25500-81100 | १ |
| १८ | सहा. सज्जक (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| १९ | विजेरीकार (मृत संवर्ग) | (S-8) 25500-81100 | ० |
| २० | सहा. विजेरीकार (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| २१ | सुतार तथा बॉडी दुरुस्तीकार | (S-6) 19900-63200 | १ |
| २२ | जोडणीकार | (S-8) 25500-81100 | १ |
| २३ | कातारी (मृत संवर्ग) | (S-8) 25500-81100 | ० |
| २४ | सहा. कातारी (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| २५ | तुषार चितारी | (S-8) 25500-81100 | ० |
| २६ | सहा. तुषार चितारी | (S-6) 19900-63200 | ० |
| २७ | कथिलगार | (S-8) 25500-81100 | १ |
| २८ | सहा. कथिलगार | (S-6) 19900-63200 | १ |
| २९ | लोहार | (S-8) 25500-81100 | १ |
| ३० | सहा. लोहार (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| ३१ | संधारक (मृत संवर्ग) | (S-8) 25500-81100 | ० |
| ३२ | सहा. संधारक (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदांची संख्या 2022-2023 |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ३३ | सहा. रेडीयेटर यांत्रिक (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| ३४ | टायरमन (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| ३५ | भांडारपाल | (S-7) 21700-69100 | १ |
| ३६ | भांडार सहाय्यक | (S-6) 19900-63200 | १ |
| ३७ | भांडार खरेदीदार (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| ३८ | वेचणीकार (मृत संवर्ग) | (S-6) 19900-63200 | ० |
| ३९ | समयपाल | (S-6) 19900-63200 | १ |
| ४० | कुशल सहायक | (S-3) 16600-52400 | ११ |
| ४१ | अकुशल कामगार (मृत संवर्ग) | (S-1) 15000-47600 | ० |
| ४२ | सहा. टायरमन (मृत संवर्ग) | (S-3) 16600-52400 | ० |
| ४३ | खरवडणारा (मृत संवर्ग) | (S-3) 16600-52400 | ० |
| ४४ | शिपाई (मृत संवर्ग) | (S-1) 15000-47600 | ० |
| ४५ | पहारेकरी (मृत संवर्ग) | (S-1) 15000-47600 | ० |
| ४६ | सफाईगार (मृत संवर्ग) | (S-1) 15000-47600 | ० |
| | | **एकूण . .** | **१३८** |

**टिप.**—शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवर खालील मनुष्यबळ संख्येच्या मर्यादित गट-ड संवर्गात खालील पदनामांच्या बहूउद्देशिय स्वरुपाच्या सेवा (Multi tasking) सेवा आवश्यकतेनुसार बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

**अधिसंख्य पदे**

| अ. क्र. | सेवा | | संख्या |
|---|---|---|---|
| १ | अकुशल कामगार, स्वच्छक, धुणारा, हमाल | | ६ |
| २ | शिपाई | | ४ |
| ३ | पहारेकरी | | ३ |
| ४ | सफाईगार | | ४ |
| | | **एकूण ..** | **१७** |
| ५ | खरवडणारा | | + १ |
| | | **एकूण ..** | **१८** |

अधिसंख्य पदे १८ मंजूर असून १७ मनुष्यबळ संख्येच्या मर्यादित गट-ड संवर्गात बहुउद्देशिय आवश्यकतेनुसार बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

## निवासी आयुक्त व सचिव कार्यालय, महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली यांचे आस्थापनेवरील दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी अस्तित्वात असलेल्या पदांचा तपशील

| अ. क्र. Sr. No. | पदनाम | | वेतनस्तर Pay level | पदांची संख्या/ No. of Posts 2024-2025 | पदनाम Designation |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) |
| १ | **राजपत्रित, वर्ग-अ** | | | | 1.Gazetted - (Class-A) |
| | निवासी आयुक्त व सचिव | | (संवर्ग पद) | १ | Resident Commissioner & Secretary |
| | अप्पर निवासी आयुक्त | ... | (संवर्ग पद) | १ | Additional Resident Commissioner |
| | सहाय्यक निवासी आयुक्त (राजशिष्टाचार व सुरक्षा) | ... | | ३ | Assistant Resident Commissioner (Protocol & Security) |
| | सहाय्यक निवासी आयुक्त (संपर्क व गुंतवणूक) | | | | Assistant Resident Commissioner (Liaison & Investment ) |
| | सहाय्यक निवासी आयुक्त (प्रशासन) | | | | Assistant Resident Commissioner (Administration ) |
| २ | **राजपत्रित, वर्ग-ब** | | | | |
| | सहाय्यक लेखा अधिकारी | | S-१५ (संवर्ग पद) | १ | Assistant Accounts Officer |
| | व्यवस्थापक | ... | S-१५ | १+१ | Manager, |
| ३ | **अराजपत्रित, वर्ग-ब** | ... | | | |
| | उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी/ इंग्रजी) | ... | S-१५ | ३ | Higher Grade Stenographer (Marathi / English) |
| | वरिष्ठ सहाय्यक कक्ष अधिकारी | | S-१४ | ३+२ | Senior Assistant Desk Officer |
| | निम्नंश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) | ... | S-१४ | १+१ | Lower Grade Stenographer (English) |
| | | ... | | | |
| | उप लेखापाल | | S-१३ (संवर्ग पद) | १ | Deputy Accountant |
| | कनिष्ठ सहाय्यक कक्ष अधिकारी | ... | S-१३ | ८+१ | Junior Assistant Desk Officer |
| ४ | **गट-क** | ... | | | |
| | वरिष्ठ लिपिक / रोखपाल | | S-८ | ४+२ | Senior Clerk / Cashier |
| | लिपिक-टंकलेखक | ... | S-६ | ६+३ | Clerk Typist |
| | वाहन चालक | ... | S-६ | ९ | Driver |
| ५ | **गट-ड** | ... | | | |
| | जावकस्वार | | S-५ | १ | Dispatch Rider |
| | शिपाई | ... | S-१ | ६ | Peon |
| | कक्षबंध परिचारक | ... | S-1 | १६ | Room Attendant |
| | | | **एकूण ...** | ७५ | **Total** |

## कार्यक्रम क्रमांक ५

### महाराष्ट्र लोकसेवा आयोग

आयोग ही भारतीय संविधानानुसार निर्माण केलेली संस्था आहे व तिची कार्ये संविधानाच्या ३२० च्या अनुच्छेदात निर्दिष्ट आहेत. त्यात मुख्यत्त्वे शासनाच्या नियंत्रणाखालील पदे व सेवा ह्याकरिता सेवाप्रवेश व राज्य शासनाला पुढील बाबींवर सल्ला देणे :- (१) राज्यातील विविध सेवांमध्ये नियुक्ती करण्याकरिता परीक्षा घेणे (२) या पदासाठी सेवेतील सेवाप्रवेश नियमित करण्याचे नियम, (३) नियुक्त्या, पदोन्नत्त्या व बदल्या करताना अनुसरावयाची तत्त्वे आणि अशा नियुक्त्या, पदोन्नत्त्या व बदल्यांकरिता उमेदवारांची योग्यता, (४) शासकीय कर्मचाऱ्यासंबंधीची सर्व शिस्तभंगविषयक प्रकरणे, (५) शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्याची अंमलबजावणी करीत असताना त्यांच्याविरुद्ध चाललेल्या न्यायालयीन कार्यवाहीच्या बचावाकरिता केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मागण्या, (६) सेवेत असताना झालेल्या इजांबद्दल निवृत्तिवेतन पुरस्काराच्या मागण्या यांचा समावेश आहे.

याशिवाय बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ८०-ब नुसार आयोगाकडे महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील कार्यकारी अभियंता अथवा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या पदावरील सेवाप्रवेशाचे व बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम ह्यांच्या नियंत्रणाखालील सचिव गट-अ ह्या वेतनश्रेणीतील अथवा त्याहून वरिष्ठ असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पदावरील सेवाप्रवेशाचे अतिरिक्त कार्य सोपविले आहे.

संविधानानुसार आयोगाचा सर्व खर्च व आयोगाचे सदस्य व कर्मचारीवृंद यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च राज्याच्या एकत्रित निधी (भारित) मधून भागविण्यात येतो.

### कार्यभाराचा सारांश व वित्तिय खर्चाबाबत.

**स्पर्धा परीक्षा :—**

अ. सन २०२३-२४ किंवा त्यापूर्वीच्या वर्षात घेण्यात आलेल्या २४४९ रिक्त पदांसाठी बारा स्पर्धा परीक्षांची उर्वरित कार्यवाही २०२४-२०२५ (दिनांक ३१ मार्च २०२५) अखेर पूर्ण झाली, सदर परीक्षांसाठी एकूण ४,३७,२५९ आवेदनपत्रे प्राप्त झाली ३१३,२६३ उमेदवार परीक्षेस बसले, २५,४४७ उमेदवार लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त होऊन ४३२६ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या व २४०७ उमेदवारांच्या शिफारशी करण्यात आल्या. सदर परीक्षांच्या उर्वरित कार्यवाहीकरिता एकूण ११,८९,३५६ रुपये इतका खर्च झाला.

आ. सन २०२४-२०२५ किंवा त्यापूर्वीच्या वर्षात घेण्यात आलेल्या ११,२३३ रिक्त पदांसाठी आठ स्पर्धा परीक्षांची कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ अखेर पूर्ण झाली, यामध्ये तीन पूर्व व पाच मुख्य परीक्षा होत्या. सदर परीक्षांतील वेगवेगळ्या पदांसाठी एकूण ८,२०,१२८ आवेदनपत्रे प्राप्त झाली, ६,९६,३८७ उमेदवार परीक्षेस बसले, २,९६,५११ उमेदवार लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त होऊन ३३८४ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या व ७९२६ उमेदवारांच्या शिफारशी करण्यात आल्या. सदर परीक्षांच्या उर्वरित कार्यवाहीकरिता एकूण ३०,३२,५३,६१९ रूपये इतका खर्च झाला.

इ. सन २०२४-२०२५ किंवा त्यापूर्वीच्या वर्षात घेण्यात आलेल्या १२२४ रिक्त पदांसाठी चार स्पर्धा परीक्षांची उर्वरित कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ अखेर अपूर्ण राहिली, त्यामध्ये तीन मुख्य व एक मर्यादित विभागीय परीक्षा होती. सदर परीक्षांसाठी एकूण १७,१०७ आवेदनपत्रे प्राप्त झाली, १६,३३८ उमेदवार परीक्षेस बसले, सदर परीक्षांची कार्यवाही अद्याप अपूर्ण होती. सदर परीक्षांच्या कार्यवाही करीता एकूण १,८७,७७,२३४ रुपये इतका खर्च झालेला आहे.

ई. सन २०२५-२०२६ (माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत) मध्ये घेण्यात आलेल्या २४४७ रिक्त पदांसाठी पाच मुख्य स्पर्धा परीक्षांची कार्यवाही माहे ऑगस्ट, २०२५ अखेर अपूर्ण होती. सदर परीक्षांसाठी एकूण ५१,६१५ आवेदनपत्रे प्राप्त झाली. सदर परीक्षांच्या कार्यवाहीकरिता एकूण १,०६,३९,५५२ रुपये इतका खर्च झाला.

● **सरळसेवा :—**

अ. सन २०२४-२५ मध्ये शासनाच्या सरळसेवेच्या शिफारशींबाबत ७५१ विज्ञापित जागांसाठी ३६,९७५ आवेदनपत्रे प्राप्त झाली. त्यामधून २०५२ उमेदवारांच्या मुलाखती झाल्या व ६६० उमेदवारांची शिफारस करण्यात आली. सन २०२४-२५ या वर्षात १३१ पदांच्या सहा संवर्गासाठी चार चाळणी परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षांसाठी ५१,११६ आवेदनपत्रे प्राप्त झाली.

आ. सन २०२५-२६ मध्ये (माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत) शासनाच्या सरळसेवेच्या शिफारशींबाबत, ४५४ विज्ञापित पदांसाठी ७३०४ आवेदनपत्रे प्राप्त झाली. त्यामधून १०३२ उमेदवारांच्या मुलाखती झाल्या व ३१७ उमेदवारांची शिफारस करण्यात आली. तसेच ५५६ पदांच्या ४७ संवर्गांसाठी १९ चाळणी परीक्षा घेण्यात आल्या. सदर परीक्षांसाठी ३५,४५९ आवेदनपत्रे प्राप्त झाली.

इ. दि. १ एप्रिल, २०२४ ते ३१ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत आयोगामार्फत आयोजित चाळणी परीक्षांकरीता एकूण २,७६,६१,२०४- इतका खर्च आला.

● **विभागीय चौकशी व सेवा प्रवेश नियम :—**

अ. सन २०२४-२५ मध्ये शासनाकडून शिस्तभंगाची कारवाई, असाधारण निवृत्तीवेतन व देयक खर्चाची प्रतिपूर्ती, इजा निवृत्तीवेतन प्रदान करण्याच्या मागण्यांच्या ६०२ प्रकरणांपैकी १२९ प्रकरणी आयोगाने सल्ला दिला व ४७३ प्रकरणे अनुशेष राहिली. तसेच सन २०२५-२६ (माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत) मध्ये ८४ प्रकरणांपैकी २५ प्रकरणी आयोगाने सल्ला दिला व ५९ प्रकरणे अनुशेष राहिली.

आ. सन २०२४-२५ मध्ये शासनाकडून नियुक्ती, बदलीने नियुक्ती आणि पुनर्नियुक्तीबाबत आयोगाने दिलेल्या सल्ल्याचा समावेश असलेल्या १६ प्रकरणांपैकी एका प्रकरणी आयोगाने सल्ला दिला व १५ प्रकरणे अनुशेष राहिली. तसेच सन २०२५-२६ (माहे ऑगस्ट, २०२५पर्यंत) मध्ये प्राप्त एका प्रकरणी आयोगाने सल्ला दिला.

इ. सन २०२४-२५ मध्ये शासनाकडून निवडसूची तयार करण्याच्या समावेश असलेल्या ८८ प्रकरणांपैकी ३३ प्रकरणी आयोगाने सल्ला दिला व ५५ प्रकरणे अनुशेष राहिली. तसेच सन २०२५-२६ (माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत) मध्ये प्राप्त सात प्रकरणे अनुशेष राहिली.

ई. सन २०२४-२५ मध्ये शासनाकडून सेवाप्रवेश नियम व इतर संकीर्ण प्रकरणांचा समावेश असलेल्या १३४ प्रकरणांपैकी ५४ प्रकरणी आयोगाने सल्ला दिला व ८० प्रकरणे अनुशेष राहिली. तसेच सन २०२५-२६ (माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत) मध्ये प्राप्त ९ प्रकरणे अनुशेष राहिली.

उ. याव्यतिरीक्त सन २०२४-२५ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम कडून प्राप्त नियुक्ती, बदलीने नियुक्ती आणि पुनर्नियुक्तीबाबत १६४ प्रकरणांपैकी पाच प्रकरणी आयोगाने सल्ला दिला व १५९ प्रकरणे अनुशेष राहिली. तसेच सन २०२५-२६ (माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत) प्राप्त दोन प्रकरणे अनुशेष राहिली.

(टीप— अनुशेष प्रकरणांपैकी काही प्रकरणी परिपूर्ण माहिती प्राप्त नसल्याने शासनास पुनःसंदर्भ करण्यात आलेला आहे, तर काही प्रकरणी कार्यवाही सुरू आहे.)

तक्ता-एक

# TABLE-I

(५) वित्तीय आवश्यकता

## (v) Financial Requirements

## (५) वित्तीय आवश्यकता
## (V) Financial Requirements

(रुपये हजारात/ Rs. in thousand)

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | A— Activity Classification |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्याचे वर्गीकरण– ... | | | | | (1) Activity Classification— |
| २ | (अ) राज्य लोकसेवा आयोग ... | 915586 | 1266248 | 1221723 | 1312125 | (2) (A) State Public Service Commission. |
| | (ब) विभागीय परीक्षा ... | 0 | 2 | 2 | 2 | (B) Departmental Exam. |
| | **ए-३ २०५१ लोकसेवा आयोग एकूण (अ + ब)** ... | **915586** | **1266250** | **1221725** | **1312127** | A-3 2051 Public Service Commission. |

तक्ता-दोन

# TABLE-II

(२) कार्यभाराचा सारांश आणि वित्तीय आवश्यकतांचे स्पष्टीकरण

## (ii) Work-load summary and explanation to the financial requirement

## तक्ता क्रमांक ५

Table 5

| अ. क्र. Sr. No. | पदनाम Name of the Post | वेतनस्तर/ Pay Scale | पदासंख्या/ Strength of the staff as on 1-4-2024 | पदासंख्या/ Strength of the staff as on 31-3-2025 | पदाचे नाव Name of the Post |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Chairman | 2,25,000 | 1 | 1 | अध्यक्ष |
| 2 | Members | 2,01,300 | 5 | 5 | सदस्य |
| | *Gazetted—* | | | | **राजपत्रित–** |
| 1 | Secretary (Group A) | 123100-215900 (S-27) | 1 | 1 | सचिव (गट-अ) |
| 2 | Joint Secretary (Group A) | 123100-215900 (S-27) | 2 | 2 | सह सचिव (गट-अ) |
| 3 | Deputy Secretary (Group A) | 78800-209200 (S-25) | 7 | 7 | उप सचिव (गट-अ) |
| 4 | Legal Officer (Group A) | 67700-208700 (S-23) | 1 | 1 | विधी अधिकारी (गट-अ) |
| 5 | Examination Research Officer (Group A) | 56100-177500 (S-20) | 1 | 1 | परीक्षा संशोधन अधिकारी (गट-अ) |
| 6 | Under Secretary(Group A) | 67700-208700 (S-23) | 15 | 15 | अवर सचिव (गट-अ) |
| 7 | System Analyst (Group A) | 49100-155800 (S-18) | 1 | 1 | प्रणाली विश्लेषक (गट-अ) |
| 8 | P.A. to Chairman (Group B) | 44900-142400 (S-16) | 1 | 1 | अध्यक्षांचे स्वीय सहायक (गट-ब) |
| 9 | Desk Officer (Group B) | 47600-151100 (S-17) | 25 | 25 | कक्ष अधिकारी (गट-ब) |
| 10 | Accounts Officer (Group B) | 44900-142400 (S-16) | 1 | 1 | लेखा अधिकारी (गट-ब) |
| 11 | Research Officer (Statistics) (Group B) | 44900-142400 (S-16) | 1 | 1 | संशोधन अधिकारी (सांख्यिकी), (गट-ब) |
| 12 | Information Technology Officer | * | 1* | 1* | माहिती व तंत्रज्ञान अधिकारी# |
| 13 | Senior Legal Officer# | 78800-209200 (S-25) | 1# | 1# | वरिष्ठ विधी अधिकारी # |
| 14 | Public Relation Officer# | 41800-132300 (S-15) | 1# | 1# | जनसंपर्क अधिकारी # |
| | *Non-Gazetted, (Group B)* | | | | **अराजपत्रित (गट-ब)** |
| 15 | Legal Assistant (Group-B) | 41800-132300 (S-15) | 1 | 1 | विधी सहायक (गट-ब) |
| 16 | Stenographer (Higher Grade) | 44900-142400 (S-16) | 7 | 7 | लघुलेखक (उच्च श्रेणी) |
| 17 | Stenographer (Lower Grade) | 41800-132300 (S-15) | 2 | 2 | लघुलेखक (निम्नश्रेणी) |
| 18 | Assistants Desk Officer | 44900-142400 (S-16) | 96 | 96 | सहायक कक्ष अधिकारी |
| 19 | Programmer | 38600-122800 (S-14) | 2 | 2 | प्रोग्रामर |
| | *Non-Gazetted, (Group C)* | | | | **अराजपत्रित (गट-क)** |
| 20 | Data Entry Operator | 35400-112400 (S-13) | 3 | 3 | डाटा -एन्ट्री ऑपरेटर |
| 21 | Librarian | 29200-92300 (S-10) | 1 | 1 | ग्रंथपाल |
| 22 | Statistical Assistant | 29200-92300 (S-10) | 1 | 1 | सांख्यिकी सहायक |
| 23 | Clerk-Typist | 19900-63200 (S-6) | 64 | 64 | लिपिक-टंकलेखक |
| 24 | Driver | 19900-63200 (S-6) | 8 | 8 | वाहन चालक |
| 25 | Chopdar | 19900-63200 (S-6) | 1 | 1 | चोपदार |

| अ. क्र. Sr. No. | पदनाम Name of the Post | वेतनस्तर/ Pay Scale | पदासंख्या/ Strength of the staff as on 1-4-2024 | पदासंख्या/ Strength of the staff as on 31-3-2025 | पदाचे नाव Name of the Post |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | *Non-Gazetted, (Group D)* | | | | **अराजपत्रित (गट-ड)** |
| 26 | Naik .. | 16600-52400 (S-3) .. | 7 | 7 | नाईक |
| 27 | Peon .. | 15000-47600 (S-1) .. | 15 | 15 | शिपाई |
| 28 | Hamal .. | 15000-47600 (S-1) .. | 6 | 6 | हमाल |
| 29 | Sweeper .. | 15000-47600 (S-1) .. | 1 | 1 | सफाईगार |
| | | Grand Total | 274 | 274 | एकूण बेरीज |

* माहिती व तंत्रज्ञान अधिकारी ०१ पद , सा.प्र.वि. शासन निर्णयःक्र. मलोआ-११२१/प्र.क्र.१४८/का.८ दिनांक ०२ फेब्रुवारी , २०२४ अन्वये बाह्य यंत्रणेद्वारे भरावयाचे असल्याने नियमित वेतनश्रेणी दर्शविण्यात आलेली नाही.

# सा . प्र . वि . शासन निर्णय क्र. मलोआ-११२१/प्रक्र.१४८/का.८ दिनांक २८ फेब्रुवारी , २०२४ अन्वये वरिष्ठ विधी अधिकारी ०१ पद हे विधि व न्याय विभागाकडून प्रतिनियुक्तीने/बदलीने ( नियमित पद ) व जनसंपर्क अधिकारी ०१ पद प्रतिनियुक्तीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील माहिती अधिका-ज्याची प्रतिनियुक्ती ( नियमित पद ) अशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाकरिता निर्मित करण्यात आली आहेत.

## कार्यक्रम क्रमांक ६

## इतर कार्यालये

### (१) लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त यांचे कार्यालय (२०७० ००८५)

१. लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त अधिनियम, १९७१ महाराष्ट्र राज्यात दिनांक २ ऑक्टोबर १९७२ पासून अंमलात आला. या अधिनियमाच्या तरतुदींनुसार लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त यांचे कार्यालय प्रस्थापित झाले आणि दिनांक २५ ऑक्टोबर १९७२ पासून या कार्यालयाच्या कामकाजास सुरुवात झाली. महाराष्ट्र शासनाने किंवा शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या किंवा महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखालील महामंडळे, कंपन्या यांसारख्या काही प्राधिकारी संस्थांतर्फे करण्यात आलेल्या प्रशासकीय कार्यवाहीसंबंधीच्या जनतेच्या गाऱ्हाण्यांची आणि लाचलुचपत अभिकथनाच्या तक्रारींची चौकशी या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त यांना करता येते. या कामासाठी लोक आयुक्त कार्यालयात विविध संवर्गातील ९० पदे मंजूर आहेत.

२. ज्या तक्रारी/अभिकथनाबद्दल मा. लोक आयुक्त व मा. उप-लोक आयुक्त यांच्यामार्फत केलेल्या अन्वेषणाअंती केलेली शिफारस ही सक्षम प्राधिकाऱ्यास मान्य करता आली नाही व त्यामुळे मा. लोक आयुक्त आणि उप-लोक आयुक्त यांचे समाधान झाले नाही तर महाराष्ट्र लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त अधिनियमाच्या कलम १२ (५) अन्वये मा. लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त यांच्या शिफारशींबाबतचा त्यांचा विशेष अहवाल मा.राज्यपाल यांच्याकडे पाठवितात. त्या विशेष अहवालातील शिफारशीवर योग्य ती कार्यवाही करण्यात येते व त्याबाबतचे शासनाचे अभिप्राय स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या स्वरूपात तयार करण्यात येऊन ते विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या पटलावर ठेवण्यात येतात.

३. महाराष्ट्र, लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १२ (६) प्रमाणे मा. लोक आयुक्त आपले वार्षिक अहवाल सादर करीत असतात. त्यातील शिफारशींवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून योग्य ती कार्यवाही केली जाते व त्याबाबतचे अभिप्राय स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या स्वरूपात तयार केले जातात. महाराष्ट्र लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १२ (७) नुसार वार्षिक अहवाल व त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या पटलावर ठेवले जातात.

### (२) नागरिक संरक्षण समिती (महाराष्ट्र) (२०७० ००९४)

सन १९६२ सालच्या चिनी आक्रमणाच्या वेळी नागरिक संरक्षण समिती (महाराष्ट्र) ची स्थापना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. सीडीसी/१०६२/पाच, दिनांक २ नोव्हेंबर १९६२ अन्वये करण्यात आली होती. समितीची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणेः—

(अ) संरक्षणविषयक प्रयत्न कार्यान्वित करणे, लोकांचे मनोधैर्य वाढविणे, अफवा पसरविणे/ अन्नधान्य साठेबाजी इत्यादी अनिष्ट गोष्टींना आळा घालणे.

(ब) राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी जास्तीत जास्त निधी गोळा करणे.

(क) तरुणांना सैन्य दलात भरती होण्यासाठी प्रवृत्त करणे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे नागरिक संरक्षण समिती या न्यासाचे पदसिद्ध अध्यक्ष असून, समितीच्या सदस्यांमध्ये, राजकीय पक्षांचे नेते, प्रतिष्ठित नागरिक, उद्योगपती, पत्रकार तसेच उच्चपदस्थ शासकीय अधिकारी यांचा समावेश होता. सन १९६५ व सन १९७१ च्या भारत-पाक युद्ध प्रसंगी समितीने वर नमूद केलेली कार्ये पार पाडली होती. तसेच ज्या जवानांना युद्धाची झळ पोहोचली त्यांना व त्यांच्यावर अवलंबित असलेल्यांचे पुनर्वसन तथा त्यांना विविध सोयी उपलब्ध करून दिल्या होत्या. तद्नंतर असे प्रसंग न उद्भवल्याने उक्त नागरिक संरक्षण समिती सुप्तावस्थेत आहे. तिचे पुनर्गठन झालेले नाही. नागरिक संरक्षण समिती (महाराष्ट्र) या कार्यालयीन आस्थापनेवर १ लिपिक-टंकलेखक व १ शिपाई अशी एकूण दोन पदे मंजूर आहेत. सदरची आस्थापना सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली आहे.

**जवान कल्याण विश्वस्त मंडळ** (महाराष्ट्र) मासैक (विषय हस्तांतरणामुळे)

नागरिक संरक्षण समितीच्या दिनांक ११ डिसेंबर १९७१ च्या बैठकीत जवान कल्याण विश्वस्त मंडळ (महाराष्ट्र) या सार्वजनिक न्यासाच्या स्थापनेबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जानेवारी, १९७२ मध्ये सदर न्यासाची स्थापना करण्यात आली. न्यासाची ध्येय/ उद्दिष्टे पुढीलप्रमाणेः—

(अ) महाराष्ट्रातील रहिवासी असलेले जे सैनिक, कर्मचारी सेवेत असता मारले गेले अथवा ज्यांना नैसर्गिक मृत्यू आला, अशा जवानांवर अवलंबून असलेल्या कुटुंबियांचे पुनर्वसन करणे, त्यांना प्रगत करणे, त्यांच्या सर्वसाधारण कल्याणार्थ सहाय्य करणे.

(ब) सैनिकांच्या कल्याणार्थ योजनांकरिता निधी गोळा करणे, इत्यादी.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे न्यासाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. विश्वस्त म्हणून इतर सात व्यक्तींची नियुक्ती करण्यात येते. त्यामध्ये राजकीय व्यक्ती, माजी सैनिक अधिकारी, शासकीय/सार्वजनिक क्षेत्रातील मान्यवर अशा प्रतिष्ठित व्यक्तींचा समावेश असतो. नागरिक संरक्षण समितीने सर्व प्रकारे जमा केलेला निधी, जवान कल्याण विश्वस्त मंडळ (महाराष्ट्र) या न्यासामध्ये वर्ग करण्यात आला आहे. मंडळाचा मूळ निधी रुपये १.२३ कोटी आहे. मूळ निधी व त्यावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयीकृत बँकेत बचत खात्यात ठेवण्यात आलेली आहे. दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जवान कल्याण विश्वस्त मंडळाच्या बँकेच्या बचत खात्यावर मूळ निधी व त्यावरील व्याज मिळून रु. ४.३६ कोटी इतकी रक्कम जमा आहे.

**(३) जनगणना (३४५४ ०३४९)**

भारतीय संविधानानुसार जनगणना हा विषय सर्वस्वी केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असून, राज्यात जनगणनेसंबंधीचे कामकाज केंद्र शासनाच्या सुचनेनुसार पार पाडले जाते. भारताची जनगणना दर दहा वर्षांनी होत असते. जनगणनेच्या कामाचा खर्च भागविण्यासाठी १००% निधी केंद्र शासनाकडून राज्य शासनास उपलब्ध करून दिला जातो. राज्यात जनगणनेसाठी केवळ आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिलेल्या निधीचे वाटप करणे, इत्यादी कार्यवाही राज्य शासनाकडून केली जाते. जनगणना कर्मचाऱ्यांना ओळखपत्र, साधनसामग्री देणे तसेच कामाचे नियोजन, कामाची विभागणी ह्या सर्व बाबी केंद्र शासनाशी संबंधित आहेत.

केंद्र शासनाने जनगणना-२०२७ करण्याला निर्णय घेतला असून त्याबाबतची अधिसूचना गृह मंत्रालय भारत सरकार यांनी केंद्र शासनाच्या अधिकृत **राजपत्रात** दि. १६ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाने देखील अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत **राजपत्रात** दिनांक ३० जून २०२५ रोजी पुर्नप्रकाशीत करण्यात आलेली आहे. सदर अधिसूचने नुसार जनगणना २०२७ चे कामकाज पुर्ण करण्यात येणार आहे.

**(४) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (२०७० ०५३२)**

१. राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सेवांतर्गत पायाभूत प्रशिक्षण देण्यासाठी दिनांक १ जून १९८४ पासून क्रमांक एएससी १८८४/९९९/(९)/६, दिनांक २४ मे १९८४ च्या आदेशानुसार महाराष्ट्र विकास प्रशासन संस्था, पुणे ही संस्था स्थापन करण्यात आली. ८ मे १९८६ रोजी सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० अन्वये सदर संस्थेची नोंदणी करण्यात आली.

दिनांक २६ नोव्हेंबर १९९० पासून सदर नोंदणीकृत संस्थेचे नामाधिधान "यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)" असे करण्यात आले. "यशदा" या प्रशिक्षण संस्थेने एकूण सुमारे ५.५८ हेक्टर क्षेत्रफळाची जमीन पुणे येथील बाणेर रोड येथे व्यापली आहे. राज्य शासनाने ही जमीन यशदाकडे हस्तांतरित केलेली आहे.

२. महाराष्ट्र राज्यामध्ये स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ रुरल डेव्हलपमेंट (एस.आय.आर.डी.) अशी स्वतंत्र संस्था अस्तित्त्वात नाही, त्यामुळे एस.आय.आर.डी. चे कार्य यशदा करते.

३. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (यशदा) ही स्वायत्त संस्था असून सदर संस्था राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत शिखर संस्था म्हणून कार्यरत आहे. यशदा राज्याच्या गट-अ च्या अधिकाऱ्यांना सेवांतर्गत व प्रशासकीय प्रशिक्षण देते. या संस्थेस शासनाकडून एकत्रित ठोस अनुदान देण्यात येते.

४. सामान्य प्रशासन विभागाकडून यशदाला मागील ५ वर्षांमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे अनुदान देण्यात आले आहे.

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | सहाय्यक अनुदान योजनेत्तर | सहाय्यक अनुदान योजनांतर्गत | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | २०२१-२२ | २९४.०३ | ... | २९४.०३ |
| २. | २०२२-२३ | २७४.४३ | ... | २७४.४३ |
| ३. | २०२३-२४ | २७४.४३ | ... | २७४.४३ |
| ४. | २०२४-२५ | २७४.४३ | ... | २७४.४३ |
| ५. | २०२५-२६ | २६२.३४ | ... | २६२.३४ |

(ऑक्टोबर, २०२५ पर्यंत)

५. मागील ५ वर्षांचा प्रशिक्षण सत्राविषयीचा तपशील पुढीलप्रमाणे आहेः—

| वर्षे | प्रशिक्षण सत्रे | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|
| २०२१-२०२२ | ५३९ | २०७४८ |
| २०२२-२०२३ | ६२५ | २७४३० |
| २०२३-२०२४ | २६६ | १३२६० |
| २०२४-२०२५ | ३७ | १८६४ |
| २०२५-२०२६ | १६ | ६४६ (ऑक्टोबर, २०२५ अखेर) |

संस्थांमध्ये इतर प्रकारचे होणारे प्रशिक्षण आणि राज्य प्रशिक्षण धोरणानुसार होणारे प्रशिक्षण यांचा एकत्रित तपशील सादर करण्यात आला आहे.

**(५) मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर (२०७० ०७४६) (२०७० ०६७५)**

यशदाच्या धर्तीवर मराठवाड्यात पैठण येथील जायकवाडी प्रकल्पाच्या वसाहतीच्या इमारतीत प्रादेशिक स्तरावर गट-ब व गट-क च्या कर्मचाऱ्यांना कार्यविषयक प्रशिक्षण (On Job Training) तसेच व्यवस्थापन प्रशिक्षण (Management Training) देण्यासाठी "मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी", नाथनगर (उत्तर), पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर या संस्थेची स्थापना मराठवाडा विभागाकरिता दिनांक १८ जून १९९६ रोजी करण्यात आली. सदर संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० नुसार नोंदणीकृत स्वायत्त संस्था करण्यात आली आहे. या संस्थेच्या आस्थापनेवर २० पदे आहेत. प्रशिक्षण कार्यक्रम सन १९९७ पासून सुरू झाले.

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, जि. छत्रपती संभाजीनगर या संस्थेस पुढीलप्रमाणे सहाय्यक अनुदान वितरीत करण्यात आले.

(रुपये लाखांत)

| आर्थिक वर्ष | सहाय्यक अनुदान (कार्यक्रम) | सहाय्यक अनुदान (अनिवार्य) |
|---|---|---|
| २०२१-२०२२ | — | ५०.१७ |
| २०२२-२०२३ | २०.७९ | ४५.९२ |
| २०२३-२०२४ | ४६.१० | ३३.३७ |
| २०२४-२०२५ | ९.२२ | ६४.६१ |
| २०२५-१०१६ | – | ७२.४० (ऑक्टोबर, २०२५ पर्यंत) |

मागील पाच वर्षांचा सदर संस्थेतील प्रशिक्षणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहेः—

| वर्षे | प्रशिक्षण सत्रे | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|
| २०२१-२०२२ | ३५ | ९९८ |
| २०२२-२०२३ | ३९ | १५५७ |
| २०२३-२०२४ | ३७ | १३२७ |
| २०२४-२०२५ | २८ | ९९८ |
| २०२५-२०२६ | ३४ | १४३८ (ऑक्टोबर, २०२५ पर्यंत) |

**(६) डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (अमरावती) (२०७० ०७५५) (२०७० ०६८४)**

अमरावती येथे यशदाच्या धर्तीवर विदर्भ विभागातील गट-ब व गट-क च्या अधिकारी व कर्मचारी यांना कार्यविषयक प्रशिक्षण (On Job Training) तसेच व्यवस्थापन प्रशिक्षण (Management Training) देण्यासाठी “विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती” या संस्थेची सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ७ डिसेंबर १९९६ च्या शासन निर्णयान्वये विदर्भ विभागाकरिता स्थापना करण्यात आली.

या संस्थेस पुढीलप्रमाणे सहाय्यक अनुदान वितरित केले आहे :—

(रुपये लाखांत)

| आर्थिक वर्ष | सहाय्यक अनुदान (कार्यक्रम) | सहाय्यक अनुदान अनिवार्य |
|---|---|---|
| २०२१-२०२२ | २२२.०८ | ६५.७२ |
| २०२२-२०२३ | निरंक | ४१.८५ |
| २०२३-२०२४ | निरंक | ५५.२९ |
| २०२४-२०२५ | निरंक | ९६.४२ |
| २०२५-२०२६ | निरंक | ११०.४४ |

(माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत वितरित.)

प्रशिक्षणाबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

| वर्ष (१) | प्रशिक्षण सत्रे (२) | प्रशिक्षणार्थी (३) |
|---|---|---|
| २०२१-२०२२ | ९७ | ३६७९ |
| २०२२-२०२३ | २२८ | १०८०८ |
| २०२३-२०२४ | ११५ | ६२२२ |
| २०२४-२०२५ | १२९ | ८१३२ |
| २०२५-२०२६ | ८९ | ४७१४ |

(माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत.)

**(७) राज्य प्रशिक्षण धोरण.—(२०७० ०८५३)** मंत्रिमंडळाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण दिनांक २३ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणांमध्ये राज्य प्रशिक्षण नियोजन व मुल्यमापन यंत्रणा स्थापन करणे व विभागीय आणि जिल्हा प्रशिक्षण संस्थांची निर्मिती करणे इत्यादी बाबी अंतर्भूत आहेत.

सदर धोरणानुसार राज्य शासनाच्या सर्व स्तरांवर कार्यरत गट-अ ते गट-ड च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी यशदा ही शिखर प्रशिक्षण संस्था घोषित करण्यात आली असून, ६ विभागाच्या स्तरांवर ७ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था घोषित करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत पुढीलप्रमाणे विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत.

| अ. क्र. (१) | विभाग (२) | विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचे नाव (३) |
|---|---|---|
| १ | कोकण | कुंडलविकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वन) कुंडल, ता. पलुस, जिल्हा सांगली. |
| २ | नाशिक | नाशिक महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक |
| ३ | पुणे | प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती), पुणे. |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. |
| ५ | अमरावती | डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती. |
| ६ | नागपूर | वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था, वनामती, नागपूर. |
| ७ | चंद्रपूर | चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर. |

त्याचप्रमाणे, जिल्हा मुख्यालयाच्या स्तरावर सद्यस्थितीत पुढीलप्रमाणे जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत.

| अ. क्र. (१) | जिल्हा (२) | जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (३) |
|---|---|---|
| १ | ठाणे | वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय, शहापूर, ठाणे. |
| २ | रायगड | प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था रामेती, खोपोली, जिल्हा रायगड. |
| ३ | जळगाव | दादासाहेब चौधरी वनरक्षक प्रशिक्षण संस्था, पाल, जळगाव. |
| ४ | पुणे | ग्रामसेवक प्रशिक्षण संस्था, मांजरी फार्म, पुणे. |
| ५ | कोल्हापूर | रामेती, गेट नं. ४, शहाजीनगर, मध्यवर्ती इमारतीजवळ, लाईन बाजार, कोल्हापूर. |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी जि. छत्रपती संभाजीनगर. |
| ७ | जालना | वनरक्षक प्रशिक्षण संस्था, देऊळगाव राजा रोड, पी. बी. ९३, जालना. |
| ८ | परभणी | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, मराठवाडा ॲग्रीकल्चर विद्यापीठ, परभणी. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ९ | अमरावती | महाराष्ट्र लेखा व वित्त प्रशिक्षण केंद्र, मांगीलाल प्लॉट, कॅम्प रोड, अमरावती. |
| १० | बुलढाणा | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा |
| ११ | नागपूर | जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, नागपूर. |
| १२ | चंद्रपूर | सेंट्रल फॉरेस्ट रेंजर कॉलेज, मूल रोड, चंद्रपूर -०१. |
| १३ | पालघर | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कोसवाड हिल, ता. डहाणू, जिल्हा पालघर. |
| १४ | रत्नागिरी | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, मिरजोळे, रत्नागिरी ४१५ ६१२. |
| १५ | सिंधुदुर्ग | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, तहसील कार्यालयाच्या बाजूला, कुंडल, जिल्हा सिंधुदुर्ग. |
| १६ | धुळे | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, धुळे |
| १७ | नंदुरबार | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, नंदुरबार. |
| १८ | अहमदनगर | अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हा अहमदनगर. |
| १९ | सातारा | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, फलटण, जिल्हा सातारा. |
| २० | सोलापूर | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, सोलापूर. |
| २१ | हिंगोली | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, शिवाजी नगर, जिल्हा हिंगोली ४३१ ५१३. |
| २२ | बीड | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, मांजरा कॉलनीच्या बाजुला, अंबेजोगाई, जिल्हा बीड. |
| २३ | नांदेड | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, श्रीनगर, जिल्हा नांदेड. |
| २४ | धाराशीव | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, विद्यानगर, तांबरी विभाग, जिल्हा धाराशीव. |
| २५ | लातूर | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, बार्शी रोड, दत्तनगर, मुरुड, लातूर. |
| २६ | यवतमाळ | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, आकाशवाणी केंद्राजवळ, जिल्हा यवतमाळ. |
| २७ | अकोला | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, संतोषी माता मंदिराजवळ, हनुमान वस्ती, जिल्हा अकोला. |
| २८ | वाशिम | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, लखाळा, रायसोड रोड, जिल्हा वाशिम. |
| २९ | वर्धा | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, वर्धा ४४२ ००१. |
| ३० | भंडारा | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, शास्त्री चौक, भंडारा ४४१ ९०४. |
| ३१ | गोंदिया | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, गंगाबाई रुग्णालयाजवळ, जुनी पंचायत समिती, नेहरू चौक, गोंदिया. |
| ३२ | गडचिरोली | जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, गडचिरोली ४४१ ४०३. |

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ अन्वये शिखर प्रशिक्षण संस्था यशदा, पुणे करीता रु. २५००/- विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकरीता रु. १८००/- व जिल्हा प्रशासकीय प्रशितक्षण संस्थांकरिता रु. १२००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण सुल्क निश्चित केले आहे.

राज्यातील ६ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये २० पदांचा एकसमान आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून सदर आकृतीबंध संस्थांना लागू करण्यात आला आहे.

राज्यातील प्रशिक्षण संस्थांमध्ये ज्यावेळी १५० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत असतील अशा वेळी संस्थांमध्ये रक्तदान शिबीर व अवयवदानविषयक मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्याबाबतच्या सूचना, तसेच, प्रशिक्षण संस्थांमध्ये पाळणाघराची व्यवस्था करण्याबाबतच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १ डिसेंबर २०१५ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. आवश्यक कार्यवाही राज्यातील सर्व स्तरावर करण्यात येत आहे.

प्रस्तुत राज्य प्रशिक्षण धोरण योजना ही योजनांतर्गत योजना म्हणून राबविण्यात येणार आहे. सदर योजनेसाठी पुढीलप्रमाणे सहायक अनुदान वितरित करण्यात आले आहेः—

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | सहायक अनुदान (योजनांतर्गत) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | २०२०-२०२१ | ८६१.९८ |
| २ | २०२१-२०२२ | ५८८.९७ |
| ३ | २०२२-२०२३ | २२२७.९६ |
| ४ | २०२३-२०२४ | २८५६.८६ |
| ५ | २०२४-२०२५ | २७६३.१८ |

आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये राज्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विविध सुविधा व सहाय यावरील खर्च (२०७००८५३) मंजूर सहायक अनुदान ३५००.०० लक्ष तरतूद केली आहे. नोव्हेंबर २०२५ पर्यंत १७८०.३१ लक्ष वितरीत

**(८) महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थाः—(२०७० ए ०११)**

मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांनी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पावरील भाषणांत घोषित केल्यानुसार शासनाची धोरण, योजना व कार्यक्रमांच्या मूल्यमापन, विश्लेषण व संशोधन यासाठी मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक ७ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये यशदा, पुणे या संस्थेच्या माध्यमातून धोरण संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

• धोरण संशोधन संस्थेच्या प्रारंभिक टप्प्यात संशोधनासाठी पुढील विषयांची निवड करण्यात आली आहेः—

(१) जलयुक्त शिवार अभियान, (२) मागेल त्याला शेततळे, (३) नागरिकांच्या सेवा हक्काकरिताचे ऑनलाईन पोर्टल, (४) गौण वनौजापासून ग्रामसभांना उत्पन्न, (५) पेसा ग्रामपंचायतींना ५ टक्के अबंध निधी, (६) मेक इन महाराष्ट्र व ईझ ऑफ डुइंग बिझनेस

• उपरोक्त विषयांपैकी मागेल त्याला शेततळे, जलयुक्त शिवार अभियान आणि महाराष्ट्र लोकसेवा हक्क या तीन विषयांवरील संशोधन पूर्ण झाले आहे. उर्वरित तीन विषयांवरील संशोधन अंतिम टप्प्यावर आहे.

• प्रस्तुत संस्थेच्या खर्चासाठी मागणी क्रमांक ए-४ (२०७० A०११) महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेकरिता सहायक अनुदान असे लेखाशिर्ष उघडण्यात आले आहे.

| आर्थिक वर्ष | सहायक अनुदान (योजनांर्गत) |
|---|---|
| २०२१-२२ | २.४९ |
| २०२२-२३ | निरंक |
| २०२३-२४ | १०.०० |
| २०२४-२५ | निरंक |
| २०२५-२६ | २०० लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. |

• सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेची रचना व कार्यपद्धती ही टप्पा-टप्प्याने स्थापित करून संस्थेचे कामकाज पूर्णतः कार्यान्वित करण्यासाठी कार्यवाहीची रुपरेषा तयार करण्यात आली आहे.

**(९) एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमः—**

(१) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांप्रमाणे राज्य सेवेमध्ये सरळ सेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ मधील ९ संवर्ग आणि गट-ब मधील १० संवर्ग अशा एकूण १९ संवर्गांतील अधिकाऱ्यांसाठी दोन वर्षांचा "एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम" (Combined Probationary training Programme CPTP) राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० जानेवारी २०१४ रोजी घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य सेवा परीक्षा, २०१३ च्या निकालाद्वारे निवड केलेल्या उमेदवारांपासून हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून आतापर्यंत १० तुकड्यांचे (सीपीटीपी १, २०१४/सीपीटीपी २, २०१५/सीपीटीपी ३, २०१६/सीपीटीपी ४, २०१७/सीपीटीपी ५, २०१९/ सीपीटीपी ६, २०१९, सीपीटीपी ७, २०२२, सीपीटीपी, ८, २०२२, सीपीटीपी ८अ, २०२३ व सीपीटीपी ९, २०२३) प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. सद्यःस्थितीत सीपीटीपी १०, २०२५ व सीपीटीपी ११, २०२५ या तुकड्यांचे प्रशिक्षण सुरू आहे.

(२) तसेच सीपीटीपी ४, २०१७ या तुकडीपासून शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१ जुलै, २०१७ मधील तरतूदींना अनुसरून एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांसाठी मुंबई विद्यापिठाच्या समन्वयाने पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम (M.A. Dev. Admin.) राबविण्यात येत होता. आता दिनांक १३ सप्टेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम यशदा, पुणे व गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) राज्य सेवा परीक्षेमध्ये समाविष्ट पदांच्या संवर्गामध्ये व पर्यायाने एकत्रित परीविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये (सीपीटीपी) नव्याने संवर्ग समाविष्ट झाले असून सद्यःस्थितीत विविध विभागांच्या अधिनस्त गट अ करिता व १७ संवर्ग व गट ब करीता १६ संवर्ग असून दोन्ही मिळून एकुण ३३ संवर्गातील उमेदवारांना एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येते.

(४) या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सन २०२५-२६ या वित्तिय वर्षाकरिता यशदा, पुणे (लेखाशीर्ष २०७० ०८७१) व वनामती, नागपूर लेखाशीर्ष (२०७० ०८६२) या संस्थांसाठी ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) खर्चासाठी अनुक्रमे रुपये ३८४.८६ लक्ष आणि रुपये ६७९.२१ लक्ष व ३६ सहायक अनुदान (वेतन) खर्चासाठी रुपये १२६.१० लक्ष आणि रुपये १८०.६९ लक्ष रकमेची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

(५) एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) प्रशिक्षणाचा तुकडीनिहाय व उमेदवारनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहेः—

| अ. क्र. | प्रशिक्षण तुकडी | प्रशिक्षण कालावधी | प्रशिक्षण घेतलेल्या/ परिविक्षाधीन | घेत असलेल्या अधिकारी यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | गट अ | गट ब |
| १. | सीपीटीपी १, २०१४ | ०९ जून २०१४ ते ३० जून २०१६ | १०८ | ११० |
| २. | सीपीटीपी २, २०१५ | २ मे २०१५ ते ३० एप्रिल २०१७ | १०३ | १६७ |
| ३. | सीपीटीपी ३, २०१६ | २ मे २०१६ ते ३० एप्रिल २०१८ | ६३ | २१० |
| ४. | सीपीटीपी ४, २०१७ | १ ऑगस्ट २०१७ ते ३१ जुलै, २०१९ | ७४ | ४४ |
| ५. | सीपीटीपी ४अ, २०१७ | १६ जानेवारी २०१९ ते १२ जानेवारी, २०१९ | १२ | १३ |
| ६. | सीपीटीपी ५, २०१८ | ४ ऑक्टोबर २०१९ ते ०३ ऑक्टोबर २०२१ | ९५ | ९५ |
| ७. | सीपीटीपी ६, २०१९ | ४ ऑक्टोबर २०१९ ते ०३ ऑक्टोबर २०२१ | ४८ | ४४ |
| ८. | सीपीटीपी ७, २०२२ | १७ जानेवारी २०२२ ते १६ जानेवारी २०२४ | १७८ | १६१ |
| ९. | सीपीटीपी ८, २०२२ | २३ ऑगस्ट २०२२ ते २१ ऑगस्ट २०२४ | २१ | ९४ |

| अ. क्र. | प्रशिक्षण तुकडी | प्रशिक्षण कालावधी | प्रशिक्षण घेतलेल्या/ परिविक्षाधीन | घेत असलेल्या अधिकारी यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | गट अ | गट ब |
| १०. | सीपीटीपी ८अ, २०२३ | ३ ऑक्टोबर २०२३ ते २ ऑक्टोबर २०२५ | १६ | ५ |
| ११. | सीपीटीपी ९, २०२३ | ३ ऑक्टोबर २०२३ ते २ ऑक्टोबर २०२५ | १३१ | १९० |
| १२. | सीपीटीपी १०,२०२५ (राज्यसेवा परीक्षा २०२२) | २ एप्रिल २०२५ ते ० ते १ एप्रिल २०२७ | २४१ | ३२१ |
| १३. | सीपीटीपी ११,२०२५ (राज्यसेवा परीक्षा २०२३) | १ सप्टेंबर २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२७ | १४४ | १८६ |

**"(१०) भारतीय प्रशासकीय सेवेकरिता निवडलेल्या उमेदवारांचे प्रशिक्षणः—(२०७० ००२२)**

भारतीय प्रशासकीय सेवेकरिता निवडलेल्या उमेदवारांना लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, मसुरी येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येते. प्रशिक्षणादरम्यान झालेल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या प्रवास खर्चाचे देयक अकादमी, मसूरी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर मागणी क्रमांक ए-४, २०७०, इतर प्रशासनिक सेवा ००-००३-प्रशिक्षण (००)(०१) निवड झालेले भारतीय प्रशासन सेवेतील उमेदवार, लेखाशीर्ष (२०७० ००२२), ११, देशांतर्गत प्रवास खर्च या लेखाशीर्षाखालील तरतुदीमधून लाल बहादूर शास्त्री प्रशासकीय अकादमी, मसूरी कार्यालयास केलेल्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते."

**(११) मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी (२२५० ००१२)**

मुख्यमंत्र्यांच्या धर्मादाय प्रयोजनासाठी देणग्या देण्यासाठी जो निधी आहे. त्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागातर्फे केली जाते. मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधीबाबत मागील सर्व शासन निर्णय, अधिक्रमित करून दिनांक १७ सप्टेंबर २०१९ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ शासन शुद्धीपत्रकानुसार सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावे यासह महाराष्ट्र राज्यातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धर्मादाय किंवा तत्सम संस्था किंवा निम सार्वजनिक स्वरूपाच्या संस्था यांना अर्थसहाय्य देण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय स्वेच्छानिर्णयानुसार या निधीतून सहाय्य देण्यासाठी उपयोग करू शकतील. तसेच महाराष्ट्र राज्याबाहेरील धर्मादाय संस्थांकडूनही मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी ची मागणी होत असल्याने दि.२६ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र राज्याबाहेरील मूळ महाराष्ट्रीय समाजाच्या कार्यरत संस्थांना वैशिष्ट्यपूर्ण व नावीण्यपूर्ण कामासाठी मुख्यमंत्री धर्मादाय देणगी निधी मधून अर्थसहाय्य देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्यमंत्री यांना राहतील. तसेच महाराष्ट्र राज्याबाहेरील (महाराष्ट्र व महाराष्ट्र कनार्टक सीमावर्ती भागातील ८६५ गावे वगळता) शासन निर्णय दि.१७.०९.२०१९ मधील अटी व शर्ती बाबत आवश्यकतेनुसार शिथिलता देण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांना राहतील " या तरतूदीचा, समावेश करण्यात आला आहे. या निधीचे नियंत्रक सामान्य प्रशासन विभागाचे सह सचिव/ उप सचिव/ कार्या. अर्थसं (२५) हे असून हा निधी महालेखापाल-१, मुंबई यांच्या लेखापरीक्षेच्या अधीन आहे.

**(१२) राज्य निवडणूक आयोग (२०७० ०६४८) रानिआ-(३७)**

भारतीय संविधान (७३ व ७४ वी सुधारणा) अधिनियम, १९९२ नुसार राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती, नगरपरिषदा, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या निवडणुकविषयक सर्व प्रकारचे कामकाज हाताळणे यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. 'राज्य निवडणूक आयुक्त' हे पद एप्रिल, १९९४ मध्ये निर्माण करण्यात आलेले आहे. याशिवाय, आयोगाचे कामकाज हाताळण्यासाठी प्रथमतः ४१ पदे व आवश्यकतेनुसार वेळोवेळी अतिरिक्त पदे नव्याने निर्माण करण्यात आली. मा. राज्य निवडणूक आयुक्त या सांविधानिक पदाशिवाय आयोगाच्या आस्थापनेवर एकूण ७९ पदे अस्तित्वात आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या कामाच्या स्वायत्ततेबाबत सा. प्र. वि. क्र. रानिआ. २०१२/५४४/प्र.क्र. ७५/३७, दिनांक २७ ऑक्टोबर २०१६ अन्वये परिपत्रक निर्गमीत केले आहे. (सोबत तक्ता जोडला आहे.)

**(१३) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (२०७० ०६९३)**

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण हे उच्च न्यायालयास समांतर आहे. उच्च न्यायालय व इतर न्यायालयात महाराष्ट्र राज्य कर्मचारी, अधिकारी यांचे अनेक विषयावर दावे दाखल होत होते व या न्यायालयांना प्रशासनबाबतचे दावे निकालात काढण्यात अनेक वर्षाचा कालावधी लागत होता. काही प्रसंगी तर शासकीय अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झाला तरी त्यांच्या दाव्याचा निकाल लागत नव्हता. परिणामी संबंधित कर्मचारी व शासन यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. अशा परिस्थितीचा विचार करुन केंद्र सरकारने प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५, (१९८५ चा १३) कायदा अंमलात आणला. याच अधिनियमातील कलम ३५ नुसार महाराष्ट्र शासनासाठी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम हे भारत सरकारने प्रसिद्धीपत्रक (नोटीफिकेशन) क्र. ४५१२-४५२ (इ), दिनांक २२ एप्रिल १९८८ अन्वये प्रकाशित केले आहे.

२. उपरोक्त अधिनियमानुसार हे न्यायधिकरण दिनांक ८ जुलै १९९१ पासून सुरू करण्यात आले आहे. तेव्हापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे दावे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढे चालविण्यात येत आहेत.

३. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाची खंडपीठे नागपूर व औरंगाबाद येथे मार्च, १९९२ पासून कार्यान्वित करण्यात आली आहेत.

**(१४) राज्य माहिती आयोग (२०५२-५४२१)**

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात अधिकाधिक पारदर्शकता आणणे आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून संसदेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, अधिनियमित केला आहे. या अधिनियमातील कलम १५ मधील तरतुदीनुसार दिनांक ११ ऑक्टोबर २००५ पासून राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्यात आली असून या आयोगाकरिता राज्य मुख्य माहिती आयुक्तांसह ६६ नियमित व ८० काल्पनिक पदे अशी एकूण १४६ पदे

दिनांक २१ जून २०२३ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त अशीच आस्थापना असलेली राज्य माहिती आयुक्तांची कार्यालये बृहन्मुंबई, कोकण (नवी मुंबई), पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती येथे स्थापन करण्यात आली आहेत. राज्य माहिती आयोगासाठी विधि कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर कक्षामध्ये अवर सचिव(विधि) व सहायक विधि ही दोन पदे समाविष्ट आहेत.

**१. माहिती मिळविण्याची कार्यपद्धती :-** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा विनंती अर्ज, संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे साध्या कागदावर विहित नमुन्यात करता येईल, आणि त्यासोबत सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये दहा इतकी अर्ज फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तीची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा बँकेच्या धनादेशाद्वारे जोडण्यात येईल किंवा त्यावर दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

**२. माहिती पुरविण्यासाठी फी :—**

(१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तीची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरुपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरुपात पुढील दरांनी आकारण्यात येईलः—

(अ) (क) संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इत्यादींची किंमत अगोदरच निश्चित केली असेल त्याबाबतीत, अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च.

(ख) माहिती छायांकित प्रतींच्या स्वरूपात किंवा अन्य (प्रतींच्या) स्वरूपात चटकन मिळण्याजोगी असेल त्याबाबतीत (एक) तयार केलेल्या किंवा छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठाखाली (ए-४ किंवा ए-३ आकारातील असेल त्याबाबतीत कागद) दोन रुपये अधिक टपाल खर्च किंवा (दोन) मोठ्या आकारातील कागदाच्या प्रतीचा प्रत्यक्ष आकार किंवा परिव्यय किंवा अधिक टपाल खर्च.

(ब) अभिलेख पाहण्यासाठी पहिल्या तासाकरिता कोणतीही फी नाही आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटाकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता) रुपये पाच इतकी फी.

परंतु, अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाईल. त्याबाबतीत कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही.

(२) कलम ७ च्या पोट-कलम (५) अन्वये माहिती पुरविण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरुपात तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरुपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरुपात पुढील दराने आकारण्यात येईलः—

(क) डिस्केटस, किंवा फ्लॉपी या स्वरूपातील माहिती पुरविण्यासाठी प्रत्येक डिस्केटस् किंवा फ्लॉपीकरीता पन्नास रुपये अधिक टपाल खर्चः आणि

(ख) मुद्रित स्वरूपातील माहिती पुरविण्यासाठी, अशा प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा त्या प्रकाशनातील उताऱ्यांच्या प्रत्येक छायांकित पृष्ठासाठी दोन रुपये अधिक टपाल खर्चः

परंतु अर्जदार व्यक्तीशः येऊन माहिती घेऊन जाईल त्याबाबतीत कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही,

**३. राज्य माहिती आयोगाचे अधिकार, कार्ये व अपील :—**

(१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, पुढील व्यक्तीकडून तक्रार स्वीकारणे व त्याची चौकशी करणे हे, राज्य माहिती आयोग यांचे कर्तव्य असेल;

(क) या अधिनियमानुसार कोणताही असा अधिकारी नियुक्त करण्यात आला नाही या कारणास्तव किंवा राज्य सहायक जनमाहिती अधिकारी याने ज्या व्यक्तीचा या अधिनियमान्वये माहितीसाठीचा किंवा अपिलासाठीचा अर्ज राज्य जनमाहिती अधिकाऱ्याकडे कलम १९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे, राज्य माहिती आयोगाकडे अग्रेषित करण्यासाठी स्वीकारण्यास नकार दिला असल्याचे कारणास्तव, राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे विनंतीचा अर्ज सादर करण्यास जी असमर्थ ठरली असेल अशी व्यक्ती;

(ख) या अधिनियमान्वये मागणी करण्यात आलेली कोणतीही माहिती मिळण्यास नकार मिळालेली व्यक्ती;

(ग) या अधिनियमान्वये माहितीसाठी किंवा माहिती मिळवण्यासाठी केलेल्या मागणीस विनिर्दिष्ट मुदतीत प्रतिसाद न मिळालेली व्यक्ती;

(घ) अवाजवी वाटत असलेली फी भरण्यास जिला भाग पाडण्यात आले असेल अशी व्यक्ती;

(ड) या अधिनियमान्वये अभिलेख मिळविता येण्याच्या किंवा त्यासाठी विनंती करण्याच्या संबंधातील इतर कोणत्याही बाबीविषयी तक्रार करणारी व्यक्ती;

(२) एखाद्या प्रकरणामध्ये चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे आहेत याबाबत जर राज्य माहिती आयोगाची खात्री झाली असेल तर आयोग त्याबाबतची चौकशी सुरू करील.

(३) या कलमान्वये कोणत्याही बाबीची चौकशी करताना, राज्य माहिती आयोगाला पुढील बाबतीत, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ या अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत. तेच अधिकार असतीलः—

(क) व्यक्तींना हजर राहण्याबाबत समन्स पाठवून त्यांना हजर करविणे आणि त्यांना शपथेवर तोंडी किंवा लेखी साक्षीपुरावा देण्यास व दस्ताऐवज किंवा वस्तू सादर करण्यास भाग पाडणे;

(ख) दस्ताऐवजांचा शोध घेण्यास आणि पहाणी करण्यास फर्मावणे;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही शासकीय अभिलेख किंवा त्याच्या प्रती यांची मागणी करणे;

(ड) साक्षीदारांची किंवा दस्ताऐवजांची तपासणी करण्याकरिता समन्स काढणे; आणि

(च) विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब;

**४. अपील :—**

१. राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांकडून ३० दिवसांच्या मुदतीत निर्णय मिळाला नसेल अशा किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अपील दाखल करता येईल. अशा अपिलासोबत, ज्या विरुद्ध अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह सार्वजनिक प्राधिकरणाला प्रदेय असलेली रुपये वीस इतकी अपील फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

२. प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या अपील प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे विहित नमुन्यात दुसरे अपील दाखल करता येईल. अशा अपीलासोबत ज्या विरुद्ध अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह, राज्य माहिती आयोगाला देय असलेली रुपये वीस इतकी अपील फी रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

**५. अपीलांचा गोषवारा :—**

राज्य माहिती आयोगात दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंतच्या कालावधीत प्राप्त झालेली/निकाली काढलेली तसेच प्रलंबित असलेली द्वितीय व तक्रारी यांचा तपशील खालीलप्रमाणे आहेः—

| कालावधी | द्वितीय अपीले | तक्रारी |
|---|---|---|
| दिनांक ३१-१२-२०२२ रोजी प्रलंबित | ९८,२९४ | १७,२२३ |
| दिनांक प्राप्त १-१-२०२३ ते ३१-१२-२०२३ | ४६,७२३ | ७,०४२ |
| दिनांक १-१-२०२३ ते ३१-१२-२०२३ मध्ये निकाली | ५६,९७१ | २,८६६ |
| दिनांक प्रलंबित ३१-१२-२०२३ | ८७,८७२ | २१,३९४ |

**टिप.**—सदर माहिती सर्व खंडपीठांकडून प्राप्त झालेल्या अहवालांच्या आधारे संग्रहीत केली आहे.

**(१५) राज्य सेवा हक्क आयोगः—(२०७० ए ००२) लोदिक**

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा दिनांक २८ एप्रिल, २०१५ पासून राज्यात लागू करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम १३ च्या पोट-कलम १ व २ अन्वये, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मुंबई येथे "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग" व प्रत्येक महसुली विभागासाठी एक (एकूण सहा) "राज्य सेवा हक्क आयुक्त" यांची कार्यालये दिनांक ३० जुलै २०१६ च्या अधिसूचनेन्वये गठीत करण्यात आलेली असून या आयोगाकरिता राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्तांसह एकूण १४२ पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. तसेच शा.नि.सा.प्र.वि. दिनांक ८ जून २०२३ अन्वये १४२ पदांचा (नियमित पदे ६२ व बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाची ८० पदे) असा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त व राज्य सेवा हक्क आयुक्त ही पदे अनुक्रमे राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य शासनाच्या मुख्य सचिव या पदांशी समकक्ष आहेत.

**१. राज्य सेवा हक्क आयोगाचे अधिकार व कार्येः**

(१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या उचित अंमलबजावणीची व अधिक चांगल्या लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्यासाठी शासनास सूचना करणे, हे आयोगाचे कर्तव्य आहे, त्या प्रयोजनार्थ आयोगाने पुढील गोष्टी करणे अपेक्षित आहे.

(क) या अधिनियमानुसार लोकसेवा देण्यात कसूर केल्याबाबतची, स्वाधिकारे दखल घेणे आणि त्यास योग्य वाटतील त्याप्रमाणे अशी प्रकरणे निकालात काढण्यासाठी निर्देशित करणे.

(ख) लोकसेवा देणारी कार्यालये आणि प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी यांच्या कार्यालयांची तपासणी पार पाडणे,

(ग) कोणत्याही पदनिर्देशित अधिकाऱ्याने किंवा अपील प्राधिकाऱ्यांनी या अधिनियमान्वये त्यांच्याकडे सोपविलेली कार्ये योग्यपणे पार पाडण्यात कसूर केली असेल तर त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची शिफारस करणे,

(घ) लोकसेवा देण्याच्या कार्यपद्धतीमध्ये, ज्यामुळे लोकसेवा देण्यात अधिकाधिक पारदर्शकता व सुलभता येईल, असे बदल करण्यासाठी (प्रभारी सचिवांशी विचारविनिमय करून) शिफारस करणे.

(ङ) लोकसेवा कार्यक्षमपणे देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजना करण्यासाठी शिफारस करणे.

(च) सार्वजनिक प्राधिकरणांनी लोकसेवा देण्याबाबत संनियंत्रण करणे,

(छ) कलम १८ अन्वये त्यांच्याकडे दाखल केलेल्या अपिलांची सुनावणी घेणे व त्यावर निर्णय देणे.

(२) आयोगाला, या कलमान्वये कोणत्याही बाबीची चौकशी करताना, पुढील बाबतीत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकार असतीलः—

(क) व्यक्तींना समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्यांना शपथेवर तोंडी किंवा लेखी साक्षीपुरावा देण्यास व दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यास भाग पाडणे,

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास आणि तपासणी करण्यास फर्मावणे,

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे,

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणतेही शासकीय अभिलेख किंवा त्याच्या प्रती यांची मागणी करणे,

(ड) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्याकरीता समन्स काढणे,

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**२. लोकसेवा मिळविण्याची कार्यपद्धती:—**

(१) लोकसेवा मिळविण्याची कार्यपद्धती महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम, २०१६ मध्ये विशद करण्यात आलेली आहे. त्यामधील प्रमुख बाबी खालीलप्रमाणे आहेतः—

(अ) लोकसेवा प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्जाचा नमुना जर संबंधित अधिनियम, नियम, अधिसूचना, आदेश, शासन निर्णय इत्यादी अन्वये विहित करण्यात आलेला नसेल, तर प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण तो नमुना तयार करील.

(आ) अर्जाचा नमुना मराठी व इंग्रजी भाषेमध्ये असेल, अर्जाच्या नमुन्यासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी, अर्जाच्या नमुन्यामध्ये नमूद करण्यात येईल. अर्जाचा नमुना पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या कार्यालयात आणि सेतू सुविधा केंद्र, महा-ई सेवा केंद्र, संग्राम केंद्र यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात आणि अन्य कोणत्याही संबंधित नागरिक सेवा केंद्रात सहजपणे उपलब्ध होईल. सदर अर्जाच्या नमुन्याची प्रत कार्यालयाचे किंवा विभागाचे संकेतस्थळ किंवा आपले सरकार पोर्टलवर देखील उपलब्ध होईल व ती मोबाईल ॲप वरून अथवा ऑनलाईन उपलब्ध (डाऊनलोड) होऊ शकेल.

(इ) केवळ लोकसेवा मिळविण्यासाठीची आवश्यक माहितीच अर्जदाराकडून मागविण्यात येत असल्याबाबत पदनिर्देशित अधिकारी खातरजमा करील.

(ई) अर्ज सादर करतेवेळी, शक्य असेल तेथवर आवश्यक कागदपत्रे जोडलेले व पूर्ण भरलेले अर्जच केवळ स्वीकारण्यात येत असल्याबाबत पदनिर्देशित अधिकारी खातरजमा करील, ऑनलाईन सादर केलेले अर्जसुद्धा पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून स्वीकारण्यात येतील.

(उ) अर्जावर, पदनिर्देशित अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला दुय्यम अधिकारी किंवा कर्मचारी रीतसर पोच देईल आणि त्यावर अर्ज प्राप्तीचा दिनांक, वेळ आणि ठिकाण, अनन्य ओळख क्रमांक (युनिक आयडेन्टिफिकेशन नंबर), अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे नांव, ज्या कालमर्यादेच्या आत लोकसेवा पुरविण्यात येईल ती नियत कालमर्यादा या बाबी नमूद करण्यात येतील.

(ऊ) अर्ज जर व्यक्तिशः स्वरूपात मिळाला असेल तर, त्याची पोच व्यक्तिशः देण्यात येईल. अर्ज ऑनलाईन पोर्टल सुविधेमार्फत मिळाला असेल तर, त्याची पोच ई-मेल किंवा एसएमएस किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साधनांमार्फत देण्यात येईल. ऑनलाईन देण्यात आलेली पोच ही अर्जदारास देण्यात आलेली पोचपावती समजली जाईल.

**(२) शुल्काचे (फी) प्रदान.—** अर्जदारास सेवा प्राप्त करण्यासाठी संबंधित प्राधिकरणाने प्रत्येक सेवेसाठी वेळोवेळी अधिसूचित केलेल्या शुल्काचे प्रदान, कोणतेही असल्यास, एकतर थेट प्राधिकरणाकडे किंवा इलेक्ट्रॉनिक सुविधेमार्फत ऑनलाईन करावे लागेल.

**(३) अर्ज फेटाळण्याची सूचना.—**जेथे संबंधित पदनिर्देशित अधिकारी हा, वैध कारणांमुळे, अर्जदाराला अधिसूचित लोकसेवा पुरविता येऊ शकत नाहीत या निष्कर्षाप्रत आला असेल त्याबाबतीत, ज्या विशिष्ट सेवांसाठी अर्ज करण्यात आला असेल त्या विशिष्ट सेवा पुरविण्याकरिता दिलेल्या नियत कालमर्यादेच्या कालावधीत ती बाब अर्जदाराला कारणांसह लेखी कळवील. अर्ज फेटाळण्याच्या सूचनेसोबत, अपिलीय प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम, अपील प्राधिकाऱ्याशी संपर्क साधण्यासाठी उपलब्ध सर्व माहितीसह त्याचा पत्ता, ज्या कालमर्यादेत अपील सादर करण्याची गरज आहे ती कालमर्यादा नमूद करण्यात येईल. जर अर्ज ऑनलाईन करण्यात आला असेल तर अर्जदाराचा अर्ज फेटाळण्याबाबतचे आदेश ऑनलाईन अथवा मोबाईल ॲप वर पाठविण्यात येतील.

**(३) अपिलाची कार्यपद्धती—**

(अ) अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (१) अन्वये, प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज फेटाळल्याचा आदेश प्राप्त झाल्याच्या किंवा नियत कालमर्यादा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत पात्र व्यक्ती नियमातील **नमुना दोनमध्ये** व्यक्तीशः किंवा ऑनलाईन अपील दाखल करू शकेल, अपिल प्राधिकारी ही मुदत अपवादात्मक प्रकरणी नव्वद दिवसांपर्यंत वाढवू शकेल.

(आ) अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (३) अन्वये, प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा कोणताही आदेश मिळाला नसेल त्याबाबतीत, पहिले अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांनंतर द्वितीय अपिलीय प्राधिकाऱ्याकडे नियमामधील **नमुना तीन** मध्ये व्यक्तिशः किंवा ऑनलाईन अपील दाखल करता येईल.

(इ) द्वितीय अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध आयोगाकडे नियमातील नमुना-पाच मध्ये अपील दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त व इतर ६ राज्य सेवा हक्क आयुक्त यांचे कडील एकूण प्राप्त झालेल्या ऑनलाईन व ऑफलाईन तृतीय अपीलांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| कालावधी | प्राप्त | निकाली | प्रलंबित |
|---|---|---|---|
| दिनांक १ एप्रिल २०२४ ते दिनांक ३१ मार्च, २०२५ | २९४ | २९४ | ०० |

## (६) वित्तीय आवश्यकता

## (Vi) Financial Requirements

## (६) वित्तीय आवश्यकता
## (vi) Financial Requirements

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. (1) | (अ) कार्याचे वर्गीकरण (2) | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 (3) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 (4) | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 (5) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 (6) | A— Activity Classification (1) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांची कार्यालये | 83971 | 120605 | 106051 | 129116 | (1) Public Commissioner Dy. Public Commission. |
| २ | नागरिक संरक्षण समिती | 2376 | 3553 | 3074 | 2114 | (2) Civil Defence |
| ३ | (अ) यशवंतराव चव्हाण वि.प्र. प्रबो. सहायक अनुदान | 27443 | 89204 | 27444 | 39205 | (3) (a) Grant-in-aid to Yeshwantrao Chavan Academy of Development Administration. |
| | (ब) माहितीचा अधिकार कायदा प्रशिक्षण (यशदा) | 7422 | 18473 | 12931 | 15000 | (b) Right to Information Act Training (Yashada). |
| | (क) मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रबोधिनी, औरंगाबाद | 7383 | 15280 | 11291 | 30644 | (c) Marathwada Academy of Development and Administration, Aurangabad. |
| | (ड) डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती. | 9642 | 23581 | 22035 | 20583 | (d) Vidarbha of Administrative and Development Administration, Amarawati. |
| ४ | आय.ए.एस. परिविक्षाधीन उमेदवारांसाठी प्रशिक्षण | 0 | 4000 | 2800 | 4120 | (4) Training of IAS Probationers |
| ५ | धर्मादाय प्रयोजनासाठी देणग्या | 100000 | 250000 | 250000 | 250000 | (5) Donation for Charitable Purposes |
| ६ | विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष | 216515 | 330585 | 234477 | 338595 | (6) Science & Technology Cell |
| ७ | महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण | 158126 | 202084 | 193307 | 204772 | (7) Maharashtra Administrative Tribunal, Mumbai. |
| ८ | प्रतिनियुक्ती/विदेश सेवेतील भारतीय प्रशासकीय सेवेमधील अधिकाऱ्यांना देय असलेले रजा वेतन. | 1000 | 1000 | 1000 | 1110 | (8) Other Expenditure |
| ९ | विशेष मान्यवर व्यक्तीच्या भेटीच्या वेळी व्यवस्था | 618 | 100000 | 70000 | 100000 | (9) Arrangement during the Visits of VIP |

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | A— Activity Classification | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | | (3) | (4) | (5) | (6) | (1) | |
| १० | जनगणना | | 0 | 5 | 5 | 5 | (10) Census | |
| ११ | राज्य सेवा हक्क आयोग | | 88030 | 348922 | 280897 | 0 | (11) State Service Commisssion | |
| | **एकूण (अ)** | | **702526** | **1507292** | **1215312** | **1135264** | **Total (A)** | |
| | (ब) वित्त व्यवस्थेतील साधने— | | | | | | (B) | |
| | मागणी क्र. | प्रधान शीर्ष | | | | | Demand No. | Major Head |
| | ए-४ | २०७० | 386011 | 926702 | 730830 | 546664 | A— 4 | 2070 |
| | ए-५ | २२५० | 100000 | 250000 | 250000 | 250000 | A— 5 | 2250 |
| | ए-५ | २२५१ | 216515 | 330585 | 234477 | 338595 | A— 5 | 2251 |
| | ए-७ | ३४५४ | 0 | 5 | 5 | 5 | A— 7 | 3454 |
| | ***एकूण (ब)* . .** | | **702526** | **1507292** | **1215312** | **1135264** | **... Total (B)** | |

**(4) कर्मचारीविषयक गोषवारा (मंत्रालयीन स्तर)**

**(iv) Personnel Summary (State Level)**

## (१) लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय

**(1)** Office of the Lok Ayukta and Upa Lok Ayukta

| अनुक्रमांक Sr. No. (1) | पदनाम (2) | वेतनश्रेणी/ Scale of Pay (3) | पदांची संख्या / No. of Post 2024-2025 (4) | 2025-2026 (5) | Designation (6) |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | **राजपत्रित—** | | | | *Gazetted—* |
| | लोकआयुक्त | 2,50,000 (निश्चित/Fixed) | 1 | 1 | Lok Ayukta |
| | उप लोकआयुक्त | 2,25,000 (निश्चित/Fixed) | 2 | 2 | Upa Lok Ayukta |
| | प्रबंधक | Grade Pay of District Judge | 1 | 1 | Registrar |
| | अतिरिक्त प्रबंधक | S-27 : 123100-215900 | 1 | 1 | Additional Registrar |
| | सहायक प्रबंधक | S-24 : 71100-211900 | 4 | 4 | Assistant Registrar |
| | लो.आ. व उ.लो.आ. यांचे सचिव | S-25 : 78800-209200 | 1 | 1 | Secretary to the Lok Ayukta and Upa Lok Ayukta |
| | कक्ष अधिकारी | S-17 : 47600-151100 | 5 | 5 | Section Officer |
| | वरिष्ठ स्वीय सहायक | S-24 : 71100-211900 | 3 | 3 | Senior Personal Assistant |
| | लघुलेखक (निवड श्रेणी) | S-17 : 47600-151100 | 1 | 1 | Stenographer (S.G.) |
| | | एकूण | **19** | **19** | **Total** |
| **२.** | **अराजपत्रित, वर्ग-३—** | | | | *2 Non-Gazetted, Class III—* |
| | लघुलेखक (उच्च श्रेणी) | S-16 : 44900-142400 | 3 | 3 | Stenographer (H. G.) |
| | लेखापाल-नि-रोखपाल | S-16 : 44900-142400 | 1 | 1 | Accountant-*cum*-Cashier |
| | सहायक कक्ष अधिकारी | S-16 : 44900-142400 | 17 | 17 | Assistant Section Officer |
| | अनुवादक | S-13 : 35400-112400 | 2 | 2 | Translator |
| | ग्रंथपाल | S-10 : 29200-92300 | 1 | 1 | Librarian |
| | लघु-टंकलेखक | S-8 : 25500-81100 | 2 | 2 | Steno-typist |
| | लिपिक टंकलेखक | S-6 : 19900-63200 | 26 | 26 | Clerk-*cum*-Typist |
| | वाहन चालक | S-6 : 19900-63200 | 3 | 4 | Driver |
| | | एकूण | **56** | **56** | **Total** |
| **३.** | **अराजपत्रित, वर्ग-४—** | | | | *3 Non-Gazetted, Class IV—* |
| | चोपदार | S-6 : 19900-63200 | 3 | 3 | Chopdar |
| | नाईक/झेरॉक्स चालक | S-3 : 16600-52400 | 2 | 2 | Naik/Xerox Operator |
| | शिपाई | S-1 : 15000-47600 | 9 | 9 | Peon |
| | सफाईगार-पहारेकरी | S-1 : 15000-47600 | 1 | 1 | Sweeper-*cum*-Watchman |
| | | एकूण | **15** | **15** | **Total** |
| | | **एकूण बेरीज** | **90** | **90** | **Grand Total** |

## (२) नागरिक संरक्षण समिती (महाराष्ट्र)

**(iv) Citizens Defence Committee (Maharashtra)**

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | वेतनश्रेणी/ Scale of Pay | पदांची संख्या / No. of Posts 2024-2025 | 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| **१.** | **अराजपत्रित, गट-क—** | Rs. | | | ***1. Non-Gazetted, Class III—*** |
| | लिपिक-टंकलेखक . . | S-6 (19900-63200) . . | 1 | 1 | Clerk-Typist |
| | | **एकूण** . . | 1 | 1 | |
| **२.** | **अराजपत्रित, गट-ड–** | | | | *2. Non-Gazetted, Class IV—* |
| | शिपाई | S-1 (15000-67600) . . | 1 | 1 | Peon |
| | | **एकूण** . . | 1 | 1 | **Total** |
| | | **एकूण बेरीज** . . | 2 | 2 | **Grand Total** |

# राज्य निवडणूक आयोग

## State Election Commission

**तक्ता ४**/ TABLE IV

| अ. क्र. Sr. No. | पदनाम | नवीन वेतनश्रेणी वेतनस्तर Scale of Pay | पदांची संख्या/ No. of Posts 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|
| (१) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | राज्य निवडणूक आयुक्त | 2,25,000 (Fix Pay) | 1 | State Election Commissioner |
| 1 | सचिव, राज्य निवडणूक आयोग (संवर्ग पद) | S-27 :118500-214100 | 1 | Secretary, State Election (संवर्ग पद) Commission (Cadre Post) |
| **(1) राजपत्रित गट-अ** | | | | *(1) Gazetted–Group -A* |
| 1 | उप सचिव | S-25 : 78800-209200 | 1 | Dy. Secretary |
| 2 | उप आयुक्त (अपर जिल्हाधिकारी) | S-25 : 78800-209200 | 1 | Dy. Commissioner (Addl. Collector) |
| 3 | अवर सचिव | S-23 : 67700-208700 | 3 | Under Secretary |
| 4 | विधि अधिकारी | S-23 : 67700-208700 | 1 | Law Officer |
| 5 | वरिष्ठ स्वीय सहायक | S-24 : 71100-211900 | 1 | Senior Personal Assistant |
| 6 | सहायक आयुक्त (उप जिल्हाधिकारी) | S-20 : 56100-177500 | 2 | Assistant Commissioner (Dy. Collector) |
| 7 | तहसीलदार | S-19 : 55100-175100 | 2 | Tahasildar |
| 8 | सहायक आयुक्त (जनसंपर्क) | S-20 : 56100-177500 | 1 | Assistant Commissioner (PR) |
| 9 | निवड श्रेणी लघुलेखक (स्वीय सहायक) | S-17 : 47600-151100 | 1 | Selection Grade Stenographer (Personal Assistant) |
| | | **Total** | **13** | |
| **(2) राजपत्रित गट-ब** | | | | (2) *Gazetted Group-B* |
| 1 | कक्ष अधिकारी | S-17 : 47600-151100 | 4 | Section Officer |
| 2 | लेखा अधिकारी | S-16 : 44900-142400 | 1 | Accounts Officer |
| 3 | सांख्यिकी अधिकारी | S-15 : 41800-132300 | 1 | Statistical Officer |
| 4 | नायब तहसीलदार | S-14 : 38600-122800 | 2 | Naib Tahasildar |
| | | **Total** | **8** | |
| **(3) अराजपत्रित गट-ब** | | | | (3) *Non-Gazetted Group-B* |
| 1 | उच्चश्रेणी लघुलेखक | S-16 : 44900-142400 | 4 | Higher Grade Stenographer |
| 2 | रोख लेखापाल | S-14 : 38600-122800 | 1 | Cash Accountant |
| 3 | सहायक कक्ष अधिकारी | S-14 : 38600-122800 | 10 | Assistant Section Officer |
| 4 | निम्नश्रेणी लघुलेखक | S-15 : 41800-132300 | 6 | Lower Grade Stenographer |
| | | **Total** | 21 | |

| अ. क्र. Sr. No. | पदनाम | नवीन वेतनश्रेणी वेतनस्तर Scale of Pay | पदांची संख्या/ No. of Posts 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|
| (१) | (2) | (3) | (4) | (5) |
| **(4) अराजपत्रित गट-क** | | | | **(4) Non-Gazetted Group-C** |
| 1 | अनुवादक (मराठी) | S-13 : 35400-112400 | 1 | Translator (Marathi) |
| 2 | उप लेखापाल | S-13 : 35400-112400 | 1 | Dy. Accountant |
| 3 | ग्रंथपाल | S-10 : 29200-92300 | 1 | Librarian |
| 4 | सांख्यिकी सहायक | S-10 : 29200-92300 | 1 | Statistical Assistant |
| 5 | रोखपाल | S-6 : 19900-63200 | 1 | Cashier |
| 6 | देयक लेखापाल | S-6 : 19900-63200 | 2 | Bill Accountant |
| 7 | लिपिक-टंकलेखक | S-6 : 19900-63200 | 14 | Clerk-Typist |
| 8 | संगणक चालक | S-6 : 19900-63200 | 1 | Computer Operator |
| 9 | वाहन चालक | S-6 : 19900-63200 | 3 | Driver |
| | | **Total** | 25 | |
| **(5) अराजपत्रित (गट-ड)** | | | | **(5) Non-Gazetted Group-D** |
| 1 | नाईक | S-3 : 16600-52400 | 1 | Naik |
| 2 | रोनिओ यंत्रचालक | S-3 : 16600-52400 | 1 | Roneo Operator |
| 3 | झेरॉक्स यंत्रचालक | S-3 : 16600-52400 | 1 | Xerox Operator |
| 4 | शिपाई | S-1 : 15000-47600 | 8 | Peon |
| | | एकूण | 11 | |
| | | **Total** | 79 | |

# राज्य माहिती आयोग

**तक्ता ६/ TABLE VI**

| अ. क्र. Sr. No. | पदनाम | | वेतनश्रेणी Scale of Pay (Rs.) | | पदांची संख्या/ No. of Posts 2026-2027 | Designation |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (2) | | (3) | | (4) | (5) |
| **(अ) राजपत्रित अधिकारी (गट-अ)** | | | | | | |
| 1 | राज्य मुख्य माहिती आयुक्त | .. | 2,25,000 (नियत) | .. | 1 | State Chief Information Commissioner |
| 2 | राज्य माहिती आयुक्त | .. | 2,25,000 (नियत) | .. | 7 | State Information Commissioner |
| 3 | सचिव | .. | S-27 : 118500-214100 | .. | 1 | Secretary |
| 4 | सचिव/निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी | .. | S-25 : 78800-209200 | .. | 7 | Dy. Secretary/Selection Grade Dy. Collector |
| 5 | अवर सचिव (विधि) | .. | S-23 : 67700-208700 | .. | 1 | Under Secretary (Legal) |
| **(ब) राजपत्रित अधिकारी (गट-ब)** | | | | | | |
| 1 | कक्ष अधिकारी/समकक्ष | .. | S-17 : 47600-151100 | .. | 16 | Section Officer |
| **(क) अराजपत्रित कर्मचारी (गट-ब)** | | | | | | |
| 1 | सहायक | .. | S-15 : 41800-132300 | .. | 1 | Legal Assistant |
| 2 | सहायक कक्ष अधिकारी | .. | S-14 : 38600-122800 | .. | 32 | Assistant Section Officer |
| | | | एकूण पदे | | 66 | Total |

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. रामाआ-२०१७/प्र.क्र. १०/सहा, दिनांक २१ जून २०२३ नुसार 'मराहाष्ट्र राज्य माहिती आयोग' कार्यालयातील पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर झाला असून त्यामध्ये वर नमूद तक्त्यातील ६६ नियमित पदे व खाली नमूद तक्त्यातील ८० काल्पनिक पदे असा १४६ पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.

| अ. क्र. | पदनाम | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | उच्चश्रेणी लघुलेखक | ८ |
| २ | निम्नश्रेणी लघुलेखक | ८ |
| ३ | लिपिक टंकलेखक | ३२ |
| ४ | वाहनचालक | ८ |
| ५ | शिपाई | २४ |
| | **एकूण मनुष्यबळ** | **८०** |

उपरोक्त दि. २१-०६-२०२३ रोजीचा शासन निर्णय रद्द करून आयोगातील गट-क आणि गट-ड ची पदे पुनर्जिवित करावीत, तसेच राज्य शासनाने आयोगाकडील मागणीनुसार आवश्यक अतिरिक्त वाढीव अधिकारी व कर्मचारी वर्ग महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या मुख्यालयासह सर्व खंडापीठांस कलम १६(६) प्रमाणे उपलब्ध करून देण्याबाबत राज्य माहिती आयोगाच्या १८ व्या वार्षिक अहवालात शासनास शिफारस केली आहे.

## महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण
Maharashtra Administrative Tribunal

### कर्मचारीविषयक गोषवारा
Personnel Summary

**तक्ता ५**/ TABLE V

| अ. क्र. Sr. No. | पदनाम | सुधारित वेतनसंरचनेतील वेतनस्तर Pay level in Revised Pay Matrix | पदांची संख्या/ No. of Posts 2022-2023 | Designation |
|---|---|---|---|---|
| (१) | (2) | (3) | (4) | (5) |
| **१ राजपत्रित गट-अ** | | | | *1 Gazetted Class A* |
| | (१) अध्यक्ष | 2,50,000 (निश्चित) | 1 | Chairman |
| | (२) सदस्य | 2,25,000 (निश्चित) | 9 | Member |
| | (३) प्रबंधक | S-27 : 118500–214100 | 3 | Registrar |
| | (४) उप प्रबंधक | S-24 : 71100–211900 | 3 | Dy. Registrar |
| | (५) सहायक प्रबंधक | S-23 : 67700– 208700 | 3 | Asst. Registrar |
| | (६) संशोधन अधिकारी | S-23 : 67700–208700 | 3 | Research Officer |
| | (७) वरिष्ठ स्वीय सहायक | S-23 : 67700– 208700 | 1 | Senior Personal Assistant |
| | | **एकूण** | **23** | **Total** |
| **२ राजपत्रित गट-ब** | | | | *2 Gazetted Class B* |
| | (१) स्वीय सहायक | S-16 : 44900–142400 | 3 | Personal Assistant |
| | (२) ग्रंथपाल | S-15 : 41800–132300 | 3 | Librarian |
| | | **एकूण** | **6** | **Total** |
| **३ अराजपत्रित गट-ब** | | | | *3 Non-Gazetted Class B* |
| | (१) अधीक्षक | S-14 : 38600–122800 | 6 | Superintendant |
| | (२) शिरस्तेदार | S-14 : 38600–122800 | 8 | Shirestedar |
| | (३) लघुलेखक (उ. श्रे.) | S-15 : 41800–132300 | 12 | Stenographer (H. G.) |
| | (४) लघुलेखक (नि. श्रे.) | S-14 : 38600–122800 | 4 | Stenographer (L. G.) |
| | | **एकूण** | **30** | **Total** |
| **४ अराजपत्रित गट-क** | | | | *4 Non-Gazetted Class C* |
| | (१) सहायक | S-10 : 29200–92300 | 7 | Assistant |
| | (२) लेखापाल .. | S-10 : 29200–92300 | 2 | Accountant |
| | (३) लघुटंकलेखक .. | S-8 : 25500–81100 | 4 | Steno Typist |
| | (४) लिपिक/लिपिक टंकलेखक | S-6 : 19900–63200 | 18 | Clerk-cum-Typist |
| | (५) वाहन चालक .. | S-6 : 19900–63200 | 13 | Driver |
| | | **एकूण** | **44** | **Total** |
| **५ अराजपत्रित गट-ड** | | | | *5 Non-Gazetted Class IV* |
| | (१) चोपदार .. | S-6 : 19900– 63200 | 10 | Chopdar |
| | (२) नाईक .. | S-3 : 16600–52400 | 3 | Naik |
| | (३) बांधणीकार-फाईलकारी .. | S-3 : 16600–52400 | 3 | Binder Cum Filer |
| | (४) शिपाई .. | S-1 : 15000– 47600 | 21 | Peon |
| | (५) शिपाई (बाह्ययंत्रणा) .. | S-1 : 15000– 47600 | 4 | Peon (Outsourcing) |
| | (६) सफाईगार (बाह्ययंत्रणा) .. | S-1 : 15000– 47600 | 3 | Sweeper |
| | | **एकूण** | **44** | **Total** |
| | | **एकूण बेरीज** | **147** | **Grand Total** |

## कार्यक्रम क्रमांक ७

### निवास व्यवस्था नियंत्रक(२०७० ०१११) (२०७० ०१२९)

१. निवास व्यवस्था नियंत्रक, मुंबई यांचे कार्यालयातर्फे मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८ ची अंमलबजावणी करण्यात येते. त्यासंबंधीचे कामकाज हाताळण्यासाठी १२ अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६ पदे रिक्त आहेत. हा अधिनियम, १९४८ साली अंमलात आला. १९७३ मध्ये सदर अधिनियम हा भारत सरकारने संमत केलेल्या स्थावर मालमत्तेचे अधिग्रहण व संपादन अधिनियमाच्या धर्तीवर कायमस्वरुपी करण्यात आला आहे. शासनाने अधिग्रहीत जागांची आवश्यकता लक्षात घेऊन अधिग्रहणाच्या कालावधी संबंधीच्या तरतुदीमध्ये वेळोवेळी सुधारणा केल्या होत्या.

२. अधिग्रहीत जागांमधील शासकीय परवानेदारांना संरक्षण देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८ मध्ये काही बदल केले. त्यानुसार सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ अन्वये केलेल्या सुधारणा/बदल यांस मा. मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र. १८८६/९७ वर निर्णय देताना रद्दबातल ठरविले होते. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुद्ध राज्य शासनामार्फत मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलांवर न्यायालयाने सन २००३ मध्ये निर्णय देताना, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे वरील आदेश रद्दबातल करून सुधारित अधिनियमातील तरतुदी वैध ठरविण्यापुरताच निकाल दिला आहे. तथापि, त्यापूर्वी मा. मुंबई उच्च न्यायालयाने जे अधिग्रहण आदेश रद्द केले होते त्यातील रहिवाशांना/कार्यालयांना निष्कासित करणे आवश्यक आहे, असेही मा. सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रात नमूद केले आहे. म्हणजेच वर नमूद केल्याप्रमाणे निष्कासनाची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे.

तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी विविध प्रकरणात दिलेल्या निकालांनुसार तसेच अन्यथा अपात्र ठरलेल्या सरकारी परवानेदारांविरुद्ध उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार निष्कासन कारवाई करण्यात येऊन जागेचा ताबा संबंधित घरमालकांना सुपूर्द करण्याची कार्यवाही सुरू आहे. अपात्र परवानेदारांविरुद्ध अपिलीय प्राधिकरणाने बजावलेल्या आदेशांविरुद्धची अपिले मा. मुंबई उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.

## (१) निवास व्यवस्था नियंत्रक यांचे कार्यालय, मुंबई

**(4) कर्मचारीविषयक गोषवारा**

(iv) Personnel Summary

**तक्ता १**/Table I

| अनुक्रमांक Sr. No. (1) | पदनाम (2) | वेतनस्तर/ Level of Pay (3) | पदांची संख्या / No. of Post 2024-2025 (4) | 2025-2026 (5) | Designation (6) |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | **राजपत्रित—** | | | | *Gazetted—* |
| | (१) निवास व्यवस्था नियंत्रक व अवर सचिव | .. S-23 : 67700— 208700 .. | 1 | 1 | (1) Controller of Accomodation & Under Secretary |
| | (२) कक्ष अधिकारी | .. S-17 : 47600— 151100 .. | 1 | 1 | (2) Section Officer |
| | | .. S-21 :57100— 180800 .. | | | |
| | | **एकूण** .. | **2** | **2** | **Total** |
| **२.** | **अराजपत्रित, वर्ग २** | | | | *2. Non-Gazetted Class II* |
| | (१) सहायक लेखा धिकारी | .. S-15 : 41800— 132300 .. | 1 | 1 | (1) Asst. Account Officer |
| | (२) सहायक कक्ष अधिकारी | .. S-14 : 38600— 122800 .. | 4 | 4 | (2) Assistant Desk Officer |
| | | **एकूण** .. | **5** | **5** | **Total** |
| **३.** | **अराजपत्रित, वर्ग २** | | | | *3. Non-Gazetted Class II* |
| | (१) लेखापाल | .. S-8 : 25500— 81100 .. | 1 | 1 | (1) Bill Accountant |
| | (२) निरीक्षक | .. S-8 : 25500— 81100 .. | 1 | 1 | (2) Area Inspector |
| | (३) लिपिक | .. S-6 : 19900— 63200 .. | 2 | 2 | (3) Clerk |
| | (४) टंकलेखक (मराठी) | .. S-6 : 19900— 63200 .. | 1 | 1 | (4) Typist (Marathi) |
| | | **एकूण** .. | **5** | **5** | **Total** |
| | | **एकूण** .. | **12** | **12** | **Total** |
| | | **एकूण** .. | **12** | **12** | **Grand Total** |

# (७) वित्तीय आवश्यकता

# (vii) Financial Requirement

## (७) वित्तीय आवश्यकता
## (vii) Financial Requirement

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | A— Activity Classification |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (1) |
| १ | निवास व्यवस्था नियंत्रक | 0 | 7 | 7 | 7 | (1) Controller of Accommodation. |
| २ | शासनाच्या स्वाधीन केलेल्या बृहन्मुंबईतील सदनिकांच्या मालकांना द्यावयाची भरपाई रक्कम, भाडेपट्टी व कर. | 0 | 1 | 1 | 1 | (2) Payment of rent to the owners of the surrender flats in Greater Bombay. |
| | **एकूण (अ) . .** | **0** | **8** | **8** | **8** | **Total (A)** |
| | (ब) वित्तीय व्यवस्थेतील साधने— | | | | | (B) Sourcr Of Finanace |
| | मागणी क्र. प्रधानशीर्ष | | | | | Demand No. Major Head |
| | ए-४ २०७० | 0 | 7 | 7 | 7 | A— 4 2070 |
| | ए-५ २२१६ | 0 | 1 | 1 | 1 | A— 5 2216 |
| | **एकूण (ब) . .** | **0** | **8** | **8** | **8** | **... Total (B)** |

## कार्यक्रम क्र. ८

## संकीर्ण सर्वसाधारण सेवा

### (१) उपाहारगृहे योजना

शासनातर्फे अवाणिज्यिक (Non-commercial) तत्त्वावर कल्याणकारी योजना म्हणून खालील उपाहारगृह चालविण्यात येत आहेत. उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील खर्च भागविण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळते. खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी होणारा सर्व खर्च हा खाद्यपदार्थांच्या विक्रीमधून भागविला जावा अशी अपेक्षा आहे.

(१) चौरस आहारगृह

(२) मंत्रालय उपाहारगृह

(३) कोकण भवन उपाहारगृह

(४) विधान भवन उपाहारगृह

### चौरस आहारगृह (२०७५ ०१४२)

अल्प वेतन धारक शासकीय कर्मचाऱ्यांवर होणारे आर्थिक विपरीत परिणाम टाळण्याच्या उद्देशाने स्वतंत्रपूर्व काळात ऑगस्ट, १९४५ मध्ये चौरस आहारगृह सुरू करण्यात आले असून, ऑगस्ट, १९६७ मध्ये हे उपाहारगृह शासकीय नोकरदारांसाठी स्थायी कल्याणकारी योजना म्हणून चालविण्याचा निर्णय शासनाने घेतला. दुपारच्या जेवणातील पौष्टिक मूल्य साधारणपणे ८५० ते ८८० कॅलरी इतके आहे.त्यानुसार चौरस आहारगृहामार्फत दुपारचे भोजन उपलब्ध करून देण्यात येते. सन २०१७ मध्ये चौरस आहारगृहाच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून राजपत्रित अधिकाऱ्यांचा दर्जा व त्यांचा अमूल्य वेळ विचारात घेऊन त्यांच्यासाठी चौरस आहारगृहात स्वतंत्र वातानुकुलिन बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. चौरस आहारगृहातील दुपारच्या भोजनासाठी मासिक कार्डधारक राजपत्रित अधिकारी यांना रु. ३० व कर्मचारी यांना रुपये २० प्रतिदिन दराने साधारणतः दररोज ७०० ते ८०० अधिकारी/कर्मचारी यांना भोजन देण्यात येते. मंत्रालय सुरक्षा विचारात घेऊन चौरस आहारगृहाला पाईप लाईन (PNG) द्वारे गॅस पुरवठा करण्यात आला आहे. गेली पंच्याहत्तर वर्षे यशस्वीरित्या चालविण्यात येणारे चौरस आहारगृह हे वाजवी किमतीत मिळणाऱ्या पौष्टिक आहाराचे केंद्र आहे.

### मंत्रालय उपाहारगृह योजना (२०७५ ०१३१)

अवाणिज्यक तत्वावर कल्याणकारी योजना म्हणून मंत्रालय उपाहारगृह सन १९५९ पासून चालविण्यात येत आहे. साधारणपणे दररोज सुमारे ८,००० शासकीय कर्मचारी व अभ्यागत या उपाहारगृहातील सेवेचा लाभ घेतात. मंत्रालय मुख्य इमारतीच्या पोट मजल्यावर कार्यरत असलेल्या उपाहारगृहाचे सन २०१८-२०१९ मध्ये पहिल्यांदाच नुतनीकरण करण्यात आले आहे. मंत्रालयातील अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांचा दर्जा विचारात घेऊन त्यांच्याकरिता स्वंतत्र वातानुकूलित बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच महिला अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. मंत्रालयाची सुरक्षा विचारात घेऊन मंत्रालय उपाहारगृहाला पाईप लाईनद्वारे (PNG) गॅस पुरवठा सुरू करण्यात आला आहे. खाजगी उपाहारगृहातील खाद्यपदार्थांच्या विक्रीच्या दराच्या तुलनेत मंत्रालय उपाहारगृहातील वस्तुंचे दर हे अत्यंत अल्प असून उपाहारगृहामार्फत दर्जेदार खाद्य पदार्थ पुरविण्यात येतात.

### कोकण भवन उपाहारगृह (२०७५ ०१५१)

सन १९७६ मध्ये नवी मुंबई येथील कोकण भवन इमारतीमध्ये राज्य शासनाची वेगवेगळ्या खात्याची विभागीय कार्यालये सुरू करण्यात आली. या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी आणि कार्यालयात कामासाठी येणारे अभ्यागत यांची खान-पाना संदर्भातील गरज विचारात घेऊन मार्च, १९७६ मध्ये कोकण भवनामध्ये उपाहारगृह सुरू करण्यात आले. सदर उपाहारगृहाच्या दुरुस्तीचे काम करून घेण्यात आले. कोकण भवन उपाहारगृहामार्फत वाजवी किमतीत दर्जेदार खाद्यपदार्थ पुरविण्यात येतात. कोकण भवन उपाहारगृहासाठी पाईप लाईन (PNG) द्वारे गॅस पुरवठा करण्यात आला आहे.

### विधान भवन उपाहारगृह (२०७५ ०१६९)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे नवीन विधान भवन इमारतीत जून, १९८१ मध्ये स्थानापन्न झाल्यानंतर दिनांक १ ऑक्टोबर १९८१ पासून विधान भवन उपाहारगृह सुरू करण्यात आले असून विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच विधान मंडळाच्या अधिवेशन कालावधीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदय, मा.मंत्री महोदय तसेच विधानसभा व विधान परिषद सदस्यांना विधान भवन उपाहारगृहामार्फत वाजवी किंमतीत भोजन, चहापान आणि अल्पोपहाराची सेवा देण्यात येते.

उपाहारगृहामार्फत दर्जेदार सेवा देण्याच्या उद्देशाने मंत्रालय उपाहारगृह, विधानभवन उपाहारगृह, कोकण भवन उपाहारगृह व चौरस आहारगृह तील व्यवस्थापकीय बाजूकडील सर्व अधिकारी कर्मचारी यांना यशदा, पुणे यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच उपाहारगृहातील साधारण ४४ कर्मचारी यांनी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्थेमार्फत बेसिक कॅटरिंग हा कोर्स पूर्ण केला आहे. जास्तीत जास्त कर्मचारी व अधिकारी यांना बेसिक कॅटरिंगबाबतचे प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे.

### (२) स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती (२२५१ ०३२९)

देशाच्या स्वातंत्र्यासाठी वेळोवेळी जे लढे, आंदोलने, चळवळी उत्स्फूर्तपणे व जनजागृतीतून झाल्या त्यामध्ये ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून सक्रीय सहभाग घेतला, कारावास भोगला, लाठीमार सोसला, फटक्यांच्या शिक्षा भोगल्या, गोळीबारात जखमी झाल्यामुळे अपंगत्व आले तसेच ज्यांनी भूमिगत राहून स्वातंत्र्यासाठी कार्य केले त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने व त्यांचा यथोचित गौरव व्हावा या हेतूने या लढ्यामध्ये सहभागी झालेल्या व महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना सन्मानपत्र देण्यात येते. स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या कुटुंबियांना विविध प्रकारच्या सवलती बरोबरच निवृत्तिवेतन देण्याची योजनाही महाराष्ट्र शासनाने सन १९६५ पासून लागू केलेली आहे.

२. स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्तिवेतन व आर्थिक सहाय्यासंबंधीचे प्रलंबित अर्ज व नवीन अर्ज निकाली काढण्यासाठी व त्यासंबंधी धोरण ठरविण्यासाठी शासनास शिफारशी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली "स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार

समिती" ची स्थापना करण्यात आली आहे. समितीच्या कार्यकक्षेत सरकारी यंत्रणेच्या सहाय्याने राज्य शासनाकडे स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनासाठी प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करणे तसेच विहित सवलती संबंधात शासन यंत्रणेला मार्गदर्शन करणे, भारत सरकारच्या निवृत्तिवेतनासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करून केंद्र शासनाला शिफारस करणे तसेच राज्यातील हुतात्मा स्मारकाच्या संबंधातील विविध प्रश्न हाताळणे या बाबींचा समावेश आहे. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता प्रस्तुत लेखाशीर्षाखाली रुपये २.५४ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(अ) राज्य शासन निवृत्तिवेतनधारकांना व त्यांच्या पश्चात त्यांच्या विधवा पत्नीला/पतीस खालीलप्रमाणे निवृत्तीवेतन देण्यात येते :—**

| अ. क्र. | शासन निर्णय दिनांक | निवृत्तिवेतन | स्त्री/ पुरुष | कोणत्या दिनांकापासून अनुज्ञेय |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | १९ नोव्हेंबर, १९६५ | ५० | ---- | १९ ऑक्टोबर १९६५ |
| २ | ३० जुलै, १९७५ | १०० | ---- | १ एप्रिल १९७५ |
| ३ | ७ ऑगस्ट, १९८१ | १५० | ---- | १ ऑगस्ट १९८१ |
| ४ | ४ ऑगस्ट, १९८७ | २५० | ---- | १ जुलै १९८५ |
| ५ | ७ जानेवारी, १९८९ | ३७५ | ---- | १ ऑगस्ट १९८८ |
| ६ | ---- | ५०० | पुरुष | २ ऑक्टोबर १९९० |
| ७ | ---- | ६०० | स्त्री | ९ ऑगस्ट १९९२ |
| ८ | २४ ऑक्टोबर, १९९४ | १००० | पुरुष | २ ऑक्टोबर १९९४ |
| | ---- | ११०० | स्त्री | ---- |
| ९ | १६ मार्च, १९९८ | १५०० | पुरुष | १५ ऑगस्ट १९९७ |
| | ---- | १६०० | स्त्री | ---- |
| १० | ८ मार्च, २००० | २००० | पुरुष | १ मार्च २००० |
| | ---- | २१०० | स्त्री | ---- |
| ११ | २३ ऑगस्ट, २००४ | ३००० | पुरुष | १ जून २००४ |
| | ---- | ३१०० | स्त्री | ---- |
| १२ | २ नोव्हेंबर, २००६ | ४००० | पुरुष | २ ऑक्टोबर २००६ |
| | ---- | ४१०० | स्त्री | ---- |
| १३ | २४ सप्टेंबर, २००८ | ६००० | पुरुष | २४ सप्टेंबर २००८ |
| | ---- | ६१०० | स्त्री | ---- |
| १४ | ७ डिसेंबर, २०१० | ८००० | ---- | २ ऑक्टोबर २०१० |
| १५ | ३ सप्टेंबर, २०१४ | १०००० | ---- | २ ऑक्टोबर २०१४ |
| १६ | २२ नोव्हेंबर, २०२२ | २०००० | ---- | १ नोव्हेंबर, २०२२ |

**(ब) केंद्र शासन स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन धारकांसाठी (२२३५ ००१५)**

केंद्र शासनाचे निवृत्तीवेतन मंजूर झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांना केंद्र शासनाच्या स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्तीवेतना व्यतिरिक्त राज्यशासनाकडून दिनांक १ ऑगस्ट १९८२ पासून राज्यशासन निवृत्तीवेतन देण्यात येत आहे. दिनांक १ नोव्हेंबर २०२२ पासून सदर स्वातंत्र्य सैनिकांना रुपये २०,००० या दराने राज्य शासनाकडून निवृत्तीवेतन अदा केले जात आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याबरोबरच, हैद्राबाद मुक्ती लढा व गोवा मुक्ती आंदोलन यामध्ये भाग घेतलेल्यांनाही राज्य शासनाने स्वातंत्र्य सैनिक म्हणून संबोधले यामध्ये त्यासाठी काही निकष विहित करण्यात आले आहेत. त्या अटींची पूर्तता करणाऱ्या अर्जदारांना तसेच स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्याने ज्यांना अपंगत्व आले, गोळीबारात जखमी झाले, अथवा ज्यांना फटक्याची शिक्षा झाली आहे अशांनाही स्वातंत्र्य सैनिक समजून निकष ठरवून देण्यात आले आहेत. त्यानुसार पात्र ठरलेल्या व्यक्तींना स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतन मंजूर करण्यात येते. सद्यःस्थितीत ऑक्टोबर, २०२३ राज्यातील राज्य व केंद्रीय स्वातंत्र्यसैनिक निवृत्तीवेतनधारकांची एकूण संख्या सुमारे ७९५ इतकी आहे. दिनांक २२ जुलै, १९८६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार स्वातंत्र्य सैनिकांना थेट बँकेमार्फत निवृत्ती वेतन अदा करण्याबाबतचा पर्याय उपलब्ध करून दिला होता त्याप्रमाणे काही स्वातंत्र्य सैनिक थेट बँकेतून निवृत्तीवेतन घेत आहेत.

स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृत्तीवेतन व इतर सवलतीकरिता सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरिता अंदाजपत्रकात रुपये १०३५४.९२ लक्ष एवढी तरतूद मंजूर झाली आहे.

**(क) स्वातंत्र्य सैनिकांना अथवा त्यांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या इतर आर्थिक सवलती खालीलप्रमाणे आहेत :—**

| | | |
|---|---|---|
| (अ) | स्वातंत्र्य सैनिकांचे अथवा त्यांची पत्नी/ पती मृत्यु झाल्यास अंत्यसंस्कारासाठी. | रुपये ५०००/- |
| (ब) | स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या विधवांना त्यांनी शासकीय रुग्णालयात/शासन मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय उपचारावरील/औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती. (प्रत्येक आर्थिक वर्षात) | रुपये १०,००० |
| (क) | स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलीच्या लग्नासाठी | रुपये ५,००० |

**(३) हुतात्मा स्मारके (२०५९ ००१५)**

भारतीय स्वातंत्र्य लढा व मुक्ती संग्रामात ज्या व्यक्तींनी भाग घेतला व देशासाठी प्राणार्पण केले अशा व्यक्तींच्या स्मरणार्थ महाराष्ट्र राज्यात २०६ ठिकाणी शासनाने हुतात्मा स्मारके बांधली आहेत. १९८३ पासून या हुतात्मा स्मारकांची देखभाल व परिरक्षणाचे काम ग्रामीण भागात जिल्हा परिषदा व शहरी भागात नगरपालिका, महानगरपालिका यांचेकडे सोपविण्यात आले होते. सदर हुतात्मा स्मारके जिल्हा पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या जिल्हा हुतात्मा स्मारक समितीच्या सल्ल्यानुसार नोंदणीकृत शैक्षणिक सेवाभावी संस्थाकडे देखभाल दुरुस्ती परिरक्षणासाठी चालविण्यास देण्यात येतात. या हुतात्मा स्मारकांची वास्तू तसेच त्यांच्या परिसरातील दिवाबत्ती व बागबगीचा यांची व्यवस्था व स्मारकांची देखभाल तसेच पुढील दुरुस्तींची जबाबदारी या शैक्षणिक सेवाभावी संस्थेकडे राहील. त्यासाठी शासनाकडून त्या संस्थांना दरवर्षी प्रत्येक स्मारकामागे रुपये १०,००० अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी निर्णय घेतला आहे. त्यासाठी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाच्या अंदाजपत्रकात रुपये २०.६० लाख एवढी तरतूद मंजूर आहे. शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक हुतात्मा स्मारकामागे रुपये १०,००० प्रमाणे २०६ हुतात्मा स्मारकांच्या देखभाल, निगा यासाठी व सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाच्या अंदाज पत्रकात रुपये २०.६० लक्ष इतका निधी प्रस्तावित केला आहे.

**(४) मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव (२२३५ सी ५९१)**

दिनांक १७ सप्टेंबर २०२३ रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामास ७५ वर्षे पूर्ण होत असल्यामुळे दिनांक १७ सप्टेंबर २०२२ ते दिनांक १७ सप्टेंबर २०२३ हे वर्ष मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्याची घोषणा महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२२ च्या पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनातील अर्थसंकल्पिय भाषणात केली होती. त्याअनुषंगाने, अमृत महोत्सवी वर्षातील कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासाठी दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा. मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर मा. मंत्रिमंडळ उपसमितीने शिफारस केलेल्या कार्यक्रम आराखडा व खर्च आराखड्यास दिनांक ७ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षात विविध कार्यक्रमांचे आयोजन व अमलबजावणीसाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात रु. १००००.०० लक्ष निधीची तरतूद करण्यात आली आहे. मा. उच्चस्तर सचिव समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणे या प्रयोजनाखाली मराठवाडा मुक्तीसंग्राम स्मृतिस्मारक उभारण्यास व त्यासाठी होणाऱ्या रु. ९२९२.०० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दि. २० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे. सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरिता रु. ९२९२.०० लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**(५) आणीबाणीच्या कालावधीमध्ये कारावास भोगलेल्या व्यक्तींना मानधन योजना (२२३५ सी२०५)**

भारतामध्ये दिनांक २५ जून १९७५ ते दिनांक २१ मार्च १९७७ या कालावधीत आणीबाणी घोषित केली होती. सदर कालावधीत महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असलेल्या ज्या व्यक्तींना बंदिवास सोसावा लागला. अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासाठी आणीबाणी काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास व्यक्तींना मासिक रु. १०,००० व त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस/पतीस रु. ५,००० तसेच एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या व्यक्तींना मासिक रु. ५,००० तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस/पतीस रु. २,५०० मानधन मंजूर केले आहे (शासन निर्णय क्र. निवृवे-१०१५/प्रक्र. २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१, दिनांक ३ जुलै २०१८)

कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याचा कर व करेतर उत्पन्नातील अपेक्षित महसुली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेऊन मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने सदर योजना बंद केली होती. **(शासन निर्णय क्र. निवृवे-१०१५/प्रक्र. २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१, दिनांक ३१ जुलै २०२०)**

मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर योजना दिनांक १ ऑगस्ट, २०२२ पासून पुन्हा सुरू केली व योजना बंद असलेल्या कालावधीतील थकबाकी अनुज्ञेय केली आहे. (शासन निर्णय क्र. दिनांक २८ जुलै, २०२२) या योजनेच्या अनुषंगाने सन्मा. लोकप्रतिनिधी, विविध संघटना तसेच आणीबाणीधारकांनी मानधन वाढीबाबत केलेली निवेदने शासनास प्राप्त झाली होती. यानुषंगाने सदर प्रस्ताव मा. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला असून मा. मंत्रिमंडळाने त्यास मान्यता दिली आहे. प्राप्त झालेल्या मान्यतेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आणीबाणीधारकांच्या मानधनात वाढ करण्यात आली.

(अ) एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु.२०,०००/- व त्यांच्या पश्चात पती / पत्नीस रु.१०,०००/- इतके मानधन देण्यात येईल.

(ब) एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु. १०,०००/- तर त्यांच्या पश्चात पती/पत्नीस रु. ५०००/- इतके मानधन अनुज्ञेय राहील.

**(शासन निर्णय क्र. बियूडी -२०२५/प्र. क्र. ७९/स्वासैक-१, दिनांक २७ जून २०२५)** आणीबाणीधारकांना मानधन देण्यासाठी सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरिता रु. ५५५०.४६ इतकी अर्थसंकल्पित केली आहे.

## संकीर्ण सर्वसाधारण सेवा

### (६) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलनातील हुतात्म्यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतन (२२३५ २४९३)

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलनामध्ये ज्या व्यक्तींनी बलिदान दिले आहे, अशा व्यक्तींना "**हुतात्मा**" म्हणून जाहीर करून त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकास स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणेच दरमहा निवृत्तीवेतन व इतर आर्थिक सवलती देण्याबाबत दिनांक १७ ऑक्टोबर १९९७ अन्वये शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तद्नंतर सध्या कर्नाटक राज्यामध्ये असलेल्या वादग्रस्त सीमा भागातील ज्या मराठी भाषिक व्यक्तींनी सीमा आंदोलनामध्ये बलिदान दिलेले आहे, अशा व्यक्तींनादेखील "हुतात्मा" म्हणून जाहीर करून त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकास स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणेच दरमहा निवृत्तीवेतन व इतर आर्थिक सवलती देण्याचे आदेश दिनांक ८ जानेवारी १९९९ रोजी निर्गमित करण्यात आले.

सद्यःस्थितीत दिनांक ३१ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयान्वये रु. २०,००० इतके निवृत्तीवेतन दिले जात आहे. तसेच रुपये ५०० वार्षिक प्रवासभत्ता व रुपये ५,००० वार्षिक तात्कालिक कारणांसाठी आर्थिक मदत म्हणून देण्यात येत आहे. **या योजनेचे सध्या मुंबई-३, रत्नागिरी-१ व कोल्हापूर-५ असे एकूण ९ लाभार्थी आहेत.** त्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात रु. २२,०९,५०० इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

तक्ता -एक

**TABLE-1**

(८) वित्तीय आवश्यकता

**(viii) Financial Requirement**

## (८) वित्तीय आवश्यकता
## (viii) Financial Requirement

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. | (अ) कार्यांचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | A— Activity Classification |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| १ | उपाहारगृह भांडार विभाग | 175553 | 280170 | 192913 | 267808 | (1) Canteen Stores Deptt. |
| २ | स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, इत्यादींना निवृत्तिवेतन. | 865603 | 1035492 | 1035492 | 400000 | (2) Pension to Freedom Fighters and their dependants etc. |
| ३ | सार्वजनिक बांधकामे हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण व निगा. | 6698 | 2060 | 71696 | 2163 | (3) Public Works, Maintenance and upkeep of Hutatma Smaraks. |
| ४ | राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ती यांची स्मारके किंवा पुतळे यांचे बांधकाम. | 80163 | 100950 | 99801 | 88519 | (4) Construction of Monuments and Statues of Great National Personalities. |
| ५ | महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलनातील हुतात्मांच्या वारसांना निवृत्तिवेतन. | 2165 | 2210 | 2210 | 2210 | (5) Pension to Family members of Martyrs in the Maharashtra-Karnataka Border Dispute agitation. |
| ६ | स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती | 0 | 254 | 204 | 5 | (6) High Power Committee for Freedom Fighter. |
| ७ | सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणाऱ्या व्यक्तींना आर्थिक मदत. | 338528 | 555046 | 725047 | 555046 | (7) Monetory Relief for People fighting for Democracy during Emergency from 1975 to 1977. |
| ८ | मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणे. | 0 | 1000000 | 700000 | 350000 | (8) To celebrate Marathwada Mukti Sangram Amrit Mahotsavi Year. |
| | **एकूण (अ) ...** | **1468710** | **2976182** | **2827363** | **1665751** | **Total–‘A’** |
| | (ब) वित्त व्यवस्थेतील साधने— | | | | | (B) *Source of finance–* |
| | मागणी क्र. प्रधानशीर्ष | | | | | Demand No. Major Head |
| | ए-४ २०७५ .. | 175553 | 280170 | 192913 | 267808 | A— 4 2075 |
| | ए-५ २२३५ .. | 1206296 | 2592748 | 2462749 | 1307256 | A— 5 2235 |
| | ए-५ २२५१ .. | 0 | 254 | 204 | 5 | A— 5 2251 |
| | ए-४ २०५९ .. | 86861 | 103010 | 171497 | 90682 | A— 4 2059 |
| | **एकूण (ब) ...** | **1468710** | **2976182** | **2827363** | **1665751** | **Total–‘B’** |

**तक्ता क्र. १**

TABLE 1

प्रत्यक्ष खर्च

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| | खर्च (योजनेत्तर) Expenditure on | | | | | | | परिणाम Net Result | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष<br>Year<br>Rs. | साधन सामग्रीव पुरवठा<br>Material & Supplies<br>Rs. | व्यवस्थापना वरील खर्च<br>Management Expenses<br>Rs. | इतर खर्च<br>Other Expenses<br>Rs. | एकूण<br>Total<br>Rs. | जमा<br>Receipts<br>Rs. | निव्वळ खर्च<br>Net Expenditure<br>Rs. | अर्थसहाय्य<br>Subsidy from Government<br>Rs. | बचत<br>Saving<br>Rs. | अधिक्य<br>Excess<br>Rs. |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| 2022-2023<br>प्रत्यक्ष<br>(Actual) | 33513 | 151936 | 2633 | 188082 | 33911 | 154171 | 152986 | -- | [-] 1185 |
| 2023-2024<br>प्रत्यक्ष<br>(Actual) | 42483 | 153046 | 1667 | 197196 | 32560 | 164636 | 137640 | -- | [-] 26996 |
| 2024-2025<br>प्रत्यक्ष<br>(Actual) | 43413 | 130981 | 1167 | 175561 | 40133 | 135428 | 132044 | | [-] 3384 |

**कर्मचारी विषयक गोषवारा**

**Personnel Summary**

**(१) उपाहारगृह योजना**

**Canteen Scheme**

तक्ता १ / Table I

| अनु. क्रमांक Sr. No. (1) | पदनाम (2) | | वेतनमान Scale of Pay (3) | ग्रेड पे Grade Pay (4) | पदांची संख्या No. of Posts 2025-2026 (5) | | Designation (6) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **राजपत्रित गट अ–** | | | | | | *1. Gazetted Officer Group-A* |
| | महाव्यवस्थापक | .. | 67700-208700 | S-23 | 1 | .. | General Manager |
| | | | | **एकूण** | **1** | | **Total** |
| २ | **राजपत्रित गट ब–** | | | | | .. | *2. Gazetted Officer Group-B* |
| | प्रशासन अधिकारी | .. | 56100-177500 | S-20 | 1 | .. | Administrative Officer |
| | वरिष्ठ व्यवस्थापक | .. | 44900-142400 | S-16 | 1 | .. | Senior Manager |
| | सहायक लेखा परीक्षा अधिकारी | .. | 41800-132300 | S-15 | 1 | .. | Assistant Audit Officer |
| | सहायक लेखा अधिकारी | .. | 41800-132300 | S-15 | 2 | .. | Assistant Accounts Officer |
| | | | | **एकूण** | **5** | | **Total** |
| ३ | **अराजपत्रित, गट ब–** | .. | | | | .. | *3. Non-Gazetted Officer* |
| | मुख्य लिपिक | .. | 38600-122800 | S-14 | 1 | .. | Head Clerk |
| | मंत्रालयीन सहायक | .. | 38600-122800 | S-14 | 1 | .. | Assistant |
| | व्यवस्थापक | .. | 38600-122800 | S-14 | 3 | .. | Manager |
| | | | | **एकूण** | **5** | | **Total** |
| ४ | **अराजपत्रित, गट क–** | .. | | | | .. | *4. Non-Gazetted Officer* |
| | वरिष्ठ लिपिक | .. | 35400-112400 | S-13 | 1 | .. | Senior Clerk |
| | उप लेखापाल | .. | 35400-112400 | S-13 | 1 | .. | Dy. Accountant |
| | वरिष्ठ भांडारपाल | .. | 35400-112400 | S-13 | 1 | .. | Sr. Store Keeper |
| | उप व्यवस्थापक | .. | 29200-92300 | S-10 | 3 | .. | Dy. Manager |
| | सहायक व्यवस्थापक | .. | 21700-69100 | S-7 | 5 | .. | Asstt. Manager |
| | लेखा लिपिक | .. | 19900-63200 | S-6 | 3 | .. | Accounts Clerk |
| | भांडारपाल | .. | 19900-63200 | S-6 | 4 | .. | Store-Keeper |
| | लिपिक-टंकलेखक | .. | 19900-63200 | S-6 | 4 | .. | Clerk-Typist |
| | देयक लेखापाल | .. | 19900-63200 | S-6 | 3 | .. | Bill Accountant |
| | रोखपाल | .. | 19900-63200 | S-6 | 2 | .. | Cashier |
| | | | | **एकूण** | **27** | | **Total** |
| ५ | **अराजपत्रित, गट ड–** | | | | | | *5. Non-Gazetted Officer* |
| | मुख्य आचारी | .. | 21700-69100 | S-7 | 2 | .. | Head Cook |
| | कूपन विक्रेता | .. | 21700-69100 | S-7 | 5 | .. | Coupan Seller |
| | आचारी | .. | 17100-54000 | S-4 | 17 | .. | Cooks |
| | चहा तज्ज्ञ | .. | 17100-54000 | S-4 | 4 | .. | Tea Specialist |
| | वेटर नि सहायक आचारी | .. | 15300-48700 | S-2 | 161 | .. | Waiter Cum Asstt. Cooks |
| | शिपाई | .. | 15000-47600 | S-1 | 2 | .. | Peon |
| | | | | **एकूण** | **191** | | **Total** |
| | | | | **एकूण बेरीज** | **229** | | **Grand Total** |

## सन २०२४-२०२५ मधील मंत्रालय उपाहारगृह योजने अंतर्गत आहार/उपाहारगृहाच्या प्रत्यक्ष खर्चाचे व जमेचे विवरणपत्र

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | योजनेचे नाव | वेतन | अतिकालिक भत्ता | दूरध्वनी विज व पाणी खर्च | प्रवास खर्च | कार्यालयीन खर्च | कंत्राटी सेवा | संगणका-वरील खर्च | जाहिरात व प्रसिद्धी खर्च | यंत्रसामग्री, साधनसामग्री व पुरवठा | एकूण खर्च | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| १ | मंत्रालय उपाहारगृह योजना .. | 58712 | 0 | 638 | 275 | 146 | 7369 | 0 | 75 | 27703 | 94918 | 19225 |
| २ | चौरस आहारगृह योजना .. | 24290 | 1 | 121 | 65 | 25 | 2511 | 0 | 0 | 5090 | 32103 | 3717 |
| ३ | कोकण भवन उपाहारगृह योजना .. | 16925 | 1 | 130 | 37 | 25 | 1824 | 0 | 0 | 3321 | 22263 | 2621 |
| ४ | विधान भवन उपाहारगृह योजना .. | 17148 | 2 | 0 | 150 | 6 | 1672 | 0 | 0 | 7299 | 26277 | 14570 |
| | **एकूण** | **117075** | **4** | **889** | **527** | **202** | **13376** | **0** | **75** | **43413** | **175561** | **40133** |
| | **सन २०२५-२०२६ मधील मंत्रालय उपाहारगृह योजने अंतर्गत आहार/उपाहारगृहाच्या खर्चाचे व जमेचे विवरणपत्र** | | | | | | | | | | | |
| १ | मंत्रालय उपाहारगृह योजना .. | 48741 | 130 | 748 | 412 | 1100 | 17738 | 150 | 150 | 34500+25 | 103694 | 3698 |
| २ | चौरस आहारगृह योजना .. | 22622 | 12 | 134 | 200 | 100 | 4800 | 200 | 0 | 9200+20 | 37288 | 3586 |
| ३ | कोकण भवन उपाहारगृह योजना .. | 14977 | 25 | 142 | 250 | 29 | 5100 | 200 | 0 | 5800+20 | 26543 | 2513 |
| ४ | विधान भवन उपाहारगृह योजना | 16248 | 21 | 0 | 225 | 100 | 3900 | 150 | 0 | 14500+11 | 35155 | 11166 |
| | **एकूण** | **102588** | **188** | **1024** | **1087** | **1329** | **31538** | **700** | **150** | **64076** | **202680** | **20963** |
| | **सन २०२६-२०२७ मधील मंत्रालय उपाहारगृह योजने अंतर्गत आहार/उपाहारगृहाच्या अंदाजित खर्चाचे व जमेचे विवरणपत्र** | | | | | | | | | | | |
| १ | मंत्रालय उपाहारगृह योजना .. | 90023 | 130 | 1050 | 450 | 1100 | 27450 | 150 | 150 | 34500+25 | 155328 | 35000 |
| २ | चौरस आहारगृह योजना .. | 29724 | 12 | 200 | 200 | 325 | 4800 | 200 | 0 | 9200+20 | 44681 | 3500 |
| ३ | कोकणभवन उपाहारगृह योजना .. | 24563 | 25 | 200 | 250 | 100 | 4500 | 200 | 0 | 5800+20 | 35658 | 3000 |
| ४ | विधानभवन उपाहारगृह योजना .. | 23112 | 25 | 0 | 225 | 250 | 4200 | 150 | 0 | 14500+20 | 42482 | 16000 |
| | **एकूण** | **167422** | **192** | **1450** | **1125** | **1775** | **41250** | **700** | **150** | **64085** | **278149** | **57500** |

(तक्ता पुढे चालू)

## अर्थसहाय्य २०२४-२०२५

### आस्थापनेवरील खर्च / कर्मचाऱ्यांच्या भोजनावरील खर्च/अर्थसहाय्य

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंत्रालय उपाहारगृह कर्मचारी | | 97 | | | | | | |
| २ | कोकणभवन उपाहारगृह कर्मचारी | | 27 | | | | | | |
| ३ | विधानभवन उपाहारगृह कर्मचारी | | 28 | | | | | | |
| ४ | चौरस आहारगृह कर्मचारी | एकूण | 152 | x | 25 | x | 244 | = | 927200 |
| | | | 31 | x | 18 | x | 244 | = | 136152 |
| | | | | | | | | | 1063352 |
| | | | | | | | म्हणजेच रुपये | | 1063 |

(रुपये हजारांत)

| अ.क्र. | आर्थिक खर्च | आस्थापनेवरील खर्च + | भोजनावरील खर्च = | अर्थसहाय्य |
|---|---|---|---|---|
| | | (वेतन +प्रवास खर्च + अतिकालिक भत्ता) | | |
| १. | 2022-2023 | 151936 | 1050 | 152986 |
| २. | 2023-2024 | 136590 | 1050 | 137640 |
| ३. | 2024-2025 | 130981 | 1063 | 132044 |

## कार्यक्रम क्रमांक ९

### इतर कार्यक्रम

**(१) सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे (२२३५ ००५१)**

राज्यातील माजी सैनिक व त्यांच्या अवलंबिताच्या पुनर्वसनासाठी व कल्याणासाठी विविध योजना राबवणे हे सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे मुख्य काम आहे. या विभागाच्या आस्थापनेवर होणाऱ्या खर्चाच्या ६०% रकमेची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून करण्यात येते.

**(२) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये (२२३५ ००४२)**

महाराष्ट्रात ३० जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये आहेत  ज्या जिल्ह्यात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये नाहीत तेथे संबंधित जिल्हाधिकारी यांच्या देखरेखीखाली नजीकचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी काम पाहतात. माजी सैनिक, युद्ध विधवा व त्यांचे कुटुंबीय यांचे पुनर्वसन व कल्याण यांचेशी संबंधित योजना/कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे काम ही कार्यालये शासनाच्या व सैनिक कल्याण विभागाच्या मार्गदर्शनाखाली करतात. सदर कार्यालयाच्या आस्थापनेवर होणाऱ्या खर्चाच्या ६०% रकमेची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून करण्यात येते.

**(३) छात्रपूर्व प्रशिक्षण योजना  (२२३५ ००३३)**

महाराष्ट्रातील होतकरू तरुणांना संरक्षणदलात भरती करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण देण्यासाठी राज्य शासनाने सन १९६३ पासून छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. या केंद्रामध्ये पुढील प्रकारचे प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. (१) कबाईन्ड डिफेंन्स सर्व्हीसेस या कोर्सची साधारण मर्यादा ७५ दिवस असते. अशाप्रकारचे दोन प्रशिक्षण वर्ग संपूर्ण वर्षात चालविले जातात. (२) सर्व्हीस सिलेक्शन बोर्ड हा प्रशिक्षण वर्ग १० दिवसांचा असतो. संपूर्ण वर्षात अशा प्रकारचे चार कोर्सेस चालविले जातात. या केंद्रात दाखल होणाऱ्या प्रशिक्षणार्थीना मोफत राहण्याची व जेवणाची सोय आहे.

**(४) सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छ. संभाजीनगर (२२३५ ००७१)**

**(१) प्रास्ताविक :** संरक्षण सेवेमध्ये महाराष्ट्रीयन युवक कमी संख्येने जातात याची कारणे शोधण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लेप्टनंट जनरल एस. पी. पी. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीच्या शिफारशीवरून महाराष्ट्र शासनाने त्यांच्या निर्णय क्रमांक एसएसबी/२०७६/७८९०/२८, दिनांक १३ ऑगस्ट, १९७६ नुसार औरंगाबाद येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था एप्रिल, १९७७ मध्ये स्थापन करण्यात आली. या संस्थेचे कार्य ११ जुलै १९७७ ला सुरू झाले. सध्या ही संस्था स्वतःच्या सिडको, एन-१२, सेक्टर येथे सुमारे १० एकर जागेत काम करीत आहे. महाराष्ट्रीय किंवा महाराष्ट्रातील रहिवासी असा दहावी वर्गात शिकत असलेला विद्यार्थी या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी अर्ज करू शकतो. अर्ज केल्यानंतर घेतल्या जाणाऱ्या लेखी व तोंडी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्यांच्या १०वी च्या परीक्षेत कमीत कमी ६० टक्के गुण मिळाल्यास गुणवत्ता यादीनुसार ते या संस्थेत दाखल होऊ शकतात. संस्थेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना स्थानिक शाळेत दाखला देण्यात येतो. संस्थेच्या दोन वर्षात (११वी व १२वी) वास्तव्यात त्यांना मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकासाबाबत प्रशिक्षण दिले जाते, जेणे करून संघ लोकसेवा आयोग (एनडीए) मध्ये प्रवेश देण्यासाठीची पात्रता प्राप्त करतात.

**(२)** संस्थेमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यास त्यांच्या भोजन व निवासासाठीच्या खर्चात तसेच शासनामार्फत प्रति विद्यामागे देण्यात येणाऱ्या भोजन सवलतीमध्ये सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय एसपीआय-२०२३/प्र.क्र.१८०/मासैक, दि.२४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यास त्यांच्या भोजन व निवासासाठी आकाराण्या येणारे शुल्क दरमहा रुपये ५००० व शासनाकडून देण्यात येणारे सवलत शुल्क रु.४०००/-असे वाढविण्यात आले आहे. कमी उत्पन्न गटाच्या पालकांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्पन्नाच्या गटाप्रमाणे शासन ठराविक सूट देते. संस्थेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे. तसेच संस्थेत प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासंदर्भात कार्यपध्दती ठरविणे व शासनाने नियामक मंडळाकडे सोपविलेली कामे पार पाडण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसपीआय-२०२५/प्र.क्र.७९/कार्या.२८, दिनांक २५ एप्रिल, २०२५ अन्वये नियामक मंडळाची पुनर्रचना करण्यात आली असून संस्थेकरिता कार्यरत असलेल्या नियामक मंडळात खालीलप्रमाणे अध्यक्ष व सदस्य आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) | ले. जनरल राजेंद्र रामराव निंभोरकर (निवृत्त)पीव्हीएसएम, युवायएसएम, व्हीएसएम. | : अध्यक्ष |
| (२) | विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग, संभाजी नगर. | : सहअध्यक्ष |
| (३) | एअर व्हाईस मार्शल नितिन वैद्य (निवृत्त) व्हीएसएम. | : सदस्य |
| (४) | रिअर ॲडमिरल आशिष कुलकर्णी (निवृत्त) व्हीएसएम. | : सदस्य |
| (५) | ब्रिगेडीअर हेमंत महाजन (निवृत्त) | : सदस्य |
| (६) | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. | : सदस्य |
| (७) | संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद. | : सदस्य-सचिव |

**(३) आगाऊ अनामत रक्कम :** शासन निर्णय क्रमांक सैसेसं/१०९३/२४७१/ प्र.क्र. १४६/९३/९८, दिनांक १९ मे १९९४ च्या निर्णयानुसार सर्व विद्यार्थ्यांना संस्थेत प्रवेश घेताना आगाऊ अनामत रक्कम म्हणून रुपये ३,०००/- (रुपये फक्त तीन हजार) (मागासवर्गीय जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना रुपये १,५००) संस्थेत विनाव्याज जमा करावे लागतात. भारतीय सैन्यदलात अधिकारी म्हणून कुठल्याही शाखेत प्रवेश मिळविण्यात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यालाच ही रक्कम परत मिळते.

**(४) संस्थेत प्रवेश मिळविण्यासाठीची पात्रता :** अविवाहित पुरुष जो महाराष्ट्रातील रहिवासी व त्याचे वय संस्थेद्वारे दर्शविण्यात आलेल्या जन्मतारखेप्रमाणे असेल आणि ज्याने ७ वी, ८वी, ९वी उत्तीर्ण केलेली असून, १०वीच्या वार्षिक परीक्षेत ६० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळविले आहेत असे विद्यार्थी संस्थेत प्रवेश घेण्यास पात्र आहे.

**(५) शारीरिक पात्रता :** संस्थेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची शारीरिक पात्रता संघ लोक सेवा आयोगाने दिलेल्या निकषानुसार होते. त्यातील काही ठळक मुद्दे :-

(अ) उंची-१५७. सें.मी. (आ.) वजन ४२ कि. ग्रॅम. (इ) छाती (न फुगवता) ७४ सें.मी. व फुगवून ७९ सें.मी. (ई) दृष्टी- निर्दोष व रंग आंधळेपणा नसावा.

**(६) जाहिरात :** संस्थेत प्रवेश मिळविण्याबाबत जाहिराती महाराष्ट्रातील सर्व अग्रगण्य वर्तमानपत्रात प्रत्येक वर्षी नोव्हेंबरमध्ये देण्यात येतात व पात्र ठरलेल्या छात्रांसाठी लेखी परीक्षा ही महाराष्ट्र परीक्षा परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून घेण्यात येते व मौखिक परीक्षा माहे एप्रिल / मे ही संस्थेकडून घेण्यात येते.

**(७) दैनंदिन कार्यक्रम :** महाविद्यालयातील अनुभवी प्राध्यापकांच्या सेवा छात्रांना संघ लोकसेवा आयोगाच्या (एनडीए) स्पर्धात्मक परीक्षेत विषय शिकविण्यासाठी प्राप्त करून घेतल्या आहेत. हे वर्ग शाळेच्या वेळेनंतर घेतले जातात. व्यक्तिगत विकास करण्याबाबतचे वर्ग स्वतः संस्थेचे संचालक घेतात. संस्थेच्या नवनियुक्त संचालक, कर्नल मकरंद का. देशमुख (निवृत्त) यांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी संस्थेच्या संचालक पदाचा कार्यभार घेतला आहे.

**(८)** पीटी, ड्रील, क्रॉसकंट्री व मैदानी सर्व खेळ संस्थेमध्ये शिकविले जातात. १२ वी मध्ये असताना वर्षातून दोनदा सप्टेंबर व एप्रिलमध्ये यु.पी.एस.सी. (एन.डी.ए.) च्या स्पर्धात्मक लेखी परीक्षेस छात्रांना बसावे लागते. जे लेखी परीक्षेत उत्तीर्ण होतात त्यांच्यासाठी संरक्षण सेवेतील निवड मंडळामार्फत सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (SSB) तसेच इतर परीक्षांसाठीचे विशेष प्रशिक्षणामध्ये छात्रांच्या मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकासावर भर देण्यात येतो यात सायकॉलॉजी, ग्रुप टेस्टिंग व इंटरव्ह्यु टेक्निक यांचा समावेश असतो.

**(९)** छात्रांचा सर्वपरीने विकास व्हावा व त्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी या दृष्टीने त्यांच्यासाठी नियमबद्ध व अत्यंत व्यग्र असा कार्यक्रम आखलेला असतो. यासाठी छात्रांच्या इतर कार्यक्रमाचा हातभार असतो. उदा. करमणुकीचे कार्यक्रम वक्तृत्व स्पर्धा इत्यादी.

**(१०) वैद्यकीय :** संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शारीरिक व वैद्यकीय तपासणी तज्ज्ञ डॉक्टर (एम.डी.) यांच्याकडून संस्थेमध्ये करण्यात येते.

**(११)** छात्रांच्या दर महिन्याच्या वैद्यकीय तपासणीसाठी व त्यांच्यावर किरकोळ स्वरूपाचे उपचार करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टराची सोय केली आहे.

**(१२) आकडेवारी माहिती :** या संस्थेत किती अर्ज आले, किती स्वीकारण्यात आले व रद्द झाले, वैद्यकीयदृष्ट्या नाकारण्यात आले, पात्र ठरले व शेवटी किती संस्थेत दाखल झाले याची मागील पाच वर्षांची आकडेवारी सोबतच्या प्रपत्र 'अ' मध्ये देण्यात आली आहे.

**(१३)** संस्था स्थापन झालेपासून म्हणजे १९७७ ते २०२५ पर्यंत संस्थेतून सैन्यदलात अधिकारी पदावर रूजू झालेल्या छात्रांची आकडेवारी सोबतच्या प्रपत्र 'ब' मध्ये देण्यात आली आहे.

**(१४)**कर्मचारीवृंदाचे पद व त्याचे वेतन इत्यादीची माहिती सोबतच्या प्रपत्र 'क' मध्ये देण्यात आली आहे.

**(१५) शिस्तपालन :** छात्रांचा स्वाभिमान वृद्धी व शिस्तबद्ध विकास व्हावा व त्यांना त्याची सवय जडावी यासाठी त्यांच्यावर संस्कार केले जातात. तसेच योगाचे तास घेण्यात येतात.

**(१६)** छात्रांच्या अंतर्गत नेमणुका अशा पद्धतीने आखल्या जातात की त्यामुळे त्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास होण्यास मदत होते.

**(१७)** संस्थेचा विस्तीर्ण परिसर सुमारे १० एकरा चा असून त्यात छात्रांचे वसतिगृह, प्रशासकीय कार्यालय, अधिकारी/ कर्मचारी यांची निवासस्थाने तसेच खेळाची मैदाने आहेत.

**(१८)** संस्थेतील एकूण २५ छात्रांना शौर्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून ४ छात्रांना गौरवशाली सेवा पुरस्काराने गौरवन्वित करण्यात आले आहे. तसेच संस्थेतील एकूण २१ छात्र हे भारतीय सैन्यदलात ध्वजांकित उच्च अधिकारी आहेत. या व्यतिरिक्त संस्थेतील ६ छात्र नागरी क्षेत्रातील अग्रगण्य अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये संघ लोकसेवा आयोगामार्फत राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनिकरीता घेतल्या गेलेल्या लेखी परीक्षेसाठी संस्थेतील ६० छात्र उत्तीर्ण झाले असून त्यांच्या सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या मुलाखतीसाठी बाकी आहेत.

**(५) क्वीन मेरी तंत्रशाळेस सहाय्यक अनुदान (२२३५ ००६२)**

क्वीन मेरी तंत्र शिक्षण संस्था, खडकी, पुणे ही संस्था खाजगी असून माजी अपंग सैनिकांना स्वावलंबी करण्यासाठी तांत्रिक विषयांचे प्रशिक्षण देते. संपूर्ण भारतात या उद्देशासाठी चालविण्यात येणारी ही एकमेव संस्था असून त्यामध्ये अधिकतर महाराष्ट्राचे रहिवासी असलेले माजी अपंग सैनिक शिक्षण घेतात. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसएसबी १०७५/२३३३/२८, दिनांक २३ मार्च १९७८ व शा.नि.क्र. बीयुडी २००९/१२०१/प्रक्र.२०२/२००९/२८, दिनांक १७ फेब्रुवारी २०१० प्रमाणे या संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या डिझेल मॅकेनिक, फिटर, इलेक्ट्रीशियन, कटिंग व टेलेरिंग व वेल्डर या ५ अभ्यासक्रमांसंबंधात प्रशिक्षकांच्या वेतनाच्या खर्चाच्या ५०% रक्कम अनुदान स्वरूपात संस्थेस देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारलेली आहे.

### (६) दुसऱ्या महायुद्धातील माजी सैनिकांना/अवलंबिताना आर्थिक मदत (२२३५ १८३५)

दुसऱ्या महायुद्धात भाग घेतलेल्या महाराष्ट्रातील माजी सैनिकांना व त्यांच्या विधवांना १ ऑक्टोबर १९८९ पासून दरमहा रुपये ३०० इतके अर्थसहाय्य देण्यात येत होते. त्या अर्थसहाय्यात शासनाने वाढ करून दिनांक १ जानेवारी १९९९ पासून दरमहा रुपये ६०० इतके देण्यात येत होते. सदरच्या अर्थसहाय्यात शासनाने वाढ करून दिनांक १ ऑगस्ट २००४ पासून रुपये १,२७५ इतके करण्यात आले होते. पुन्हा त्या अर्थसहाय्यात शासनाने वाढ करून शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२००८/प्र.क्र.९/२८, दिनांक १३ मे २०११ अन्वये १ मे २०११ पासून रुपये ३,००० प्रति महिना इतके करण्यात आले होते. दिनांक १ एप्रिल २०१८ पासून शासनाने सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण २०१५/मुमंस १५/(प्र.क्र. १२८/१५)२८, दिनांक १८ सप्टेंबर २०१८ अन्वये सदर अर्थसहाय्यात वाढ करून रुपये ६,००० प्रति महिना इतके केलेले आहे. या योजनेच्या लाभार्थींची संख्या १७४४ इतकी आहे. शासन निर्णय क्र. दुमयु-२०२३/प्र.क्र. १५०/२८ (मासैक) दिनांक १४ मार्च २०२४ नुसार दिनांक १ जानेवारी २०२४ पासून रु. ११,०००/- अर्थसहाय करण्यात आले आहे.

### (७) धारातीर्थी पडलेल्या शहीद जवानांच्या कुटुंबीयांना/अवलंबितांना आर्थिक मदत (२२३५ २६०८)

शासन निर्णय क्र. मासैम-२०१६/प्र.क्र.९२(१)/२०१६/२८, दिनांक ३०/११/२०१६ अन्वये दिनांक १ एप्रिल २०१६ पासून युद्धात, युद्धजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षासंबंधी मोहिमेत, चकमकीत/देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या अवलंबितांना सन २०१६-२०१७ साठी ८.०० लाख तसेच सन २०१७-२०१८ साठी ८.५ लाख अर्थसहाय्य देण्यात येत आहे. तसेच दिनांक १ एप्रिल २०१६ पासून २० टक्के ते ४९ टक्केपर्यंत अपंगत्व प्राप्त झालेल्या जवानांना सन २०१६-२०१७ साठी १ लाख २५ हजार तसेच सन २०१७-२०१८ साठी १ लाख ५० हजार आणि ५० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व प्राप्त झालेल्या जवानांना सन २०१६-२०१७ साठी रुपये ४ लाख व तसेच सन २०१७-२०१८ साठी ४ लाख ५० हजार एक रकमी अनुदान देण्यात येत आहे. वरील दोन्ही प्रकारच्या आर्थिक मदतीपैकी २० टक्के रक्कम शासकीय अनुदानातून प्रदान केली जाते. तसेच शासन निर्णय क्र २०१७ (प्र.क्र. ३१०)/२०१७/२८ दिनांक २७ मार्च २०१८ अन्वये दिनांक ०१ जानेवारी २०१८ पासून धारातीर्थी पडलेल्या जवानाच्या अवलंबितांना रु. २५ लाख आर्थिक मदत तसेच अपंगत्व प्राप्त जवानांच्या अपंगत्वाच्या टक्केवारीनुसार रुपये ५ लाख, रुपये ८.५ लाख, रुपये १५ लाख एकरकमी आर्थिक मदत देण्यात येते वरील दोन्ही प्रकारच्या मदतीपैकी २०% रक्कम शासकीय निधीतून प्रदान केली जाते. शा.नि. क्र. मासैम-२०१९/प्र.क्र. ६८/२०१९/२८, दिनांक २ ऑगस्ट २०१९ अन्वये दिनांक १ जानेवारी २०१९ पासून धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या अवलंबितांना रुपये १ कोटी आर्थिक मदत तसेच अपंगत्व प्राप्त जवानांच्या अपंगत्त्वाच्या टक्केवारीनुसार रुपये २० लाख, रुपये ३४ लाख, रुपये ६० लाख एकरकमी आर्थिक मदत देण्यात येते. वरील दोन्ही प्रकारच्या मदतीपैकी ५० टक्के रक्कम शासकीय निधीतून प्रदान केली जाते.

### (८) महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना (२०७५ ०११३)

### (अ) पारितोषिके

शासन निर्णय क्रमांक मासैम-२०१६/प्र.क्र. ९२(२)/२०१६/२८, दिनांक ३० नोव्हेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार परमवीरचक्र, अशोकचक्र, सर्वोत्तम युद्ध सेवापदक, महावीरचक्र, कीर्तीचक्र, उत्तम युद्ध सेवा पदक, वीरचक्र, शौर्यचक्र, युद्ध सेवा पदक व सेना/नौसेना/वायुसेना पदक इत्यादी १० शौर्य पदके आणि मेन्शन इन डिस्पॅच, परम विशिष्ट सेवा पदक, अति विशिष्ट सेवा पदक व विशिष्ट सेवा पदक इत्यादी ४ सेवा पदक शौर्य पदकधारकांना देण्यात येणाऱ्या रकमेत दिनांक १ ऑगस्ट २०१६ पासून महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेल्या सैन्य दलातील शौर्यपदक व सेवापदकधारकांना पुरस्कार म्हणून देण्यात येणाऱ्या एकरकमी रोख अनुदानात वाढ करण्यात येऊन ते पदकनिहाय रुपये ३७,००० ते रुपये २७,५०,००० इतके करण्यात आले आहे. तसेच सन २०१७-२०१८ साठी ४० हजार ते ३० लाख इतके अनुदान देण्यात येत आहे. वरील दोन्ही प्रकारच्या आर्थिक मदतीपैकी ७५ टक्के रक्कम शासकीय अनुदानातून प्रदान केली जाते. शा.नि.क्र. मगौपु २०१७/प्र.क्र. ३६०/२८, दिनांक ३१ जानेवारी २०१९ अन्वये दिनांक १ एप्रिल २०१८ पासून शौर्य/सेवा पदकधारकांना पुरस्कार म्हणून पदक निहाय रुपये ५०,००० ते ६०.०० लाख एकरकमी अनुदान प्रदान केले जाते. सदर अनुदानापैकी ५० टक्के रक्कम शासकीय निधीतून प्रदान केली जाते.

### (ब) निवृत्तिवेतन

शासन निर्णय क्रमांक मासैम-२०१६/प्र.क्र. ९२(२)/२०१६/२८, दिनांक ३० नोव्हेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मरणोत्तर शौर्यपदकधारकांवर अवलंबून असणाऱ्या विधवांना/अवलंबितांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात दिनांक १ ऑगस्ट २०१६ पासून सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षासाठी रुपये १२०० ते १५००० तसेच २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी रु. १३२० ते १६५०० दरमहा इतके निवृत्तीवेतन करण्यात आले आहे. १ एप्रिल २०१८ पासून शा. नि. क्र. मगौपु २०१७/प्र.क्र. ३६०/२८, दिनांक ३१ जानेवारी २०१९ अन्वये, मरणोत्तर शौर्यपदकधारकांवर अवलंबून असणाऱ्या विधवा/अवलंबितांना पदकानुसार रुपये २,५०० ते ३३,००० इतके मासिक अनुदान देण्यात येते. सदर अनुदानापैकी ५० टक्के रक्कम शासकीय निधीतून प्रदान केली जाते. सदर निवृत्तीवेतन योजनेसाठी निवृत्तीवेतन धारकांची संख्या १४५ इतकी आहे.

### (९) पॅराप्लेजिक रिहॅबीलीटेशन सेंटर, खडकी, पुणे या चॅरिटेबल संस्थेस सहाय्यक अनुदान : (२२३५ ३०५८)

पॅराप्लेजिक रिहॅबीलीटेशन सेंटर, खडकी, पुणे ही संस्था चॅरिटेबल पब्लिक ट्रस्ट असून १०० टक्के अपंगत्व प्राप्त झालेल्या माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी, वास्तव्यासह त्यांच्यावरील उपचारावर होणारा खर्च इ. सुविधा या संस्थेमार्फत पुरवल्या जातात. केंद्राकडून या संस्थेस आर्थिक मदत दिली जात असली तरी संबंधित राज्य/संघराज्यांनीदेखील या संस्थेत दाखल झालेल्या त्यांच्या राज्यातील पॅराप्लेजिक माजी सैनिकांचा खर्च उचलण्यासाठी सदर संस्थेस अनुदान देऊन आर्थिक मदतीत वाढ करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याकडूनही सदर संस्थेस शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००९/प्र.क्र. २५७/२८, दिनांक १५ फेब्रुवारी २०१२ अन्वये सन २०११-२०१२ पासून दरवर्षी रुपये १० लाख देण्यात येत

होते. तसेच सन २०२३-२४ पासून सदर अनुदानात वाढ होवून शासन निर्णय क्र.सैकवि-२०२१/प्र.क्र.३११/२८(मासैक) दिनांक २० मार्च २०२४ अन्वये अनुदानात वाढ करून ते रु. १९,५०,०००/- (रुपये एकोणवीस लाख पन्नास बजार फक्त) निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**(१०) सैन्यभरती मेळाव्यावरील खर्च : (२२३५ ३०९७) (२२३५ ३०९८)**

केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना सैन्यभरतीसाठी ठराविक कोटा ठरवून दिलेला आहे. त्याचप्रमाणे सैन्य भरती करण्यासाठी केंद्र शासनाच्या संरक्षण दलाकडून राज्यात ठिकठिकाणी सैन्यभरती मेळावे घेतले जातात. हे भरती मेळावे यशस्वी करण्यासाठी, नागरी प्रशासनाचे सहकार्य मिळावे म्हणून शासनाने शासन परिपत्रक क्र. एसओपी २०१२/७५/ (प्र. क्र. १८७/१२)/२८, दिनांक २५ जून २०१२ अन्वये सैन्यभरती मेळाव्याच्या ठिकाणी सैन्यभरती मेळाव्यांचे आयोजन सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. मेळावा-२०२१/प्र.क्र. १६०/२८ (अर्थ) दिनांक ३ ऑगस्ट २०२२ अन्वये पुरुषासाठी ५ मेळाव्याकरीता प्रत्येकी रु. ९,००,०००/ प्रमाणे एकूण रु. ४५,००,०००/- महिलासाठी एका सैन्य भरती मेळाव्यास रु. ३,००,०००/- वायुसेनेच्या ३ मेळाव्यांकरीता प्रत्येकी रु. ३,००,००/- प्रमाणे एकूण रु. ९,००,०००/- व नौसेनेच्या एका मेळाव्याकरिता रु. ३,००,०००/- असे एकूण रु. ६० लाख इतके वार्षिक अनुदान सन २०२५-२०२६ करिता मंजूर आहे.

**(११) मुलींची सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, नाशिक (२२३५ डी५४५)**

**१. प्रास्तविक :** केंद्र शासनाने पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये मुलींना प्रवेश देण्याचा निर्णय घेतल्यानुसार महाराष्ट्रीयन युवतींना जास्तीत जास्त संख्येने राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये जाता यावे या अनुषंगाने नाशिक येथे मुलींची सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था स्थापन करणेसाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीच्या शिफारशीवरून महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसपीआय-२०२१/प्र.क्र.२९०/२८, दिनांक १० जानेवारी २०२३ अन्वये नाशिक येथे मुलींच्या सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना केली. सध्या ही संस्था नाशिक येथील माजी सैनिकांच्या मुलांच्या वसतीगृहामध्ये काम करीत आहे. महाराष्ट्रीयन किंवा महाराष्ट्रातील रहिवासी अशा दहावी वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थींनी या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी अर्ज करू शकतात. अर्ज केल्यानंतर घेतल्या जाणाऱ्या लेखी व तोंडी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थीनींना त्यांच्या १०वी च्या परीक्षेत कमीत कमी ६० टक्के गुण मिळाल्यास गुणवत्ता यादीनुसार ते या संस्थेत दाखल होऊ शकतात. संस्थेत दाखल झालेल्या विद्यार्थीनींना स्थानिक शाळेत दाखला देण्यात येतो. संस्थेच्या दोन वर्षांच्या (११वी व १२वी) वास्तव्यात त्यांना मानसिक शारिरीक व बौद्धिक विकासाबाबत प्रशिक्षण दिले जाते. जेणेकरून संघ लोकसेवा आयोग (एनडीए) मध्ये प्रवेश देण्यासाठीची पात्रता प्राप्त करतात.

**२.** संस्थेत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थीनींना त्यांच्या भोजन व निवासासाठीच्या खर्चासाठी रु. ३०००/- द्यावे लागतात. शासन त्यांना दरमहा रु. २००० अशी भोजन खर्चासाठी प्रत्येक विद्यार्थीनी मागे देत. संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे व मार्गदर्शन करणेसाठी महाराष्ट्र शासनाने त्यांच्या निर्णय क्रमांक एसपीआय-२०२०/प्रक्र. ४४/का.२८, दिनांक ४ जून २०२१ द्वारे नियामक मंडळाची पुनर्रचना केली होती. परंतु महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. पत्र क्रमांक एसपीआय-२०२०/प्रक्र.३४/२८, दिनांक १८ ऑगस्ट २०२१ अन्वये सदरहू नियामक मंडळाची मुदत दिनांक ३० सप्टेंबर २०२१ रोजी संपुष्टात आली असून नवीन नियामक मंडळ स्थापनेबाबत ठरविण्यात येणाऱ्या निकषाबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे. संस्थेकरिता कार्यरत असलेल्या नियामक मंडळात खालीलप्रमाणे अध्यक्ष व सदस्य आहेत :

| | | |
|---|---|---|
| (१) | ले. जनरल राजेंद्र रामराव निंभोरकर (निवृत्त)पीव्हीएसएम, एव्हीएसएम, एसएम,व्हीएसएम. | : अध्यक्ष |
| (२) | विभागीय आयुक्त, संभाजी नगर, संभाजी नगर, छत्रपती संभाजी नगर. | : सहअध्यक्ष |
| (३) | एअर व्हाईस मार्शल नितिन वैद्य (निवृत्त) व्हीएसएम. | : सदस्य |
| (४) | रिअर ॲडमिरल आशिष कुलकर्णी (निवृत्त) व्हीएसएम. | : सदस्य |
| (५) | ब्रिगेडीअर हेमंत महाजन (निवृत्त) | : सदस्य |
| (६) | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. | : सदस्य |
| (७) | संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद. | : सदस्य व सचिव |

**३. आगाऊ अनामत रक्कमः** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसपीआय-२०२१/प्रक्र. २९०/२८, दिनांक १६ मे, २०२३ च्या निर्णयानुसार सर्व विद्यार्थीनींना संस्थेत प्रवेश घेताना आगाऊ अनामत रक्कम म्हणून रु. ३०००/- (रुपये फक्त तीन हजार) (मागासवर्गीय जाती जमातीच्या विद्यार्थीनींना रु. १५००/-) संस्थेत जमा करावे लागतात. भारतीय सैन्यदलात अधिकारी म्हणून कुठल्याही शाखेत प्रवेश मिळविण्यात यशस्वी झालेल्या विद्यार्थीनींना ही रक्कम परत केली जाते.

**४. संस्थेत प्रवेश मिळविण्यासाठी पात्रता** अविवाहित महिला जी महाराष्ट्रातील रहिवासी व जिचे वय संस्थेव्दारे दर्शविण्यात आलेल्या जन्मतारखेप्रमाणे असेल आणि जिने ७वी, ८वी, ९वी उत्तीर्ण केलेली असून १०वी च्या वार्षिक परीक्षेत ६० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळविले आहेत अशा विद्यार्थीनी संस्थेस प्रवेश घेण्यास पात्र आहेत.

**५. शारीरिक पात्रता :** संस्थेत प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थीनींची शारिरीक पात्रता संघलोक सेवा आयोगाने दिलेल्या निकषांनुसार होते. त्यातील काही ठळक मुद्दे :-

(अ) उंची १५२ सें. मी. (आ) वजन ४२.५ कि. ग्रॅम. (इ) दृष्टी निर्दोष व रंग आंधळेपणा नसावा.

**६. जाहिरात :** महाराष्ट्रातील सर्व अग्रगण्य वर्तमानपत्रात प्रवेश मिळविण्याबाबत जाहिरात प्रत्येक वर्षी माहे नोव्हेंबर मध्ये देण्यात येते व पात्र ठरलेल्या छांत्रासाठी लेखी परीक्षा हि महाराष्ट्र परीक्षा परीषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत घेण्यात येते व मौखिक परीक्षा ही संस्थेकडून माहे एप्रिल / मे मध्ये घेण्यात येते.

**७. दैनंदिन कार्यक्रमः** महाविद्यालयातील अनुभवी प्राध्यापकांच्या सेवा विद्यार्थीनींना संघ लोक सेवा आयोगाच्या (एनडीए) स्पर्धात्मक परिक्षेत विविध विषय शिकविण्यासाठी प्राप्त करून घेतल्या आहेत. हे वर्ग शाळेच्या वेळेनंतर घेतले जातात. व्यक्तीगत विकास करण्याबाबतचे वर्ग संस्थेचे संचालक स्वतः घेतात. पीटी, ड्रील, क्रॉसकंट्री व मैदानी सर्व खेळ संस्थेमध्ये शिकवले जातात. १२वी मध्ये असताना वर्षातून दोनदा सप्टेंबर व एप्रिल मध्ये यु.पी.एस.सी (एनडीए) च्या स्पर्धात्मक लेखी परीक्षेस विद्यार्थीनींना बसावे लागते. जे लेखी परीक्षेत उत्तीर्ण होतात त्यांच्यासाठी संरक्षण सेवेतील निवड मंडळामार्फत सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (SSB) तसेच इतर परीक्षांसाठीचे विशेष प्रशिक्षणामध्ये विद्यार्थीनींच्या मानसिक, शारिरीक व बौद्धिक विकासावर भर देण्यात येतो. यात सायकॉलॉजी, ग्रुप टेस्टिंग व इंटरव्यू टेक्नीक यांचा समावेश असतो. विद्यार्थीनींचा सर्व परीने विकास व्हावा व त्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी या दृष्टीने त्यांच्यासाठी नियमबद्ध व अत्यंत व्यग्र असा कार्यक्रम आखलेला असतो. यासाठी विद्यार्थीनींच्या इतर कार्यक्रमाचा हातभार असतो. उदा. करमणुकीचे कार्यक्रम वक्तृत्व स्पर्धा इत्यादी.

**८. वैद्यकीयः** संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनींच्या शारिरीक व वैद्यकीय तपासणीसाठी तज्ञ डॉक्टर (MD) यांना बोलावून संस्थेमध्ये तपासणी करण्यांत येते.

**९. आकडेवारी माहिती :** या संस्थेत किती अर्ज आले. किती स्वीकारण्यात आले व रद्द झाले. वैद्यकीय दृष्ट्या नाकारण्यात आले पात्र ठरले व शेवटी किती संस्थेत दाखल झाले याची मागील पाच वर्षाची आकडेवारी सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये देण्यात आली आहे.

**१०. संस्था स्थापन** झालेपासून म्हणजे २०२३ ते २०२५ पर्यंत संस्थेतून सैन्यदलात अधिकारी पदावर रुजू झालेल्या विद्यार्थीनीची आकडेवारी सोबतच्या प्रपत्र "ब" मध्ये देण्यात आली आहे.

**११. कर्मचारी संख्या :** सदर संस्थेकरिता एकूण ११ पदे मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये नियमित ५ व बाह्ययंत्रणेकडून घ्यावयाची ६ असे एकूण ११ पदे आहेत.

**१२. शिस्तपालन :** विद्यार्थीनींचा स्वाभिमान वृद्धी व शिस्तबद्ध विकास व्हावा व त्यांना त्याची सवय जडावी यासाठी त्यांच्यावर संस्कार केले जातात. तसेच योगाचे तास घेण्यात येतात.

**१३. संस्थेची यशोगाथाः** संस्थेच्या पहिल्या तुकडीतील २८ विद्यार्थीनी पैकी ०५ विद्यार्थीनी संघलोक सेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्या त्यापैकी ०२ विद्यार्थीनीची राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, पुणे (NDA) मध्ये निवड झाली होती. त्यापैकी १ विद्यार्थीनी वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरल्यामुळे बाद करण्यात आली. व ०१ विद्यार्थीनी सद्यास्थितीत राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये संघ लोक सेवा आयोगामार्फत राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीकरिता घेतल्या गेलेल्या लेखी परीक्षेसाठी संस्थेतील ०६ विद्यार्थीनी लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्या असून त्यांच्या सर्व्हस सिलेक्शन बोर्डाच्या मुलाखती बाकी आहेत.

# परिशिष्ट 'अ'

**प्रपत्र “अ”**

**सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छ. संभाजीनगर**

कार्यक्रम विवरण

सन २०१९ च्या सत्रापासून सन २०२३ च्या सत्रापर्यंत सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद संस्थामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी किती विद्यार्थ्यांची चाचणी परीक्षा घेतली व किती विद्यार्थ्यांची निवड झाली हे दर्शविणारा माहिती तक्ता

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | संस्थेतील तुकडी क्रमांक | आलेले अर्ज | आलेले अर्ज तपासून लेखी परीक्षेस पात्र | अपात्र ठरलेले अर्ज | संस्थेत निवड झालेले विद्यार्थी | वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरलेले विद्यार्थी | अंतिमतः प्रशिक्षणासाठी संस्थेत दाखल झालेले विद्यार्थी | प्रवेशप्रक्रियेवर झालेला एकूण खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | २०१९-२०२० | ४३ | ७७८० | ७०७४ | ३६ | ६६ | ०२ | ५६ | ९,१८,२१७ | ०८ विद्यार्थी घरगुती कारणास्तव सोडून गेले. ५६ विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. |
| २ | २०२०-२०२१ | ४४ | १३०८२ | १३०७८ | ०४ | ६४ | .. | ६४ | ९,२९,९७९ | विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. |
| ३ | २०२१-२०२२ | ४५ | ५७८१ | ५७८१ | .. | ६० | .. | ५५ | ८,८१,२३३ | ०५ विद्यार्थी घरगुती कारणास्तव सोडून गेले. प्रशिक्षण पुर्ण झालेले आहे. |
| ४ | २०२२-२०२३ | ४६ | ३६७९ | ३६७९ | .. | ५८ | ०६ | ४७ | १७,२३,६१८ | ०५ विद्यार्थी घरगुती कारणास्तव सोडून गेले प्रशिक्षण चालू आहे. |
| ५ | २०२३-२०२४ | ४७ | ५५०० | ५५०० | .. | ६० | .. | ५८ | २०,३१,१४४ | ०२ विद्यार्थी घरगुती कारणास्तव सोडून गेले प्रशिक्षण चालू आहे. |
| ६ | २०२३-२०२४ मुली | ०१ | ३९१७ | ३९१७ | .. | ३० | .. | ३० | ७,३५,५६३ | मुलींचे प्रशिक्षण चालू आहे. |
| ७ | २०२४-२०२५ | ४८ | ६८२२ | ६८२२ | .. | ६० | .. | ६० | १४,५६,२१२ | मुलांचे प्रशिक्षण चालू आहे. |
| ८ | २०२४-२०२५ मुली | ०२ | ३२२२ | ३२२२ | .. | ३० | .. | २४ | ३,८५,९२६/- | ०६ विद्यार्थीनी घरगुती कारणास्तव सोडून गेल्या |

**प्रपत्र "ब"**

**सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छ. संभाजीनगर**

तुकडी नुसार सैन्यदलात दाखल झालेले विद्यार्थी सन १९७७ ते २०२२

| अ.क्र. | तुकडी क्र. | वर्ष | संख्या | सोडून गेलेले | प्रवेशीत संख्या | एन.डी.ए. | आयएमए | ए एफ एम सी | दाखल झाले | | ओटीए | सीएमई | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | एएफए | नेव्हॅक | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | १ | | ४० | १५ | २५ | १ | १ | | | | १ | | ३ |
| २ | २ | | १४ | ५ | ९ | | १ | | | | | | १ |
| ३ | ३ | | १५ | ६ | ९ | १ | | | | | | | १ |
| ४ | ४ | | २३ | ८ | १५ | | २ | | | | | | २ |
| ५ | ५ | | २९ | १९ | १० | १ | | | | | | | १ |
| ६ | ६ | | ३१ | १६ | १५ | २ | | | | | | | २ |
| ७ | ७ | | १३ | ८ | ५ | १ | | | | | | | १ |
| ८ | ८ | | २५ | ९ | १६ | ६ | १ | | | | | | ७ |
| ९ | ९ | | २६ | ७ | १९ | ११ | | | | | | | ११ |
| १० | १० | | २३ | ७ | १६ | ११ | १ | | | | १ | | १३ |
| ११ | ११ | | १५ | ३ | १२ | ४ | १ | | २ | | | | ७ |
| १२ | १२ | | ३९ | ६ | ३३ | १२ | ३ | | १ | १ | १ | | १८ |
| १३ | १३ | | ३१ | १० | २१ | १० | १ | | | १ | | | १२ |
| १४ | १४ | | ३० | ६ | २४ | ९ | १ | | | ३ | १ | | १४ |
| १५ | १५ | | ३८ | ३ | ३५ | ९ | २ | | १ | १ | १ | | १४ |
| १६ | १६ | | ३६ | १ | ३५ | १८ | १ | | १ | २ | | | २२ |
| १७ | १७ | | ४० | १ | ३९ | १८ | २ | | | १ | १ | | २२ |
| १८ | १८ | | ३१ | २ | २९ | ८ | ४ | | | | | | १२ |
| १९ | १९ | | ३३ | ८ | २५ | ९ | १ | | | | १ | | ११ |
| २० | २० | | ३९ | ९ | ३० | १२ | ५ | | | २ | १ | | २० |
| २१ | २१ | | ३५ | ३ | ३२ | १२ | १ | | | ३ | २ | | १८ |
| २२ | २२ | | ३३ | ३ | ३० | ९ | ३ | | | | १ | | १३ |
| २३ | २३ | | ४० | १० | ३० | ८ | ६ | | | २ | | १ | १७ |

**प्रपत्र "ब"**

**सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद**

तुकडी नुसार सैन्यदलात दाखल झालेले विद्यार्थी सन १९७७ ते २०२२

| अ.क्र. | तुकडी क्र. | वर्ष | संख्या | सोडून गेलेले | प्रवेशीत संख्या | एन.डी.ए. | आयएमए | ए एफ एम सी | दाखल झाले | | ओटीए | सीएमई | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | एएफए | नेव्हॅक | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | १ | | ४० | १५ | २५ | १ | १ | | | | १ | | ३ |
| २ | २ | | १४ | ५ | ९ | | १ | | | | | | १ |
| ३ | ३ | | १५ | ६ | ९ | १ | | | | | | | १ |
| ४ | ४ | | २३ | ८ | १५ | | २ | | | | | | २ |
| ५ | ५ | | २९ | १९ | १० | १ | | | | | | | १ |
| ६ | ६ | | ३१ | १६ | १५ | २ | | | | | | | २ |
| ७ | ७ | | १३ | ८ | ५ | १ | | | | | | | १ |
| ८ | ८ | | २५ | ९ | १६ | ६ | १ | | | | | | ७ |
| ९ | ९ | | २६ | ७ | १९ | ११ | | | | | | | ११ |
| १० | १० | | २३ | ७ | १६ | ११ | १ | | | | १ | | १३ |
| ११ | ११ | | १५ | ३ | १२ | ४ | १ | | २ | | | | ७ |
| १२ | १२ | | ३९ | ६ | ३३ | १२ | ३ | | १ | १ | १ | | १८ |
| १३ | १३ | | ३१ | १० | २१ | १० | १ | | | १ | | | १२ |
| १४ | १४ | | ३० | ६ | २४ | ९ | १ | | | ३ | १ | | १४ |
| १५ | १५ | | ३८ | ३ | ३५ | ९ | २ | | १ | १ | १ | | १४ |
| १६ | १६ | | ३६ | १ | ३५ | १८ | १ | | १ | २ | | | २२ |
| १७ | १७ | | ४० | १ | ३९ | १८ | २ | | | १ | १ | | २२ |
| १८ | १८ | | ३१ | २ | २९ | ८ | ४ | | | | | | १२ |
| १९ | १९ | | ३३ | ८ | २५ | ९ | १ | | | | १ | | ११ |
| २० | २० | | ३९ | ९ | ३० | १२ | ५ | | | २ | १ | | २० |
| २१ | २१ | | ३५ | ३ | ३२ | १२ | १ | | | ३ | २ | | १८ |
| २२ | २२ | | ३३ | ३ | ३० | ९ | ३ | | | | १ | | १३ |
| २३ | २३ | | ४० | १० | ३० | ८ | ६ | | | २ | | १ | १७ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २४ | | ४० | ११ | २९ | १२ | ६ | | | | | | १८ |
| २५ | २५ | | ३६ | ३ | ३३ | ९ | २ | | | | २ | | १३ |
| २६ | २६ | | ४१ | ५ | ३६ | १७ | ५ | | २ | | १ | १ | २६ |
| २७ | २७ | | ४० | ८ | ३२ | १३ | ५ | | १ | | १ | | २० |
| २८ | २८ | | ३६ | १ | ३५ | १२ | ३ | | १ | | १ | | १७ |
| २९ | २९ | | ४३ | ६ | ३७ | ९ | ४ | | | | २ | | १५ |
| ३० | ३० | | ३९ | ७ | ३२ | १४ | | | | | | १ | १५ |
| ३१ | ३१ | | ४३ | ५ | ३८ | ९ | १ | | | ४ | | | १४ |
| ३२ | ३२ | | ४१ | | ४१ | ५ | ३ | | १ | २ | | | ११ |
| ३३ | ३३ | | ४८ | ५ | ४३ | ७ | १ | | | २ | | | १० |
| ३४ | ३४ | | ४३ | ३ | ४० | ८ | १ | | ० | १ | २ | | १२ |
| ३५ | ३५ | | ४७ | ४ | ४३ | ३ | २ | | १ | ५ | १ | | १२ |
| ३६ | ३६ | | ४८ | ५ | ४३ | ८ | २ | | १ | २ | ७ | | २० |
| ३७ | ३७ | | ४७ | ३ | ४४ | ९ | २ | | २ | २ | १ | | १६ |
| ३८ | ३८ | | ४९ | १ | ४८ | १२ | १ | | १ | १ | | | १५ |
| ३९ | ३९ | | ५४ | ४ | ५० | ७ | | | २ | ४ | | | १३ |
| ४० | ४० | | ६० | ८ | ५२ | १८ | १ | | | | २ | | २१ |
| ४१ | ४१ | | ६० | १ | ५९ | २४ | | | | | | | २४ |
| ४२ | ४२ | | ६० | २ | ५८ | १८ | | | | १ | | | १९ |
| ४३ | ४३ | | ६६ | १२ | ५६ | ६ | | | | १ | १ | | ८ |
| ४४ | ४४ | | ६० | ९ | ५१ | ६ | | | १ | १ | १ | | ९ |
| ४५ | ४५ | | ६० | ५ | ५५ | ४ | | | | १ | | | ५ |
| ४६ | ४६ | | ५८ | १२ | ४६ | | | | | | | | ० |
| ४७ | ४७ | | ६० | २ | ५८ | - | | | | | | | ० |
| **एकूण** | | | **१८५८** | **२८७** | **१५७३** | **४०२** | **७६** | **०** | **१८** | **४३** | **३३** | **३** | **५७५** |

## (९) वित्तीय आवश्यकता
## (ix) Financial Requirement

(९) वित्तीय आवश्यकता
(ix) Financial Requirement

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. (1) | (अ) कार्याचे वर्गीकरण (2) | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 (3) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 (4) | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 (5) | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 (6) | A—Activity Classification (1) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेवा पूर्वाध्ययन संस्था, औरंगाबाद .. | 23662 | 39674 | 36627 | 40258 | (1) Service Preparatory Institute, Aurangabad. |
| २ | छात्रपूर्व प्रशिक्षण योजना .. | 9799 | 14413 | 13107 | 12865 | (2) Pre-Cadet Training Scheme. |
| ३ | जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये .. | 246830 | 334652 | 279839 | 368368 | (3) Zilla Sainik Welfare Offices. |
| ४ | सैनिक कल्याण विभाग .. | 40382 | 58597 | 47242 | 53411 | (4) Department of Sainik Welfare. |
| ५ | क्वीन मेरी तंत्र शाळेस सहायक अनुदान .. | 2583 | 2639 | 2639 | 2888 | (5) G. I. A. To Queen Mary School. |
| ६ | महाराष्ट्रातील सशस्त्र दलातील सेवाप्रवेशासाठी सेवाप्रवेश पूर्व प्रशिक्षण केंद्रे. .. | 0 | 1380 | 966 | 1380 | (6) Pre-recruitment training centres in Maharashtra for Recruitment in Armed Forces. |
| ७ | महाराष्ट्रात अधिवासी असलेल्या दुसऱ्या जागतिक महायुद्धातील माजी सैनिक/त्यांच्या विधवा यांना निवृत्तिवेतन. .. | 184267 | 220208 | 220208 | 199056 | (7) Pension to Ex-Service Men/ Widows Ex-Service Men of 2nd World War who are domiciled in Maharashtra. |
| ८ | देशांतर्गत सुरक्षासंबंधी मोहिमेत-चकमकीत धारातिर्थी पडलेल्या सैन्यातील जवानांच्या विधवांना/अवलंबितांना आर्थिक मदत. .. | 58890 | 139000 | 97300 | 139000 | (8) Financial Assistance to Widows/ dependants of Jawans from Defence Forces who laid down their life while dealing with Insurancy and Extremist activity. |
| ९ | शौर्यासाठी पारितोषिके .. | 19356 | 36485 | 28145 | 37440 | (9) Awards for Gallantry. |
| १० | संरक्षण दलामधील सैन्य भरती प्रवेश प्रक्रियेवरील खर्च .. | 2995 | 6000 | 5100 | 6000 | (10) Process Expenses of Defence Force Recruitment. |
| ११ | अपंग पॅराल्पिजीक पुनर्वसन केंद्र, खडकी, पुणे यास सहायक अनुदान (वेतनेतर). .. | 1920 | 1950 | 1950 | 1950 | (11) Ex-Serviceman Paraplegic Rehabilition, Centre, Pune. |
| | **एकूण (अ)** | **590684** | **854998** | **733123** | **862616** | **Total– (A)** |
| | (ब) वित्त व्यवस्थेतील साधने | | | | | (B) Source of finance– |
| | मागणी क्र. प्रधानशीर्ष | | | | | Demand No. Major Head |
| | ए-४ २०७५ .. | 19356 | 36485 | 28145 | 37440 | A— 4 2075 |
| | ए-५ २२३५ .. | 571328 | 818513 | 704978 | 825176 | A— 5 2235 |
| | **एकूण (ब)** | **590684** | **854998** | **733123** | **862616** | **Total– (B)** |

**तक्ता १/ TABLE 1**

(१) छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक आस्थापनेवरील पदे व त्यांची वेतनश्रेणी

(1) PRE-CADET TRAINING CENTRE, NASIK

| अनुक्रमांक Sr. No. (1) | पदनाम (2) | वेतनश्रेणी Basic (3) | पदसंख्या No. of Posts 2024-25 (4) | 2025-2026 (5) | Designation (6) |
|---|---|---|---|---|---|
| **१ राजपत्रित** | | | | | **1. Gazetted** |
| | प्रभारी अधिकारी | : 67700-208700(S-23) : | 1 | 1 | Officer-in-charge |
| | | **एकूण :** | **1** | **1** | **Total** |
| **२ अराजपत्रित** | | | | | **2. Non-Gazetted** |
| | भांडारपाल लिपिक/सामग्री लिपिक : | 25500-81100(S-8) : | 1 | 1 | Store Clerk |
| | लेखा लिपिक : | 25500-81100(S-8) : | 1 | 1 | Accounts Clerk |
| | शारीरिक प्रशिक्षण निदेशक : | 25500-81100(S-8) : | 1 | 1 | P. T. Instructor |
| | कवायत शिक्षक : | 25500-81100(S-8) : | 1 | 1 | Drill Instructor |
| | | **एकूण :** | **4** | **4** | **Total** |
| **३ वर्ग-४** | | | | | **3. Class-4** |
| | शिपाई : | 15000-47600(S-1) : | 2 | 2 | Peon |
| | सफाईगार : | 15000-47600(S-1) : | 1 | 1 | Sweeper |
| | चौकीदार : | 15000-47600(S-1) : | 1 | 1 | Watchman |
| | | **एकूण :** | **4** | **4** | **Total** |
| | | **एकूण बेरीज :** | **9** | **9** | **Grand Total** |

**तक्ता २ / TABLE 2**

(२) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये आस्थापनेवरील पदे व त्यांची वेतनश्रेणी

(2) ZILLA SAINIK WELFARE OFFICES

| अनुक्रमांक Sr. No. (1) | पदनाम (2) | वेतनश्रेणी Basic (Rs.) (3) | पदसंख्या No. of Posts 2024-25 (4) | 2025-2026 (5) | Designation (Rs.) (6) |
|---|---|---|---|---|---|
| **१ राजपत्रित** | | | | | **1. Gazetted** |
| | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी : | 67700-208700(S-23) : | 30 | 30 | Zilla Sainik Welfare Officer |
| | | **एकूण :** | **30** | **30** | **: Total** |
| **२ अराजपत्रित** | | | | | **2. Non-Gazetted** |
| | सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी. : | 38600-122800(S 14) : | 19 | 19 | Assistant Zilla Sainik Welfare Officer |

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | | वेतनश्रेणी Basic (Rs.) | | पदसंख्या No. of Posts 2024-25 | 2025-2026 | Designation (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | | (3) | | (4) | (5) | (6) |
| | लिपिक-टंकलेखक मराठी/इंग्रजी टंकलेखक/ कनिष्ठ लिपिक/ टंकलेखक | : | 19900-63200(S-6) | : | 99 | 99 | Marathi/English Typist/ Junior Clerk/Typist |
| | वसतिगृह अधीक्षक | : | 25500-81100(S-8) | : | 35 | 35 | Hostel Superintendent |
| | वाहनचालक | : | 19900-63200(S-6) | : | 30 | 30 | Drivers |
| | | | **एकूण** | **:** | **266** | **266** | **Total** |
| **३** | **वर्ग-४** | | | | | | **3. Class-4** |
| | शिपाई | : | 15000-47600(S-1) | : | 42 | 42 | Peon |
| | चौकीदार | : | 15000-47600(S-1) | : | 20 | 20 | Watchman |
| | | | **एकूण** | **:** | **62** | **62** | **Total** |
| | | | **एकूण बेरीज** | **:** | **358** | **358** | **Grand Total** |

तक्ता ३ / TABLE 3

( ३ ) सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य-पुणे आस्थापनेवरील पदे व त्यांची वेतनश्रेणी

(III) DEPARTMENT OF SAINIK WELFARE, MAHARASHTRA STATE—PUNE

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | वेतनश्रेणी Basic (Rs.) | पदसंख्या No. of Posts 2024-25 | 2025-2026 | Designation |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| **१ राजपत्रित** | | | | | **1. Gazetted** |
| | संचालक | : 131100-216600 (S-29) : | 1 | 1 | Director |
| | उप संचालक | : 67700-208700 (S-23) : | 3 | 3 | Deputy Director |
| | लेखा अधिकारी | : 44900-142400 (S-16) : | 1 | 1 | Account Officer |
| | अधीक्षक | : 41800-132300 (S-15) : | 1 | 1 | Superintendent |
| | सहायक लेखाधिकारी | : 41800-132300 (S-15) : | 1 | 1 | Asst. Accounts Officer |
| | | **एकूण :** | **7** | **7** | **Total** |
| **२ अराजपत्रित** | | | | | **2. Non-Gazetted** |
| | लघुलेखक (उच्चश्रेणी) | : 41800-132300 (S-15) : | 1 | 1 | Stenographer (Higher grade) |
| | लघुलेखक (निम्नश्रेणी) | : 38600-122800 (S-14) : | 1 | 1 | Stenographer (Lower grade) |
| | सहायक अधीक्षक | : 35400-112400 (S-13) : | 2 | 2 | Assistant Superintendent |
| | वरिष्ठ लिपिक | : 25500-81100 (S-8) : | 8 | 8 | Senior Clerk |
| | वरिष्ठ लेखा लिपिक | : 25500-81100 (S-8) : | 1 | 1 | Senior Account Clerk |
| | कल्याण संघटक | : 25500-81100 (S-8) : | 1 | 1 | Welfare Organiser |
| | लिपिक-टंकलेखक | : : | | | Clerk-Typist |
| | मराठी/इंग्रजी टंकलेखक | : 19900-63200 (S-6) : | 10 | 10 | Marathi/English Typist |
| | कनिष्ठ लिपिक/लिपिक | : : | | | Junior Clerk |
| | टंकलेखक | : : | | | Typist |
| | वाहनचालक | : 19900-63,200(S-6) : | 2 | 2 | Driver |
| | | **एकूण** | **26** | **26** | **Total** |
| **३ वर्ग-४** | | | | | **3. Class-IV** |
| | नाईक | : 16600-52400 (S-3) : | 1 | 1 | Naik |
| | शिपाई | : 15000-47600 (S-1) : | 4 | 4 | Peon |
| | सफाईगार | : 15000-47600 (S-1) : | 1 | 1 | Sweeper |
| | चौकीदार | : 15000-47600 (S-1) : | 2 | 2 | Watchman |
| | | **एकूण** | **8** | **8** | **Total** |
| | | **एकूण बेरीज** | **41** | **41** | **Grand Total** |

**प्रपत्र क**

**सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छ. संभाजीनगर**
**अधिकारी तथा कर्मचारी यांची सुधारित वेतन संरचना**
(Revised Pay Structure)

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | | वेतनश्रेणी Basic | | पदसंख्या No. of Posts 2024-25 | 2025-2026 | Designation (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | | (3) | | (4) | (5) | (6) |
| **१ राजपत्रित** | | | | | | | **1. Gazetted** |
| | संचालक | : | S-25 : 78800-209200 | : | रिक्त | रिक्त | Director |
| | अधीक्षक-नि-लेखापाल | : | S-15 : 41800-132300 | : | 1 | 1 | Superintendent-*cum*-Accountant |
| | गृहरक्षक | : | S-15 : 41800 - 132300 | : | 1 | 1 | Warden |
| **२ अराजपत्रित, वर्ग ३** | | | | | | | **2 Non-Gazetted, Class III** |
| | लघुलेखक (उच्चश्रेणी) | : | S-15 : 41800 - 132300 | : | 1 | 1 | Stenographer (Higher grade) |
| | लेखा लिपिक | : | S-13 : 35400-112400 | : | 1 | 1 | Accounts Clerk |
| | वरिष्ठ लिपिक | : | S-8 : 25500-81100 | : | 1 | 1 | Senior Clerk |
| | लिपिक-नि-टंकलेखक | : | S-6-19900-63200 | : | रिक्त | रिक्त | Clerk-*cum*-Typist |
| | शारीरिक प्रशिक्षण निदेशक | : | S-8 : 25500-81100 | : | 1 | 1 | P. T. Instructor |
| | वाहनचालक | : | S-6-19900-63200 | : | 1 | 1 | Driver |
| **३ अराजपत्रित, वर्ग ४** | | | | | | | **3 Non-Gazetted, Class IV** |
| | शिपाई | : | S-1-15000-47600 | : | 2 | 1 | Peon |
| | पहारेकरी | : | S-1-15000-47600 | : | 1 | 1 | Watchman |
| | स्वयंपाकी | : | S-3-16600-52400 | : | 1 | 1 | Cook |
| | सफाईगार | : | S-1-15000-47600 | : | 2 | 1 | Sweeper |
| | सफाईगार-नि-पहारेकरी | : | S-1-15000-47600 | : | 1 | 1 | Watchman-*cum*-Sweeper |
| | माळी | : | S-1-15000-47600 | : | 1 | | Mali |
| | | | **एकूण** | : | 15 | 12 | **Total** |

**टीप.—** महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.शा.नि.क्र. सैकावि-२०१६/प्र.क्र.३२/का-२८, दिनांक २ फेब्रुवारी २०२१ अन्वये सुधारित आकृतिबंध विहित करण्यात आला असून २४ पदांपैकी २० पदे ही मंजूर करण्यात आली असून, त्यामध्ये ०८ पदे ही नियमित करण्यात आली आहेत व उर्वरित १२ पदे ही अधिसंख्य ठरविण्यात आली आहेत. अधिसंख्य ठरविण्यात आलेल्या १२ पदांवरील कार्यरत असलेले कर्मचारी जस-जसे सेवानिवृत्त/राजीनामा /मृत्यू या कारणामुळे रिक्त होतील तशी ती पदे व्यपगत होतील असे आदेशित करण्यात आले आहे.

## कार्यक्रम क्र. १०

## परिवहन व प्रशिक्षण

### (१) शासकीय परिवहन सेवा

नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांचे कार्यालय, वरळी मुंबई येथे असून त्यांची स्वतःची कार्यशाळा आहे. कार्यालय प्रमुख म्हणून नियंत्रक आहेत.

या विभागाच्या कार्यशाळेत प्रथम श्रेणी अधिकाऱ्यांची वाहने दुरुस्त केली जातात. शासकीय परिवहन सेवेमधील वाहनांच्या ताफ्यातून मा. राज्य अतिथी, मा. अतिमहत्त्वाच्या, महत्त्वाच्या व्यक्तींना वाहने पुरविली जातात. विख्यात अभ्यागत वाहन ताफ्यातील वाहने राज्याबाहेरून आलेल्या राज्य अतिथी/विदेशी पाहुण्यांसाठी तसेच इतर राज्यातील व केंद्रातील मंत्री महोदय व अधिकाऱ्यांसाठी वापरली जातात.

शासकीय परिवहन सेवा कार्यालयातील कामाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहेः-

(१) मा. राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, मा. पंतप्रधान, मंत्रिमहोदय व भेट देणारे राज्य अतिथी, परदेशी अतिमहत्त्वाच्या व्यक्ती इत्यादी मान्यवरांना मोटार वाहन पुरवठा करणे व तो अत्यंत कार्यक्षम ठेवणे.

(२) मान्यताप्राप्त गॅरेजमधून शासकीय वाहनांची दुरुस्ती केली असल्यास देयके प्रमाणित करणे.

शासकीय परिवहन सेवेच्या कार्यशाळेत शासकीय परिवहन सेवेच्या व इतर शासकीय विभागांच्या मोटार वाहनांच्या दुरुस्तीची व परिरक्षणाची कामे त्वरित करण्यात येतात.

सह सचिव/उप सचिव, राजशिष्टाचार, सा. प्र. वि. हे शासकीय परिवहन सेवेचे विभाग प्रमुख आहेत व नियंत्रक हे कार्यालय प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख आहेत.

**एकूण उत्पन्न :** शासकीय परिवहन सेवा कार्यालयाकडून वाहन दुरुस्तीची सेवा पुरविली जाते. यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती संबंधित विभागाकडून नाममात्र सेवा शुल्क आकारून केली जाते.

### (२) विमान चालन संचालनालय (३०५३)

विमान चालन संचालनालयाचे मुख्य काम शासकीय विमान/हेलिकॉप्टरची देखभाल आणि महत्त्वाच्या/अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे हवाई दौरे आयोजित करणे हे आहे. शासनाच्या मालकीचे एक विमान व एक हेलिकॉप्टर आहे. सदरची विमाने व हेलिकॉप्टर मा. राज्यपाल महोदय, मा. मुख्यमंत्री महोदय, मा. उप मुख्यमंत्री महोदय, अतिमहत्त्वाच्या व्यक्ती आणि इतर शासकीय अधिकारी यांच्या हवाई प्रवासासाठी राज्यातंर्गत तसेच राज्याबाहेर

आवश्यक तेव्हा वापरण्यात येतात.

### (३) नागपूर उड्डाण क्लब (३०५३ ००१२)

शासनाने, दिनांक २१ डिसेंबर २००६ च्या शासन निर्णयान्वये नागपूर उड्डाण क्लबचे पुनरुज्जीवन केले आहे. या उड्डाण क्लबची मार्च, २००७ मध्ये केंद्र शासनाच्या कंपनी अधिनियम, १९५६ नुसार नागपूर उड्डाण क्लब प्रायव्हेट कंपनी लि., म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. सदर उड्डाण क्लबसाठी ९ तांत्रिक अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी पद्धतीने मंजूर आहेत. पदे, पुनःप्रस्थापित केलेली ६ पदे आणि कार्यरत असलेली ४ पदे अशी एकूण १० पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. विमान उड्डाणाचे प्रशिक्षण देणारा महाराष्ट्र शासनाचा हा एकमेव उड्डाण क्लब आहे. विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात विमान उड्डाणाचे प्रशिक्षण मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### ४. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. (विमान-२)

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीची स्थापना शासन निर्णय दिनांक २६ ऑगस्ट, २००२ नुसार झाली आहे. विदर्भ विकासाच्या दृष्टीत महत्त्वाच्या अशा आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय कार्गा हब / प्रवासी विमानतळ प्रकल्पाच्या (मिहान प्रकल्प) आणि विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकास अंमलबजावणीचे काम सदर कंपनीमार्फत करण्यात येत आहे. मिहान प्रकल्पासाठी जमीन संपादन व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता रु. ३९९४.४१ कोटी मंजूर करण्याबाबत शासनाने सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ अन्वये मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे एकूण ३०१७.६७ हे. खाजगी जमिनीची आवश्यकता असून सदर जमीन संपादीत करण्यात आली आहे. या जमिनीचे विशेष आर्थिक क्षेत्र, संमिश्र वापर क्षेत्र व विमानतळ क्षेत्र असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सदर संपादीत जमीन विकसित अथवा अविकसीत स्वरुपात विविध कंपन्यांना वाटप करण्यात आलेली आहे व येत आहे.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांची अनुक्रमे ५१% आणि ४९% भागभांडवल असलेली संयुक्त कंपनी म्हणून "मिहान इंडिया लिमिटेड" (MIL) या कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. या कंपनीमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ चालविण्यात येते. या विमानतळावर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्व सोयीसुविधा पुरविण्यासाठी तसेच या विमानतळाच्या उन्नतीकरण, आधुनिकीकरण, चालविणे आणि देखभाल करणे ही कामे सार्वजनिक खाजगी भागीदारीतून (PPP), संकल्पना करणे, बांधणे, वित्त सहाय्य पुरविणे, चालविणे आणि हस्तांतरण करणे (Design, Build, Finance, Operate and Transfer) DBFOT तत्त्वावर करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे. निविदा प्रक्रियेअंतर्गत ही निवड करण्यात आलेल्या यशस्वी निविदाकारामार्फत नागपूर विमानतळाचे आधुनिकीकरण व उन्नतीकरण करण्यात येईल.

मंजूर निविदेनुसार खाजगी विकासक जी.एम.आर. एअरपोर्ट लि. यांचेसांवत मिहान इंडिया लि. यांनी दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी सवलत करारनामा (Concession Agreement) केला आहे. म.वि.वि. कं. मर्या. कडून मिहान इंडिया लि. यांना एकूण ७८६.५६ हे आर जमीन दि. १६/४/२०२५ रोजी भाडेपट्टा करारनाम्याद्वारे हस्तांतरित करण्यात आली आहे. पुढील कार्यवाही सुरू, आहे.

फलटण, कराड, सोलापूर (होटगी), अमरावती (बेलोरा), चंद्रपुर व धुळे येथील विमानतळ महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे (म.वि.वि.कं) परिरक्षण व विकासासाठी हस्तांतरित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचेमार्फत शिर्डी, जि. अहिल्यानगर येथे नवीन विमानतळाचा विकास करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून, त्यानुसार विमानतळ उभारण्याचे पहिल्या टण्याचे काम म.वि.वि. कंपनीनं पूर्ण केले आहे. दि. १ ऑक्टोबर, २०१७ रोजी या विमानतळाचे मा. राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते उद्घाटन झाले आहे,

येथून हैदराबाद, चेन्नई, नवी दिल्ली, इंदौर, बेंगलोर व विजयवाडा येथे विमानसेवा सुरू आहे. नविन एकात्मिक टर्मिनल इमारतीच्या बांधकामाकरिता दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामास सुरुवात झाली आहे. या इमारतीचे भूमिपूजन मा. पंतप्रधान महोदयांच्या हस्ते दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झाले आहे.

पुणे येथे विकसित करावयाच्या नवीन ग्रीनफिल्ड विमानतळाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळानं (म.ओ.वि.मं) भूसंपादनाची कार्यवाही करावयाची आहे, दि. २९.०८.२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या वॉर रुम बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत साईट १ अ जवळ एक लॉजिस्टिक पार्क उभारण्यात येणे प्रस्तावित असून त्यामध्येच नवीन विमानतळ प्रकल्पाचाही समावेश असेल व या सर्व प्रकल्पांकरिता खाजगी सार्वजनिक सहभाग तत्त्वावर करण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार म.वि. वि.कंपनीने विमानतळासंबंधी सर्व माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दिनांक २१ सप्टेंबर २०२२ रोजी हस्तांतरित केली आहे.

बेलोरा, जि. अमरावती येथील विमानतळ विस्तारीकरण करून कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव म.वि.वि. कंपनीने शासनास सादर केला होता. त्या प्रस्तावास मान्यता मिळाली असून धावपट्टीची लांबी वाढविणे व त्यास अनुसरुन इतर कामे पूर्ण झाली असून नवीन टर्मिनल इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून एटीसी मनोरा उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या विमानतळाकरिता नागर विमानन महानिदेशालयाचा प्रवासी वाहतूक परवाना मिळण्याकरिता दिनांक १५ सप्टेंबर २०२४ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १०.३.२०२५ रोजी बेलोरा विमानतळ उडाणाकरिता परवाना प्राप्त झालेला आहे. या विमानतळाचा उडान योजनेमध्ये समावेश असून दिनांक. १६.४.२०२५ रोजी अलायन्स एअरने मुंबई-अमरावती-मुंबई अशी आठवड्यातून ४ वेळा प्रवासी विमानेसन सुरू केली आहे. अमरावती विमानतळावर वैमानिक प्रशिक्षण देण्याकरिता में. एअर इंडिया यांची ई-निविदेद्वारे निवड करण्यात आली असून याबाबतचा करारनामा जून, २०२४ मध्ये करण्यात आला आहे.

धुळे व कराड या विमानतळांवर ई-निविदा प्रक्रियेद्वारे निवडण्यात आलेल्या वैमानिक प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षण केंद्र सुरू आहे. तर चंद्रपूर मोरवा येथे नागपूर फ्लाईंग क्लब या शासकीय संस्थेस दुसरा प्रशिक्षण तळ उभारण्याकरिता म.वि.वि. कंपनीच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने रु. १/- प्रतिवर्ष या दराने ५ वर्षाकरिता जमीन प्रदान करण्यात आली आहे.

केंद्र शासनाची Regional Connectivity Scheme (RCS) आरसीएस योजना राबविण्यासाठी ज्याप्रमाणे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण केंद्र शासनासाठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहते, त्याच धर्तीवर राज्यात. आरसीएस योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस नोडल एजन्सी म्हणून नेमण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील Regional Connectivity Scheme (RCS) मध्ये (१) अमरावती, (२) गोंदिया, (३) नाशिक, (४) जळगाव, (५) नांदेड, (६) सोलापूर (७) कोल्हापूर (८) रत्नागिरी आणि (९) सिंधुदुर्ग या ९ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. यापैकी या योजनेअंतर्गत नांदेड, नाशिक, जळगांव, कोल्हापूर. सिंधुदुर्ग व गोंदिया ही ६ विमानतळे कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. सोलापूर विमानतळाचे उद्घाटन मा. पंतप्रधान महोदयांच्या हस्ते दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. सोलापूर विमानतळ उडान योजनेअंतर्गत कार्यान्वित झाले असून सध्या सोलापूर-मुंबई-सोलापूर हा हवाई मारग राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या १००% VGF RCS उडान योजनेअंतर्गत दि. १५/१०/२०२५ पासून सुरु आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील RCS योजनेअंतर्गत कार्यान्वित असलेल्या नांदेड, कोल्हापूर, जळगांव, नाशिक व सिंधुदुर्ग या विमानतळांवरुन सुमारे ४५,००० पेक्षा जास्त RCS उडाणे झाली आहेत आणि सुमारे १८ लाखापेक्षा जास्त प्रवाशांनी RCS विमानतळावरून प्रवास केला आहे.

## (१०) वित्तीय आवश्यकता
## (x) Financial Requirement

**(१०) वित्तीय आवश्यकता**

## (x) Financial Requirement

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | A— Activity Classification |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (1) |
| १ | शासकीय परिवहन सेवा | 63874 | 120994 | 91263 | 121863 | (1) Government Transport Service |
| २ | विमान चालन सल्लागार महाराष्ट्र शासन | 1037146 | 860207 | 2279535 | 2310962 | (2) Aviation Advisor to Government |
| ३ | नागरी विमानचालन | 6316333 | 8380387 | 8380387 | 16000000 | (3) Civil Aviation |
| | **एकूण-अ . .** | **7417353** | **9361588** | **10751185** | **18432825** | **. . Total–'A'** |

| (ब) वित्त व्यवस्थेतील साधने | | | | | | (B) Source of finance– |
|---|---|---|---|---|---|---|
| मागणी क्र. | प्रधानशीर्ष | | | | | Demand No. Major Head |
| ए-४ | २०७० | 1101020 | 981201 | 2370798 | 2432825 | A— 4 2070 |
| ए-७ | ३०५३ | 6316333 | 8380387 | 8380387 | 16000000 | A— 7 3053 |
| | एकूण-ब . . | **7417353** | **9361588** | **10751185** | **18432825** | **. . Total–'B'** |

## (२) विमान चालन संचालनालय, मुंबई (विमान-१)

(2) Directorate of Civil Aviation

### तक्ता २/Table II

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | वेतनस्तर/ Level of Pay | पदांची संख्या / No. of Post | | Designation |
|---|---|---|---|---|---|
| | | | 2024-2025 | 2025-2026 | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| १ | **राजपत्रित वर्ग १** | | | | *1. Gazetted Class I—* |
| | संचालक | S-25 78800-209200 | 1 | 1 | Director of Aviation |
| | मुख्य वैमानिक (विमान) | Salary Rs. 3,00,000 (10% Inc. per year) | 1 | 1 | Chief Pilot (Aeroplane) |
| | मुख्य वैमानिक (हेलि.) | Per Month 3,00,000 &(10% Incr. Per Year) | 1 | 1 | Chief Pilot (Helicopter) |
| | वैमानिक | (A) Per Month 2,50,000 &(10% Incr. Per Year) | 5 | 5 | Pilot |
| | उप संचालक | S-16 44900-142400 | 1 | 1 | Deputy Director of Aviation |
| | | **एकूण** | **9** | **9** | **Total** |
| ३ | **अराजपत्रित वर्ग ३** | | | | *3. Non-Gazetted, Class III—* |
| | वरिष्ठ लघुलेखक | S-14 38600-112800 | 1 | 1 | Senior Stenographer |
| | वरिष्ठ लेखापाल | S-13 35400-112400 | 1 | 1 | Senior Accountant |
| | वरिष्ठ भांडारपाल | S-13 35400-112400 | 1 | 1 | Senior Store Keeper |
| | प्रमुख लिपिक | S-13 35400-112400 | 1 | 1 | Head Clerk |
| | लेखापाल | S-8 25500-81100 | 1 | 1 | Accountant |
| | लिपिक-टंकलेखक | S-7 21700-69100 | 1 | 1 | Clerk Typist |
| | पोलीस वाहनचालक | S-7 21700-69100 | 4 | 4 | Police Constable Driver |
| | | **एकूण** | **10** | **10** | **Total** |
| ४ | **अराजपत्रित वर्ग ४** | | | | 4. Non-Gazetted, Class IV— |
| | नाईक | S-3 16600-52400 | 1 | 1 | Naik |
| | स्वच्छक | S-3 16600-52400 | 2 | 2 | Cleaner |
| | शिपाई | S-1 15000-47600 | 2 | 2 | Peon |
| | सफाईगार | S-1 15000-47600 | 1 | 1 | Sweeper |
| | | **एकूण** | **6** | **6** | **Total** |
| | | **एकूण बेरीज** | **25** | **25** | **Grand Total** |

## (३) नागपूर उड्डाण क्लब, नागपूर (विमान-१)

(3) Nagpur Flying Club, Nagpur

**तक्ता** 2 / Table II

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | वेतनस्तर/ Scale of Pay | पदांची संख्या / No. of Post | | Designation |
|---|---|---|---|---|---|
| | | | 2024-2025 | 2025-2026 | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| १ | **राजपत्रित वर्ग १–** | | | | ***1. Gazetted Class I—*** |
| | सहायक उड्डाण निर्देशक | .. 10,000-325-15,200 .. | 1 | 1 | Assistant Pilot Instructor |
| | | **एकूण ..** | **1** | **1** | **.. Total** |
| २ | **अराजपत्रित वर्ग ३–** | | | | ***2. Non-Gazetted, Class III—*** |
| | भांडारपाल | .. S-8 : 25,500-81,100 .. | 1 | 1 | Store Keeper |
| | कनिष्ठ यांत्रिक | .. S-6 : 19,900-63,200 .. | 1 | 1 | Junior Mechanic |
| | लेखा लिपिक | .. S-6 : 19,900-63,200 .. | 1 | 1 | Accounts Clerk |
| | लिपिक | .. S-6 : 19,900-63,200 .. | 1 | 1 | Clerk |
| | टंकलेखक | .. S-6 : 19,900-63,200 .. | 1 | 1 | Typist |
| | | **एकूण ..** | **5** | **5** | .. Total |
| ३ | **अराजपत्रित वर्ग ४–** | | | | ***3. Non-Gazetted, Class IV—*** |
| | शिपाई | .. S-1 : 15,000-47,600 .. | 1 | 1 | Peon |
| | चौकीदार | .. S-1 : 15,000-47,600 .. | 1 | 1 | Choukidar |
| | स्वच्छक | .. S-1 : 15,000-47,600 .. | 2 | 2 | Cleaner |
| | | **एकूण ..** | **4** | **4** | **.. Total** |
| | | **एकूण बेरीज ..** | **10** | **10** | **.. Grand Total** |

## (३) नागपूर उड्डाण क्लब, नागपूर (विमान-१)

**सन २०२५-२०२६**

**कंत्राटी पद्धतीवर मंजूर करण्यात आलेली पदे –**

| अ. क्र. | पदाचे नाव | संख्या | वेतनमान | |
|---|---|---|---|---|
| | | | दरमहा प्रत्येक पदाचे वेतन रु. | वार्षिक वेतन रु. |
| १ | मुख्य उड्डाण निदेशक | १ | ५,००,००० | ६०,००,००० |
| २ | सहायक निदेशक | २ | १,००,००० | २४,००,००० |
| ३ | मुख्य अभियंता | १ | ७५,००० | ९,००,००० |
| ४ | सहायक अभियंता | १ | ५०,००० | ६,००,००० |
| ५ | टेक्निशियन/फोरमन | ३ | २०,००० | ७,२०,००० |
| ६ | रेडिओ इंजिनियर | १ | २०,००० | २,४०,००० |
| | **एकूण ..** | **९** | **७,६५,०००** | **१,०८,६०,०००** |

## सामान्य प्रशासन विभाग

## माहिती तंत्रज्ञान संचालनालय

## सामान्य प्रशासन विभाग

## माहिती तंत्रज्ञान संचालनालय

**(१) माहिती तंत्रज्ञान संचालनालय :**

**१. मंत्रालयीन विभागांचे संगणकीकरण :** शासकीय कामकाजात संगणकाचा तसेच ई-प्रशासनाचा वापर करून कामकाजात पारदर्शकता आणणे आणि नागरिकांना जलद गतीने विनासायास सेवा देण्याच्या दृष्टिकोनातून सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची स्थापना दिनांक १ मार्च १९९८ पासून करण्यात आलेली आहे. शासकीय विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांचे संगणकीकरण करण्यासाठी व ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींच्या अर्धा टक्का निधी ई-गव्हर्नन्ससाठी वापरण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : मातंसं/नस्ती २०१०/प्र.क्र. ३४/३९, दिनांक १८ जून २०१० निर्गमित करण्यात आला आहे.

आतापर्यंत ई-पंचायत, ई-एफआयआर, ई-स्कॉलरशिप, बजेट वितरण प्रणाली, ई-टेंडरिंग, बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली, विक्रीकर आयुक्तालय कार्यालयाची ई-विवरणपत्र, ई-भरणा, राज्य उत्पादन शुल्क विभागाची राज्य उत्पादन शुल्क प्रणाली (MSEMS) शुल्क अनुज्ञप्ती मागोवा प्रणाली (MSELTS), शुल्क प्राण व्यवस्थापन प्रणाली (MSEBMS), ई-फेरफार आणि ई-सातबारा, आरटीआय ऑनलाईन, ऑनलाईन मुख्यमंत्री मदतनिधी, ऑनलाईन बिंदू नामावली, आपले सरकार पोर्टल सीसीटीएनएस, सीसीटीव्ही इत्यादी सारखे प्रकल्प कार्यरत आहेत.

मंत्रालयीन विभागाचे संगणकीकरणाव्यतिरिक्त महत्त्वाचे प्रकल्प खालीलप्रमाणे आहेतः

**२. ई-ऑफिस.–** शासकीय कामकाजाकरिता ई-ऑफिस राबविण्याचा निर्णय दिनांक ६ ऑगस्ट २०१२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. याकरिता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. ई-ऑफिस प्रणालीचे सॉफ्टवेअर तयार करणे, अधिकारी/कर्मचारी यांचे ई-मेल आयडी तयार करणे, त्यांना प्रशिक्षण देणे इ. कामे राष्ट्रीय माहिती सूचना केंद्राकडे सोपविण्यात आलेली आहे. यासाठी मंत्रालयात सातवा मजला (विस्तार) येथे राष्ट्रीय माहिती सूचना केंद्राचा कक्ष कार्यरत आहे. मंत्रालय, मुंबई, मुंबई जिल्हाधिकारी कार्यालय तसेच औरंगाबाद, रत्नागिरी, चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय कोकण व औरंगाबाद व कोल्हापूर महानगरपालिका, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यालय व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान कार्यालय, सायबर विभाग, मुंबई, राज्य माहिती आयोग, मुंबई आणि वन विभाग, नागपूर महारेरा जलसंपदा विभाग, पुणे, वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय, व्हीजेएनटी व मंत्रालय येथे ई-ऑफिसची अंमलबजावणी सुरू आहे. दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी १३५६४७१ ई-नस्ती ई-फाईल प्रणालीमधून तयार झालेल्या आहेत. मंत्रालयातील १८४८९ व ३९९७६ फिल्ड ऑफिस मधील अधिकारी/कर्मचारी ई-ऑफिस प्रणालीचा वापर करीत आहेत. या प्रकल्पास देश तसेच राज्य पातळीवर पाच पुरस्कार मिळाले आहेत. ई-ऑफिस प्रणालीचा वापर करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सहायक कर्मचारीवृंद व मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मंत्रालयामध्ये टपाल प्राप्त करून विभागांना ई ऑफिसमध्ये पाठविण्याकरिता केंद्रिय टपाल कक्ष स्थापित करण्यात आला आहे.

Work from Home चा अवलंब व कमीत कमी कागदपत्राची हाताळणी करण्याची निकड आहे. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने mahaeoffice.maharashtra.gov.in ही web based प्रणाली क्षेत्रिय कार्यालयासाठी व mahaeoffice१.maharashtra.gov.in ही प्रणाली मंत्रालयीन विभागांसाठी विकसित केली आहे. सदर प्रणाली कार्यरत ३२ मंत्रालयीन विभाग व ३३५ क्षेत्रीय कार्यालयांनी या प्रणालीचा वापर सुरू केला आहे.

[आपले सरकार सेवा केंद्र]

**३. नागरिकांना ई-सेवा पुरविणे.–** केंद्र शासनाच्या सुधारीत CSC (नागरी सुविधा केंद्र) २.० योजनेंतर्गत राज्यातील महा ई सेवा, सेतू व संग्राम या प्रचलित नागरी सुविधा केंद्रांचे नामांतर "आपले सरकार सेवा केंद्र" असे करण्यात आले आहे. राज्य शासनाद्वारे प्रदान करण्यात येत असलेल्या विविध सुविधा नागरिकांना त्यांच्या राहत्या घरानजिक प्राप्त व्हाव्या या हेतूने राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी २०१३ पासून सुमारे ४७६३८ आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन केली आहे.

पंतप्रधान मंत्री डिजीटल साक्षरता अभियांनातर्गत सुमारे १०,००० पेक्षा जास्त नागरी सुविधा केंद्राद्वारे सुमारे ४५ लाख नागरिकांना डिजीटल साक्षरतेचे प्रशिक्षण द्यावयाचे असून सध्या सुमारे २ लाख नागरिकांना डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पथदर्शी प्रकल्प म्हणून नाबार्डच्या मदतीने यवतमाळ जिल्ह्यातील ५००० नागरिकांना वित्तीय साक्षरतेचे शिक्षण प्रदान करण्यात येत असून, ६००० केंद्राद्वारे बँकींग सुविधा देण्यात येत आहे. जनऔषधी केंद्रांद्वारे नागरिकांना जेनेरीक औषधे उपलब्ध करून देण्यासह थायरोकेअर कंपनीच्या सहकार्याने महत्त्वाच्या आरोग्य तपासण्या नागरी सुविधा केंद्राद्वारे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या आयआरडीए संस्थेने मान्यता प्रदान केलेल्या नागरी सुविधा केंद्रांद्वारे विमा सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पंतप्रधान पीक विमा योजना लवकरच नागरी सुविधा केंद्राद्वारे कार्यान्वित करण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये "आपले सरकार सेवा केंद्र" या नावाने नागरी सुविधा केंद्र सुरू करण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे.

**४. स्टेट डेटा सेंटर आणि गव्हर्नमेंट क्लाउडची स्थापना.–** स्टेट डेटा सेंटर केंद्र हे राज्य शासनाच्या विविध विभागांचे सहभागी पायाभूत सुविधा केंद्र म्हणून कार्य करील. राज्य शासनाने नवीन प्रशासकीय भवन येथे टीयर ॥ स्टेट डेटा सेंटर स्थापन केलेले आहे. हे १४५० वर्गफूट क्षेत्रात पसरले असून त्याची क्षमता ३९ रॅक्स आणि साठवण क्षमता १७०० Terra Byte एवढी आहे. महाराष्ट्र हे देशातील ॲप्नीक च्या (APNIC) सदस्य असलेले आणि स्वतःचा IP V४ आणि IP V६ पत्ता असलेले आणि स्वतःचे शासकीय क्लाऊड असलेले देशातले पहिले राज्य आहे. यामुळे प्रकल्पाची किंमत आणि वेळ यामध्ये लक्षणीय घट झालेली आहे. राज्याच्या स्टेट डेटा सेंटर मधून जवळपास १५०० आज्ञावल्या कार्यरत आहेत. शासन परिपत्रक क्र. मातंसं-०६०/३/२०१७, दिनांक २९ जानेवारी २०१८ अन्वये शासनाचे क्लाऊड बाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. सध्या स्टेट डेटा सेंटरचे अद्ययावतीकरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**५. आधार नोंदणी.–** माहिती तंत्रज्ञानाचा वापर ई गव्हर्नन्ससाठी करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. रहिवाशांना देण्यात येणाऱ्या सेवांसाठी आधारक्रमांकाचा वापर करून घेण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. सन २०२४ च्या अंदाजित लोकसंख्येनुसार राज्यातील १२.८० कोटी रहिवाशांची आधार नोंदणी पूर्ण झाली आहे.

**१. आधार डेटा व्हॉल्टची अंमलबजावणी–**

माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने ADV (आधार डेटा व्हॉल्ट) सोल्युशन लागू करण्यासाठी CDAC (Centre for Development of Advanced Computing) (प्रगत संगणक विकास केंद्र) ची नियुक्ती केली आहे व AUA (Authentication User Agency) (प्रमाणिकरण वापरकर्ता एजन्सी) आणि Sub-AUA च्या (उप-प्रमाणिकरण वापरकर्ता एजन्सी) चे एकत्रीकरण यशस्वीरित्या केले आहे. तसेच आणखी विविध विभाग Sub-AVA करिता आपल्या संगणक प्रणालीचा वापर करण्यासाठी येत आहे.

**२. बेकायदेशीर आधार काढून टाकणे–**

गृह मंत्रालयाने बेकायदेशीर आधार कार्ड नोंदणीकृत असल्याचा संशय असलेली मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि पालघरमधील काही ठिकाणे शोधली आहेत. त्या बाबींच्या पडताळणीसाठी घरोघरी सर्वेक्षण केले जात आहे आणि साप्ताहिक सर्वेक्षण अहवाल UIDAI ला कळविण्यात येत आहे. तसेच आणखी विभाग sub-AVA करीता आपल्या संगणक प्रणालीचा वापर येत आहेत.

**६. सिक्युरीटी ऑपरेशन सेंटर (SOC) (Updated Information)**

१३/१२/२०१४ पासून सुरक्षा ऑपरेशन सेंटर (SOC) ची जबाबदारी मेसर्स TecMee यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. २४ x ७ सायबर सुरक्षा देखरेख आणि प्रतिसादासाठी संबंधित फर्मने नवीन SOC हार्डवेअर तसेच आवश्यक सॉफ्टवेअर टूल्सची स्थापना पूर्ण केली आहे.

**७. ई-निविदा.–** शासनाच्या कार्यालयातील खरेदीच्या प्रक्रियेत पारदर्शीपणा आणणे तसेच ती कार्यक्षम करण्याकरिता ई-निविदा पद्धतीचा वापर सर्व विभागांसाठी अनिवार्य करण्यात आलेला आहे. रु. ३ लक्ष पेक्षा जास्त रकमेच्या खरेदीकरिता ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे सक्तीचे करण्यात आलेले आहे. ५० पेक्षा जास्त विभागात ई-निविदा प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

**८. आपले सरकार २.०-** तक्रार निवारण प्रणाली.–नागरिक आणि प्रशासन यांना ऑनलाईन संवाद साधण्यासाठी सेतू निर्माण करणारा "आपले सरकार २.०" हा शासनाचा महत्वपूर्ण प्रकल्प आहे. सदर प्रणालीची कार्यपद्धती दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये अद्ययावत करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये नागरिकांच्या तक्रारीच्या नोंदणीपासून ते तक्रारीच्या निराकरणापर्यंतच्या प्रक्रियेकरीता विविध सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. नवीन २.० प्रणालीवर एकूण ५,३०,७०४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ३,७७,५९३ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.

**९. वापर सुलभता व स्थानिकीकरण (अॅक्सेसीबीलीटी व लोकलायझेशन).–** ई-प्रशासनाचा फायदा राज्यातील प्रत्येक नागरिकाला देण्यासाठी महाराष्ट्र शासन कटीबद्ध आहे. त्याअनुषंगाने सर्व वेबसाईटचे मुख्य पृष्ठ (होमपेज) हे मराठीमध्येच उघडणे आवश्यक करण्यात आले आहे आणि वेबसाईटवरील सर्व मजकूर मराठीमध्ये उपलब्ध करण्यात येत आहे, संकेतस्थळी WCAG 2.0 व GIGW निदेशांचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जेणेकरून सर्वसामान्य नागरिक याचा उपयोग करू शकतील.

**१०. Software Defined Wide Area Network (SDWAN).–** राज्यात e-office व इतर आज्ञावल्या सुरक्षित नेटवर्क मार्फत हाताळण्याकरीता SDWAN या नेटवर्क प्रकल्प कार्यान्वित होत आहे. या प्रकल्पामुळे e-office सारख्या आज्ञावल्या राज्यातील ६००० पेक्षा जास्त कार्यालयातून सुरक्षितपणे चालविल्या जातील. पुढील ६ महिन्यात प्रकल्प प्रत्यक्षात सुरु होईल.

**११. कृत्रिम बुद्धीमत्ता (AI).–** राज्यातील शासनाचे व जनतेचे काम सुलभरित्या, कमी वेळेत, योग्य निर्णयासह करण्याकरीता कृत्रिम बुद्धीमत्ता आधारीत प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्याचे ठरविले आहे. पुढील सहा महिन्यात अद्यावत कर्मचारी प्रतिबद्धता व अभिप्राय संकलन, अद्यावत व्यवसाय बुद्धीमत्ता, अद्यावत सीएम हेल्पलाईन व नागरीकांच्या तक्रारी, ई-पोर्टल अंमलबजावणी सारखे प्रकल्प राबविण्यात येणार आहे. प्रायोगिक तत्वावर राबविल्यानंतर राज्यभर कृत्रिम बुद्धीमत्ता आधारीत वेगवेगळे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

**१२. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची स्थापना.–** सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंसं-१७१६, प्र.क्र. २८६/३९, दिनांक ९ ऑगस्ट २०१६ अन्वये राज्यामध्ये माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांच्या अंमलबजावणीत गती व गुणवत्ता आणण्यासाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

**१३. महानेट प्रोजेक्ट.–**

**(१) ग्रामीण महानेट.–** राज्यातील सर्व ग्रामपंचायती उच्च क्षमतेच्या फायबर नेटवर्कने जोडण्यात येत आहेत. प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये विभागाला आहे. पहिला टप्पोंद्र शासनाच्या संस्थेमार्फत राबविण्यात आला आहे. ज्यामध्ये राज्यातील १५,१२६ ग्रामपंचायती जोडण्यात आल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यात भारतनेट राज्य शासनामार्फत राबविण्यात आले आहे. ज्यामध्ये १२,५१३ ग्रामपंचायतींना जोडण्यात येत आहे. यापैकी राज्यातील २६ जिल्ह्यातील १५३ तालुक्यातील ९५६८ पेक्षा जास्त ग्रामपंचायती जोडण्यात आल्या आहेत. याकरिता नवी मुंबईमध्ये Network Operating Center (NOC) उभारण्यात आला आहे. व नागपूर येथे DR.NOC उभारण्यात आला आहे.

**(२) शहरी महानेट.–**शहरी महानेट प्रकल्पाच्या अंतर्गत सर्व शासकीय आणि निमशासकीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम इ. शहरी कार्यालये जोडण्यात येणार आहेत. जे ई-गव्हर्नन्स सेवा वितरीत करण्यात सक्षम होतील. शहरी महानेट प्रकल्पाच्या अंतर्गत राज्याच्या शहरी भागातील जवळपास २०,००० कार्यालयांना जोडण्यात येणार आहे. यापैकी सद्यस्थितीत सुमारे ३८०० कार्यालयांना इंटरनेट जोडणी पुरविण्यात आली आहे.

**१४. स्मार्ट सिटी प्रोजेक्ट प्रक्रिया.–**(१) स्मार्ट शहरे प्रकल्पांतर्गत City Surveillance, Public Wi-fi, Citizen kiosk, शहराचे स्वतःचे network and Smart traffic, Smart parking ई-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(२) नागपूर शहरात सदर प्रकल्पाची अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. नाशिक शहर प्रकल्पाची अमंलबजावणी सुरू आहे.

नागपूर शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत लावण्यात आलेल्या city surveillana चा शहरात होत असलेल्या गुन्हेगारीवर आळा बसत असून कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस विभागाला मदत होत आहे. तसेच सी.सी.टी.व्ही. कॅमेरामुळे पोलीस विभागाला तपासात मदत होत आहे.

**१५. महा डीबीटी प्रणाली.–** आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, दिनांक २६ मार्च २०१६ पासून लागू करण्यात आला आहे. त्याद्वारे राज्याच्या एकत्रित निधीतून खर्च केला जाणाऱ्या विविध योजनांद्वारे नागरिकांना प्रदान करण्याकरिता लाभार्थ्यांची एकमेव ओळख पटविणारा अभिलेख आधार ठरविण्यात आला आहे. त्याकरिता राज्यव्यापी डीबीटी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महाडीबीटी पोर्टल मागील ७ वर्षापासून कार्यान्वित असून सध्या १४ विभागांच्या ९३ शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी पोर्टलवर घेण्यात आल्या आहेत. महाडीबीटी पोर्टलद्वारे आता पर्यंत साधारणपणे ५ कोटी अर्जदारांना ६३,७०० कोटी पेक्षा जास्त रकमेच्या लाभाचे वाटप करण्यात आले आहे.

**१६. तांत्रिक मनुष्यबळ.–** सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंसं-१७१७/प्र.क्र. १११/३९, दिनांक २४ मार्च २०१७ अन्वये सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे, केंद्र शासनाने अथवा राज्य शासनाने पारीत केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या व संस्था यांनी माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यित सेवांकरिता तांत्रिक मनुष्यबळ महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फतच घेण्यात येत आहे. सद्यःस्थितीत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांच्यामार्फत राज्य, जिल्हा तसेच तालुकास्तरावर एकूण १९००+ तांत्रिक मनुष्यबळांचा पुरवठा करण्यात येत आहे.

**१७. सेवा हमी कायदा.–** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये आपले सरकार पोर्टल नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने नागरी सेवा दिनांक २ ऑक्टोबर २०१५ पासून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत १०७७ सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत.

**१८. महाराष्ट्र युनिफाईड सिटीझन डेटा हब (MH-UCDH).** सद्यःस्थितीला राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून अनेक संगणकीकरण कार्यक्रम/प्रकल्प सुरू आहेत. हे सर्व प्रकल्प वेगवेगळ्या विभागातर्फे हाती घेण्यात आले होते आणि ते सर्व वेगवेगळ्या कोडिंग पद्धतीने वेगवेगळ्या संगणकीय भाषांमध्ये लिहीलेल्या वेगवेगळ्या प्लॅटफोर्म्सवर आहेत. याचा परिणाम म्हणून, वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर भिन्न डेटा स्ट्रक्चर्स आहेत. आणि विविध विभागांमधील माहिती एकमेकांशी जोडलेली नाही. परिणामी नागरिकांना सर्व विभागाची माहिती एकत्र उपलब्ध करून देणे शक्य झाले नाही यामुळे त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर, विविध विभागांची माहिती एकत्रित नसल्यामुळे शासनाकडे आधीच उपलब्ध असलेली पण विविध विभागात विखुरल्याने माहिती मिळण्यात बराच वेळ वाया जातो. या समस्या लक्षात घेता शासनाच्या विविध विभागाकडे उपलब्ध माहितीचे प्रमाणीकरण करून, सदर माहिती एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देऊन नागरिकांना उत्तम आणि त्वरित सेवा प्रदान करण्याच्या अनुषंगाने Data Standardization and interoperability व Digital Service Delivery प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदरील प्रकल्पाचे काम निविदा प्रक्रियेमार्फत Coforge LTD या संस्थेस देण्यात आलेले आहेत. सदरील प्रकल्पाच्या कामकाजास डिसेंबर २०२३ मध्ये कार्यादेश दिलेला आहे. सध्या हा प्रकल्प विकसित झालेला असून संघटित समिती मार्फत प्रकल्पाची चाचणी करण्यात येत आहे. ही चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प कार्यान्वित करण्याचे नियोजत आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर Coforge LTD पुढील ३६ महिने देखभाल दुरुस्ती करेल.

## माहिती तंत्रज्ञान संचालनालय

Directorate of Information Technology

### तक्ता २/Table II

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | वेतनस्तर/ Scale of Pay | पदांची संख्या / No. of Post | | Designation |
|---|---|---|---|---|---|
| | | | 2024-2025 | 2025-2026 | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| १ | **राजपत्रित वर्ग-१** | | | | *Gazetted-Class—I* |
| | संचालक तथा उप सचिव | संवर्ग पद | 1 | 1 | Director (IT) and Ex-Officio D. S. |
| | अवर सचिव | 67,700-2,08,700 (S-23) | 1 | 1 | Under Secretary |
| २ | **राजपत्रित वर्ग-२** | | | | *Gazetted-Class—II* |
| | कक्ष अधिकारी (तांत्रिक) | 41,800-1,32,300 (S-15) | 3 | 3 | Desk Officer (Technical) |
| ३ | **अराजपत्रित वर्ग-३** | | | | *Non-Gazetted-Class— III* |
| | लघुलेखक (उच्च श्रेणी) | 41,800-1,32,300 (S-15) | 1 | 1 | High Grade Stenographer |
| | सहाय्यक कक्ष अधिकारी | 38,600-1,22,800 (S-14) | 1 | 1 | Assistant Desk Officer |
| | सहाय्यक कक्ष अधिकारी (तांत्रिक) | 38,600-1,22,800 (S-14) | 5 | 5 | Assistant Desk Officer (Technical) |
| | लिपिक-टंकलेखक | 19,900-63,200 (S-6) | 1 | 1 | Clerk-Typists |
| | वाहन चालक | 19,900-63,200 (S-6) | 1 | 1 | Driver |
| ४ | **अराजपत्रित वर्ग-४** | | | | *Non-Gazetted-Class— IV* |
| | शिपाई | 15,000-67,600 (S-1) | 1 | 1 | Peons |
| | | **एकूण** | **15** | **15** | **Total** |

**(२) राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग**

**वार्षिक योजना २०२६-२०२७**

**क्षेत्रविज्ञान व तंत्रज्ञान**

१२.१. विकासाच्या सर्व उद्दिष्टांचा विचार करता विज्ञान व तंत्रज्ञानातील कल्पनांचा विस्तृतपणे व मोठ्या प्रमाणावर वापर करण्यास ज्या क्षेत्रात वाव आहे, असे कार्यक्रम व प्रकल्प निश्चित करताना खाली नमूद केलेले मुद्दे विचारात घेण्याची आवश्यकता आहेः

(१) विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयक विद्यमान सुविधांचा विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयक कार्यक्रमाकरिता वापर करणे.

(२) प्रामुख्याने समाजाच्या आर्थिक उन्नतीकरिता नाविन्यपूर्ण तसेच सुयोग्य तंत्रज्ञानाच्या निर्मितीसाठी/हस्तांतरणासाठी भरीव अर्थसहाय्य उपलब्ध करणे.

(३) आरोग्य सेवा, जल व्यवस्थापन, कृषि, ऊर्जा, नैसर्गिक साधनसंपत्ती, ग्रामीण व्यवसाय, उद्योग व शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विषयक उपाय योजणे.

(४) वैज्ञानिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि विज्ञानाच्या व्यापक प्रसाराचा जाणीवपूर्वक प्रयत्न व नियोजन करणे.

(५) संशोधन कार्यक्रम आणि परिणामकारक क्षेत्रीय तंत्रज्ञान हस्तांतरण यासाठी सहाय्यकारी यंत्रणा सुधारणे.

१२.२. वर नमूद केलेल्या दृष्टीकोनातून विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयक कार्यक्रम अधिक परिणामकारक व उपयुक्त करण्यासाठी राज्य शासनाने विधानमंडळाच्या एका अधिनियमानुसार राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग ही एक संविधानिक संस्था स्थापन केली आहे. आतापर्यंत आयोगाने तंत्रज्ञान उपयोगिता, अभ्यास आणि सर्व्हेक्षण असे क्षेत्रप्रवण कार्यक्रम सुरू केले आहेत. तसेच राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान कार्यक्रम, विज्ञान लोकप्रिय करण्याचे कार्यक्रम यामध्येही आयोग सहभागी होत असतो. हे सर्व प्रकल्प आणि कार्यक्रम केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या विद्यमान मान्यताप्राप्त संस्था (राष्ट्रीय प्रयोगशाळा, विद्यापीठे आणि महाविद्यालये यासहित), क्षेत्रीय संस्था आणि अशासकीय संस्था यांच्याद्वारे पार पाडले जातात.

१२.३. आयोगाने अद्यापपर्यंत "विज्ञान आणि तंत्रज्ञान उपयोगितेसाठी अर्थसहाय्य" या मुख्य योजनेखाली १७५ प्रकल्पांना अर्थसहाय्य मंजूर केले आहे. त्यामध्ये अन्नप्रक्रिया, जलशुद्धीकरण, विज्ञान शिक्षण, मत्स्योद्योग, कृषि, ग्रामीण उद्योग तंत्रज्ञान विकास आरोग्य सेवा टाकाऊ पदार्थाचा पुनर्वापर इत्यादी क्षेत्रांचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून पुरस्कृत केलेल्या विज्ञान लोकप्रिय करण्याच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी यामध्येही आयोगाचा सहभाग असतो.

१२.४. आयोगाकडून तज्ज्ञ तपासणीच्या आधारे संपूर्ण वर्षभर प्रकल्प प्रस्तावांची छाननी करण्यात येते. सध्या सुरू असलेल्या ३० प्रकल्पांसाठी आणि नव्याने मान्यता देण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. सध्या कार्यरत असलेल्या मोठ्या प्रकल्पांमध्ये मुख्यत्वे गडचिरोली येथील विज्ञान आणि तंत्रज्ञान संसाधन केंद्र, जैव-वैद्यकीय अभियांत्रिकी केंद्र, नंदुरबार येथील सीलेज आधारीत क्षेत्रीय विकास प्रकल्प स्मार्ट ड्रोनच्या सहाय्याने सर्व क्षेत्रात विकास आणि उपयोगिता हे प्रकल्प आहेत. अन्न तंत्रज्ञान आणि इनोव्हेशन पार्क आणि तालुक्यासाठी तंत्रज्ञान योजना तसेच महाराष्ट्रातील औषधे वनस्पतींचा वापर करून नवीन औषध निर्मिती हे नवीन प्रकल्प विचाराधीन आहेत.

१२.५. शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करून ती वृद्धींगत करण्यासाठी आणि नाविन्यतापूर्ण कार्यक्रमांद्वारे उद्योगशीलतेला/उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी आयोगाने "विज्ञान आणि नाविन्य उपक्रम केंद्रे" या नावाची नवीन योजना सुरू केली आहे. ज्या शाळा खर्चाचा २५% हिस्सा उचलण्यास आणि केंद्र स्वबळावर पुढे चालविण्यास तयार आहेत अशा शाळांमध्ये ही योजना सुरू आहे. अशा प्रकारची ६ केंद्र कार्यान्वित झाली आहेत. आणि ३ केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. विज्ञान व नाविन्यता उपक्रम केंद्र आणि टेक्नोलॉजी लॅब उर्वरित सर्व जिल्हयांमधे स्थापन करण्याकरिता शासनाने "डॉ. जयंत नारळीकर विज्ञान व नाविन्यता उपक्रम केंद्र " असा कार्यक्रम पुढील ५ वर्षात राबविण्याचा निर्णय घेतला असून २३.S.I.A.C. केंद्र व २८ Technology Labs स्थापन करण्याचा कार्यक्रम राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत राबविण्याचे व त्यासाठी सुमारे रु. १९२.५० कोटीच्या अंदाजित खचपैकी या वर्षी रु. ४० कोटींचा निधी आयोगास उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. त्याचाही वार्षिक योजनेत समावेश करण्यात आला आहे

१२.६. मोठे प्रकल्प आयोग स्तरावर हाताळण्यात येत आहेत. तथापि स्थानिकदृष्ट्या महत्त्वाचे असे छोटे प्रकल्पसुद्धा विविध क्षेत्रीय संस्थांनी हाती घ्यावेत. यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. विशेषतः विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमध्ये स्थानिक स्तरावर विकेंद्रित स्वरुपात प्रकल्प राबविण्याची गरज आहे. त्याअनुषंगाने "विद्यापीठामार्फत विज्ञान व तंत्रज्ञान कार्यक्रमाकरिता सहाय्य" ही एक नवीन योजना आयोगाने सुरू केली असून सध्या १४ विद्यापीठांमध्ये राबविण्यात येत आहे.

१२.७. शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यामध्ये परस्पर सामंजस्य वाढीस लावण्यासाठी, अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी आयोगाने "आरजीएसटीसी-टीआयएफएसी एमएसएमई इंटर्नशीप कार्यक्रम" ही योजना सुरू केली आहे. याअंतर्गत विद्यार्थी उद्योगास उपयुक्त असे प्रकल्प हाती घेतात. ही योजना सध्या राज्यात दोन अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रायोगिक स्वरुपात सुरू आहे आतापर्यंत याचा फायदा एकूण ४४५ विद्यार्थीनी घेतला आहे आणि पुढील काळात ही योजना अन्य महाविद्यालयात सुरू करण्यात येईल.

१२.८. तसेच राज्यातील संशोधन संस्था आणि उद्योग यांच्या सहभागातून तंत्रज्ञान विकास आणि तंत्रज्ञान स्विकृतीचे प्रकल्प आयोगाच्या सहाय्याने राबविण्यासाठी नवीन योजना आयोगाने सुरू केली आहे. त्या अन्वये संशोधन संस्था आणि उद्योग आणि अंतिम वापरकर्ता यांचा सहभाग मिळविणे, विकसित झालेले तंत्रज्ञान वापरून हे औद्योगिकस्तरापर्यंत नेणे. महाराष्ट्राच्या दृष्टीने या तंत्राज्ञानाचा वाणिज्यिक वापर करणे आणि आयोगाचे प्रकल्प व संशोधन संस्थांमधील विकसित तंत्रज्ञान याच्या वापरातून नवीन उद्योगाची उभारणी करणे अशी त्याची मुख्य उद्दिष्टे आहेत.

सध्या अंमलबजावणीखाली सुरू असलेले, प्रकल्प विचाराधीन असलेले नवीन प्रकल्प, सन २०२६-२०२७ मध्ये घेण्यात येणारे नवीन प्रकल्प प्रस्ताव, अनेक संस्थांचे एकत्रित महत्त्वाचे प्रकल्प घेण्याची आयोगाची भूमिका, इत्यादी अशा सर्व बाबी विचारात घेता सन २०२६-२०२७ करिता मागणी क्रमांक ए-५,२२५१, सेक्रेटरीएट-सामाजिक सेवा, ०९० सेक्रेटरिएट, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजना (००) (०३) विज्ञान व तंत्रज्ञान यामधील समन्वय व संशोधन (२२५१ ००४२), ३१, सहायक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशीर्षाखाली रुपये १२५.०० कोटी (रुपये एकशे पंचवीस कोटी फक्त) व ३६ सहायक अनुदान (वेतन) या लेखाशिर्षाखाली रु. २.६५ कोटी (रुपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त) असे एकूण रुपये १२७.६५ कोटी (रुपये एकशे सत्तावीस कोटी पासष्ठ लाख फक्त) इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

## कर्मचारी गोषवारा

### विज्ञान तंत्रज्ञान कक्ष

### तक्ता ३ / Table III

| अनुक्रमांक Sr. No. | पदनाम | वेतनस्तर/ Scale of Pay | ग्रेड पे Grade Pay | पदांची संख्या / No. of Post | | Designation |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 2024-2025 | 2025-2026 | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (2) |
| **(१)** | **राजपत्रित, वर्ग १—** | | | | | *Gazetted, Class I—* |
| | वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी .. | S-23 (67700– 208700) | .. | 3 | 3 | Senior Scientific Officer |
| **(२)** | **राजपत्रित, वर्ग २—** | | | | | *Gazetted, Class II—* |
| | कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी .. | S-20 (56100– 177500) | .. | 2 | 2 | Junior Scientific Officer |
| | कक्ष अधिकारी .. | S-16 (44900– 142400) | .. | 1 | 1 | Section Officer |
| **(३)** | **अ-राजपत्रित, वर्ग ३—** | | | | | *Non Gazetted, Class III—* |
| | लघुलेखक (उच्चश्रेणी) इं .. | S-15 (41800– 132300) | .. | 1 | 1 | Higher Grade Stenographer |
| | लघुलेखक (निम्नश्रेणी) इं. व म. .. | S-14 (38600– 122800) | .. | 1 | 1 | Lower Grade Stenographer |
| | लिपिक टंकलेखक .. | S-6 (19900– 63200) | .. | 2 | 2 | Clerk-Typist |
| **(४)** | **अ-राजपत्रित, वर्ग ४—** | | | | | *Non-Gazetted, Class IV* |
| | शिपाई .. | S-1 (15000–67600) | .. | 1 | 1 | Peon |
| | | | एकूण .. | 11 | 11 | Total |

**सामान्य प्रशासन विभाग**

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

एच १६७१-१६

# कार्यक्रम क्रमांक ११

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**उद्देश :**

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासन आणि जनता यांना जोडणारा तो एक महत्त्वाचा दुवा असून शासनाचे उपक्रम जनतेपर्यंत आणि त्याबाबतच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचालनालयास पार पाडावी लागते.

महाराष्ट्र शासनाचे विविध कल्याणकारी निर्णय, उपक्रम, धोरणे, विविध मोहिमा आणि विविध योजनांची माहिती या यंत्रणेद्वारे जनतेपर्यंत पोहचविण्यात येते.

दैनंदिन वृत्तविशेष प्रसारित करणे, प्रसिद्धी साहित्याची निर्मिती करून वाटप करणे, विविध विषयांवर माहितीपट निर्माण करणे, राज्य विभागीय व जिल्हा-स्तरावर प्रदर्शने आयोजित करणे, विभागीय आणि जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत योजनांची शासनासंबंधीची माहिती पुरविणे, शासकीय जाहिरातीचे वृत्तपत्रांना वाटप करणे या गोष्टींचा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यात समावेश होतो.

जनतेची मते व प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी राज्यात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रांची व अन्य प्रकाशनांची रोजच्या रोज ह्या विभागामार्फत माहिती घेऊन ती शासनास पुरवली जाते.

मुख्यालयात आणि राज्यभर सर्वत्र असंख्य प्रकारचे उपक्रम दैनंदिन स्वरूपात राबविण्यात येत असतात. त्यांची तात्काळ आणि प्रभावी प्रसिद्धी करण्याचे काम महासंचालनालयास करावे लागते.

**रचना :**

महासंचालक या पदावरील सनदी अधिकारी या यंत्रणेचा प्रमुख असतो. महासंचालकांच्या अखत्यारित संचालक (माहिती) (प्रशासन), संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), मुंबई येथे व नवी दिल्ली, नागपूर येथेही संचालक (माहिती) ही पदे आहेत. विभागीयस्तरावर सात उप संचालकांची पदे आहेत (कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नवी दिल्ली) आणि जिल्हा माहिती कार्यालये (३४) कार्यरत आहेत. तसेच महाराष्ट्रातील योजनांची माहिती महाराष्ट्राबाहेरील जनतेला देण्यासाठी दिल्ली आणि गोवा येथेही **महाराष्ट्र परिचय केंद्रे** कार्यरत आहेत.

**कार्यपद्धती :**

उपलब्ध माध्यमांचा प्रसिद्धीच्या कामासाठी वापर करून घेण्यात येतो. मुख्यालयात (१) वृत्त, (२) वृत्तचित्र (३) नवमाध्यम, (४) विभागीय संपर्क कक्ष, (५) जाहिरात (६) वृत्त-प्रशासन, (७) प्रकाशने, (८) प्रदर्शने, (९) आस्थापना, (१०) लेखा या शाखा कार्यरत आहेत.

**अधिकारी/कर्मचारी :**

महासंचालनालयात बहुतेक सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी माहिती-तंत्रज्ञान-विषयक प्रशिक्षण घेतले असून या ज्ञानाचा लाभ ते आपल्या दैनंदिन कामकाजात करून घेत असतात.

सर्व जिल्हा माहिती अधिकारी हे पत्रकारितेचे पदवीधर/पदविकाधारक असून त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रत्यक्ष कामाचा अनुभवही घेतलेला असतो.

दैनंदिन वृत्त प्रसारणाच्या कामाबरोबरच माध्यम प्रतिनिधींना अन्य प्रकारची माहिती/संदर्भ उपलब्ध करून देण्याचे आणि तत्सम जनसंपर्काचे कामही या अधिकाऱ्यांना करावे लागते. त्यासाठी आवश्यक तेव्हा मोहिमा राबविण्यात येतात.

महासंचालनालयाच्या संशोधन कक्षाद्वारे दैनंदिन वृत्तपत्रे, राज्यातील तसेच राज्याबाहेरील नियतकालिके ह्यांची नित्यनियमाने छाननी करण्यात येते आणि अशा वृत्तपत्रातून व नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या महत्त्वपूर्ण विषयावरील लेखांची वा बातम्यांची कात्रणे काढून संबंधित विभागाच्या मंत्र्यांना, सचिवांना पाठविण्यात येतात.

मंत्रालय केंद्रीय ग्रंथालयाद्वारे विविध विषयावरील उत्तमोत्तम ग्रंथाची खरेदी सतत करण्यात येते. असे ग्रंथ आवश्यकतेनुसार आणि मागणीबरहुकुम मंत्रिमंडळाचे सदस्य, मंत्रालयीन अधिकारी आणि ग्रंथालयाचे सदस्य असलेले मंत्रालयीन कर्मचारी ह्यांना संदर्भासाठी देण्यात येतात. ग्रंथालयाचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण करण्यात आले असून एक अद्ययावत संदर्भ केंद्र म्हणून त्याची नवी प्रतिमा निर्माण होत आहे.

**विभागीय/जिल्हास्तरीय/उप माहिती कार्यालये/माहिती केंद्रे परिचय केंद्रे :**

जनसंपर्क माध्यमांद्वारे शासन आणि जनता ह्यांना जोडणारा एक दुवा ह्या नात्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कामाचे स्वरूप दुहेरी आहे. विकास कार्यक्रमांच्या तसेच सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या अन्य कार्यक्रमांच्या बाबतीत शासनाची ध्येयधोरणे, भूमिका, उद्दिष्टे आणि कामगिरी ह्याबद्दलची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम हे महासंचालनालय करीत असते. त्याचवेळी या सर्व गोष्टींच्या बाबतीतील सर्वसामान्य जनतेच्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून उमटलेल्या प्रतिक्रिया शासनाच्या नजरेस आणण्याची कामगिरीही ते बजावीत असते. या सर्व कामगिरीसाठी ही कार्यालये पूरक म्हणून काम करत असतात. दैनंदिन वृत्तविशेष प्रसारित करणे, प्रसिद्धी साहित्याचे वाटप करणे, विविध विषयांवर निर्मित केलेले वृत्तचित्र नागरी तसेच ग्रामीण भागातून जनतेस नित्यनेमाने दाखविणे, विभागीय व जिल्हास्तरावर प्रदर्शन आयोजित करणे, शासकीय जाहिराती स्थानिक, जिल्हा व विभागीयस्तरावर वितरित करणे आदी कामे ते पार पाडतात.

महाराष्ट्राबाहेर दिल्लीसारख्या व गोव्यात वास्तव्य करीत असलेल्या मराठी लोकांच्या व महाराष्ट्रातील त्यांच्या बांधवांमध्ये परस्पर भावनिक व सांस्कृतिक संबंध दृढमूल करण्याच्या दृष्टीने एक उपयुक्त व्यासपीठ निर्माण करण्याचे महत्त्वाचे कामही ते करत आहेत.

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**महासंचालक**

- संचालक (माहिती) (प्रशासन), मुंबई.
- संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), मुंबई.
- संचालक (माहिती) नागपूर-अमरावती विभाग, नागपूर.
- संचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली.

**सहा विभागीय माहिती उप संचालकांची कार्यालये**

- पुणे
- नाशिक
- कोकण भवन
- कोल्हापूर
- अमरावती
- लातूर
- उप संचालक (माहिती) छत्रपती संभाजीनगर.

**मुख्यालयातील उप संचालक**

- उप संचालक (माहिती) (प्रशासन)
- उप संचालक (वृत्त), मुंबई.
- उप संचालक (प्रकाशने),मुंबई.
- उप संचालक (लेखा) मुंबई.
- उप संचालक (प्रदर्शने)

↓

वरिष्ठ सहायक संचालक,
महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा.

↓

जिल्हा माहिती कार्यालये (३४), माहिती केंद्रे (३)

↓

उप माहिती कार्यालये (८).

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे काम खालील शाखांद्वारे पार पाडले जाते :

**(१) वृत्त शाखा :** शासकीय योजना, विकासकामांविषयक बातम्या, विशेष वृत्त तसेच लेख दैनंदिनस्तरावर वितरित करण्यात येतात. विभागीय संपर्क कक्षामार्फत मा. मंत्रीमहोदय तसेच सर्व विभागांच्या कामकाजाची दैनंदिनस्तरावर प्रसिद्धी करण्यात येते.

आकाशवाणी तसेच दूरदर्शन आणि विविध उपग्रह वाहिन्यांचाही प्रसिद्धीसाठी वापर करून घेण्यात येतो. विविध वाहिन्यांवरील वार्तापत्रासोबतच अन्य विकासात्मक कार्यक्रमातही शासकीय यंत्रणेचा सहभाग असावा यादृष्टीने नियोजन केले जाते. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य सर्व संबंधितांकडून मिळविण्याचे काम वृत्तशाखेच्या अधिनस्त असलेल्या दृकश्राव्य कक्षामार्फत करण्यात येते. वृत्त शाखेअंतर्गत समाज माध्यम कक्षाद्वारेही दैनंदिन बातम्या, विशेष वृत्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरुन प्रसिद्ध करण्यात येतात.

**(२) वृत्तचित्र शाखा :** शासनाच्या विविध योजना, उपक्रम यांची दृकश्राव्य प्रसिद्धी दूरचित्रवाहिन्या, आकाशवाणी यांच्या माध्यमातून करण्यात येते. नोव्हेंबर, २०१६ पासून शासनाची ध्येयधोरणे व लोककल्याणकारी योजना यावर आधारित माननीय मंत्री, शासनाचे वरिष्ठ अधिकारी तसेच शासनाशी संबंधित विविध विषयावरील तज्ज्ञांच्या मुलाखतींवर आधारित 'दिलखुलास' हा कार्यक्रम राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रावरुन सोमवार ते शनिवार सकाळी ७-२५ ते ७-४० या वेळेत प्रसारित केला जातो, शासनाच्या योजनांवर आधारित योजनांची दूरचित्रवाहिन्या, आकाशवाणी केंद्र सोशल मीडिया येथून प्रसिद्ध करण्यासाठी जाहिरात संस्थांची यादी तयार करण्यात आली आहे. ताडदेव येथील कार्यालयात चित्रपट ग्रंथालयातील जुन्या माहितीपट/समाचार चित्रांचे जतन व संवर्धन करण्यात येते.

**माध्यम आराखडा :** राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या तसेच मंडळे/महामंडळे/प्राधिकारणे यांच्या सर्व दर्शनी जाहिराती महासंचालनालयामार्फत वितरित करण्यात येतात. त्या व्यतिरिक्त शासकीय संदेशाकरिता माध्यम आराखडा तयार करण्याचे व त्यांची सर्व शासकीय विभाग, मंडळे, प्राधिकरणे यांच्याकडून अंमलबजावणी करण्याचे काम महासंचालनालयास सोपविण्यात आले आहे. याकरिता माध्यम संस्थांची निवड सूची तयार करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत प्रसिद्धी मोहिमांचे काम पार पाडले जाते.

**(३) नवमाध्यम शाखा :** नवमाध्यम शाखेअंतर्गत समाज-डिजिटल माध्यम, महासंवाद संकेतस्थळ, माध्यम प्रतिसाद केंद्र, माहिती य जनसंपर्क महासंचालनालयाची वेबसाईट, फॅक्ट चेक युनिट, संशोधन व संदर्भ कक्ष यांच्या माध्यमातून लोकोपयोगी शासकीय माहितीचा प्रचार-प्रसार करण्यासह इतर प्रशासकीय कामकाज केले जाते.

मंत्रालयीन विभाग तसेच विभागीय आणि जिल्हा स्तरावरील विविध घडामोडींचे दैनंदिन वृत्तांकन, महत्त्वाचे शासन निर्णय, मंत्रिमंडळ निर्णय, कार्यक्रम, अभियान, उपक्रम आदींच्या माहितीसह आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांपर्यंत अधिकृत, अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य नवमाध्यम शाखेमार्फत पार पाडले जाते. यासाठी ब्लॉग, एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक, यूट्यूब, इन्स्टाग्राम, टेलिग्राम, डेलिहंट आदी माध्यमांचा वापर केला जातो. तसेच, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री यांच्या कार्यक्रमांसह इतर महत्त्वाच्या कार्यक्रमांचे थेट प्रसारण (Live Streaming) केले जाते. महासंचालनालयामार्फत खालील सोशल आणि डिजिटल मीडिया (समाज माध्यम) यांचा वापर करण्यात येतो.

**महासंवाद –** https://mahasamvad.in/

**एक्स –** https://twitter.com/MahaDGIPR

**फेसबुक –** https://www.facebook.com/MahaDGIPR

**इन्स्टाग्राम –** https://www.instagram.com/mahadgipr

**युट्यूब –** https://www.youtube.co / MAHARASHTRADGIPR

**टेलिग्राम चॅनल –** https://t.me/MahaDGIPR

**डेलिहंट –** https://profile.dailyhunt.in/mahasamvad

याशिवाय MAHGOV या गेटवेद्वारे मोबाईलधारकांना DGIPR NEWS नावाने मोबाईलवर एसएमएस (SMS) पाठविले जातात. महासंचालनालयाच्या वतीने व्हाट्सअपचादेखील प्रभावी वापर करण्यात येतो.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या दिवसभरातील बातम्यांचे अवलोकन करुन त्यांना उचित प्रतिसाद देण्याचे काम महासंचालनालयांतर्गत माध्यम प्रतिसाद केंद्रामार्फत (MRC) करण्यात येते. राज्य शासनाचे विविध उपक्रम/योजनांविषयी नकारात्मक बातमी प्रसारित झाल्यावर ती बातमी संबंधित विभागाकडे तातडीने पाठविण्याचे काम या केंद्रामार्फत केले जाते.

अलीकडच्या काळात समाज माध्यम आणि डिजिटल माध्यमांवर राज्य शासनाच्या कामकाजाबाबत नकारात्मक स्वरुपाच्या व समाजात भय पसरवणाऱ्या बातम्या अपलोड होत असतात. अशा बातम्या थोड्या कालावधीत या माध्यमांमार्फत व्हायरल होत असल्याने त्यांचे फॅक्ट चेक (सत्यशोधन) करणे अत्यंत गरजेचे ठरते. त्यासाठी महासंचालनालयात फॅक्ट चेक युनिट कार्यरत आहे.

राज्य शासनाच्या प्रसिद्धीचे काम अधिक गतीने होण्यासाठी अचूक, वस्तूनिष्ठ माहिती उपलब्ध होण्यासाठी महासंचालनालय स्तरावर संशोधन व संदर्भ कक्ष तयार करण्यात येत आहे.

**(४) विभागीय संपर्क कक्ष :**

राज्य शासनाचे निर्णय, ध्येय-धोरणे, योजना आणि उपक्रम जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचावेत, माध्यमांशी सुसूत्र संवाद प्रस्थापित व्हावा आणि शासन यंत्रणेच्या विश्वासार्ह प्रतिमेची जपणूक व्हावी या सर्व गोष्टींसाठी विभागीय संपर्क कक्ष महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. हा कक्ष शासन यंत्रणा आणि प्रसारमाध्यमे यांच्यातील दुवा म्हणून काम करत असून माहितीच्या प्रवाहाला सुरक्षित, वेळेवर आणि अधिकृत स्वरूपात आकार देतो.

राज्य शासनाच्या विविध कार्यक्रम/उपक्रमांमध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्यपाल तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती असते. या कार्यक्रमांच्या प्रसिध्दीचे नियोजन करणे ही विभागीय संपर्क कक्षाची अत्यंत संवेदनशील जबाबदारी असते. कार्यक्रमाच्या पूर्वतयारीपासून ते

प्रसारित होणाऱ्या वृत्तांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर दक्षता घेतली जाते. प्रसिद्धी धोरण, प्रेस नोट्स, छायाचित्रे, व्हिडीओ कव्हरेज यांचा समन्वय करून माध्यमांना योग्य आणि अधिकृत माहिती पुरवली जाते.

मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णय, प्रशासकीय आदेश, महत्त्वपूर्ण घोषणांच्या प्रसिध्दीची जबाबदारी हा कक्ष पार पाडतो. अधिवेशन कालावधीत दोन्ही सभागृहांचे कामकाज, प्रश्नोत्तरे, विधेयके, चर्चासत्रे यांचे वृत्तांकन करून ते माध्यमांपर्यंत पोहोचवणे ही सुद्धा या कक्षाची एक महत्त्वाची भूमिका आहे. राज्यात येणाऱ्या परदेशी शिष्टमंडळांच्या भेटी हे आंतरराष्ट्रीय संबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्यक्रम असतात. या कार्यक्रमांची प्रसिध्दी, पत्रकार परिषदा, बैठकांचे मुद्दे आणि संदेश यांचा बारकाईने समन्वय करून राज्याची सकारात्मक प्रतिमा विकसित करण्याचे काम हा कक्ष करतो.

माध्यमांमध्ये शासनाबाबत नकारात्मक किंवा अपूर्ण माहिती प्रसारित झाल्यास, त्यामागील सत्य माहिती मिळवून देण्याचे काम विभागीय संपर्क कक्ष प्रभावीपणे करतो. संबधित विभागाकडून तथ्य आधारित खुलासे तयार करून ते माध्यमांपर्यंत पोहोचवणे, चुकीची माहिती दुरुस्त करुन माध्यमांपर्यंत पोहोचविण्याची भूमिका या कक्षाद्वारे पार पाडली जाते. विधिमंडळाच्या संयुक्त सभेत सादर होणाऱ्या राज्यपालांच्या अभिभाषणाचा मसुदा तयार करणे ही अत्यंत महत्त्वाची आणि व्यापक जबाबदारी आहे. विविध विभागांकडून उपलब्ध होणारी माहिती संकलित करून तिचे धोरणात्मक संपादन, भाषाशैली, आकडेवारी यांची मांडणी करून अंतिम मसुदा सादर केला जातो.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी हे दररोज राज्यातील घडामोडींचा आढावा घेऊन निर्णय घेतात. त्यामुळे सकाळीच महत्त्वाची कात्रणे त्वरित उपलब्ध करणे ही विभागीय संपर्क कक्षाची अतिशय महत्वाची जबाबदारी आहे. मंत्री, राज्यस्तरीय अधिकारी किंवा मान्यवर यांना विविध कार्यक्रमांसाठी भाषणे, संदेश, मुद्दे आणि पार्श्वभूमी संदर्भांची आवश्यकता असते. विभागीय संपर्क कक्ष हे साहित्य अत्यंत तपशीलवार आणि तथ्याधारित स्वरूपात उपलब्ध करून देतो.

विविध विभागांच्या जाहिराती उदाहरणार्थ योजनांची माहिती, जनजागृती मोहीम, शासन निर्णयांचे मसुदे तयार करणे तसेच त्यांना मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री/मंत्री/सचिव स्तरावरील मान्यता मिळवून देणे हे काम अत्यंत पारदर्शकपणे केले जाते. राज्य शासन वेळोवेळी विविध विशेष प्रसिध्दी मोहिमा राबवते. या मोहिमांच्या संकल्पना, मजकूर, घोषवाक्य, प्रेसनोट्स यांची भाषा, तथ्य आणि सादरीकरण तपासून अधिकृत स्वरूप देणे हे कक्ष निभावतो. आचारसंहिता अंमलात असताना प्रसिध्दी कार्यात विशेष दक्षतेची आवश्यकता असते. निवडणूक कालावधीतील सर्व प्रसिध्दी कार्ये नियमबद्ध पद्धतीने पार पाडणे हीदेखील या कक्षाची जबाबदारी आहे.

शासनाच्या महत्त्वाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत अचूक पद्धतीने पोहोचण्यासाठी हा कक्ष प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांशी समन्वय साधतो. 'लोकराज्या'साठी लेख, मनोगत आणि विशेष वार्तांकन यांचाही समावेश या कामकाजात होतो.

राज्य माहिती व जनसंपर्क विभागाने निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या कार्यक्रमांमध्ये मंत्री, सचिव आणि नामांकित व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या जातात. या मुलाखतींसाठी प्रश्नावली तयार करणे, वेळापत्रक निश्चित करणे आणिं समन्वय साधणे ही महत्त्वाची जबाबदारी या कक्षाद्वारे पार पाडली जाते. विभागीय संपर्क कक्ष हा शासन आणि जनतेमध्ये विश्वासाचे पूल उभा करणारा महत्त्वाचा घटक आहे. शासनाच्या प्रत्येक निर्णयाच्या मागची भूमिका, विचारसरणी आणि परिणामकारकता जनतेपर्यंत पोहोचवून लोकशाही प्रक्रियेला बळकटी देणारे कार्य हा कक्ष सातत्याने आणि निष्ठेने पार पाडत असतो.

**(५) जाहिरात शाखा :** शासकीय जाहिरात वितरण धोरणास शासन निर्णय दिनांक १ मे २००१ अन्वये मान्यता देण्यात आली असून या वितरण धोरणानुसार जाहिरात वितरण करण्याची कार्यपद्धती ठरवून देण्यात आली आहे. तथापि, दिनांक २९ नोव्हेंबर २०१६ रोजी मंत्री परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार जाहिरात वितरण धोरणात बदल करण्यात आला असून त्याअनुषंगाने दिनांक ५ जानेवारी २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार शासनाची सर्व महामंडळे/मंडळे, प्राधिकरण, आरोग्य, राज्य शासकीय कंपन्या याच्या वर्गीकृत जाहिरात त्यांच्या स्तरावरुन वितरित करण्यात येतात. तसेच त्यांच्या दर्शनी जाहिराती (Display Advertisement) तयार करण्याचे, वितरणाचे व सर्वकष जाहिरात मोहिमा आखणी व अंमलबजावणीचे काम करण्यात येते. दिनांक २० डिसेंबर २०१८ शासन निर्णयानुसार शासकीय संदेश प्रसार नियमावली, २०१८ लागू करण्यात आली असून त्याअन्वये कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

**(६) वृत्त प्रशासन पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सोयी-सवलती :**

**(१) शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी :-** पत्रकारांना दुर्धर आजार किंवा त्यांचा आकस्मिक मृत्यू झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याच्या उद्देशाने सन २००९ मध्ये शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी या स्वतंत्र न्यासाची स्थापना करण्यात आली आहे. या न्यासाला शासनाकडून आर्थिक मदत दिली जाते. शासनाकडून देण्यात आलेली मदत न्यासातर्फे राष्ट्रीय बँकेत ठेव स्वरुपात गुंतविण्यात येते. या ठेवीवर मिळणाऱ्या व्याजातून पत्रकारांना/त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत केली जाते. सध्या एकूण ठेवीची रक्कम १० कोटी एवढी आहे.

**(२) आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना :—** राज्यातील जेष्ठ पत्रकारांचा सन्मान करणे. ६० वर्षावरील पत्रकारांना आर्थिक मदत करणे. यासाठी सन २०१९ पासून आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना राज्यात लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये येणारा खर्च भागविण्यासाठी शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या ठेवीमध्ये रुपये ९० कोटी एवढी रक्कम जमा करण्यात आली असून त्या ठेवीच्या व्याजावर मिळणाऱ्या रकमेतून या योजनेवरील खर्च भागविला जाणार आहे. सन २०१९ या वर्षामध्ये पत्रकारांना या योजनेंतर्गत सहाय्य देण्यात आलेले आहे. सामान्य प्रशासन विभाग दिनांक १४ मार्च २०२४ नुसार "आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना" अंतर्गत ज्येष्ठ पत्रकारांना द्यावयाचे मासिक अर्थसहाय्य रु. ११,००० वरून रु.२०,००० इतके करण्यांत आले आहे.

**(३) विमा योजना :—** राज्यातील पत्रकारांना आणि त्यांच्या कुटुंबियांचा महात्मा फुले जीवनदायी योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

**(४) पत्रकारांना घरे उपलब्ध करून देणे :**—राज्यातील पत्रकारांना घरे उपलब्ध व्हावी यासाठी म्हाडाने पत्रकारांसाठी २.५० टक्के व सिडकोने ५ टक्के एवढे आरक्षण ठेवलेले आहे. तसेच पत्रकाराच्या गृहनिर्माण सहकारी सोसायट्यांना जागा देण्यासंदर्भात प्रस्ताव प्राप्त झाला असल्यास जागा मंजुरीसाठी त्याचीही शिफारस केली आहे.

**(५) वाहतूक सुविधा :**—राज्यातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**(६) विश्रामगृहामध्ये आरक्षण :**—अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहामध्ये आरक्षणासाठी प्राधान्यक्रम निश्चित केलेला आहे.

(७) राज्यातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना शासकीय व निमशासकीय रुग्णालयामध्ये मोफत उपचारांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**(७) प्रकाशने शाखा :** प्रकाशने शाखेमार्फत मराठी, हिंदी, गुजराती व उर्दू भाषेत लोकराज्य, इंग्रजी भाषेत महाराष्ट्र अहेड व आपले मंत्रालय ही मासिके आणि अन्य नैमितिक प्रकाशने प्रसिद्ध केली जातात. लोकराज्य हे मासिक राज्यभर स्टॉलवर विक्रीसाठी उपलब्ध असून वाचकांना त्याचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. लोकराज्य हे मासिक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या www.dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच मागील ६० वर्षांपासूनचे लोकराज्य अंक या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. लोकराज्य, महाराष्ट्र अहेडसाठी ॲपचीही निर्मिती करण्यात आली आहे.

**(८) प्रदर्शने शाखा :** प्रदर्शने शाखेमार्फत विविध विकास कामांवर आधारित प्रदर्शन संच तयार करून प्रदर्शनांचे आयोजन राज्यभर अनेक ठिकाणी करण्यात येते. राज्यभरातील होर्डिंग्जवर विकास कामांवर आधारित आकर्षक मजकूर नियमितपणे प्रसिद्ध केला जातो. तसेच २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट या राष्ट्रीय दिनांच्यानिमित्त जाहिरातींच्या संकल्पना तयार करण्याव्यतिरिक्त शासनाच्या विविध योजनांच्या जाहिरातींच्या संकल्पना या शाखेमार्फत तयार करून देण्यात येतात.

शासनातर्फे जिल्हा, विभागीय, राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनाचे आयोजन करण्यासाठी त्याचप्रमाणे अशा स्वरूपाच्या प्रदर्शनातून राज्य शासनाच्या वतीने सहभागी होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ही शासनाची केंद्र संस्था मानण्यात आली आहे. भारतात भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय पातळीच्या प्रदर्शनातून राज्य शासनाच्यावतीने सहभागी होण्याचे कार्यदेखील माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे सोपविण्यात आले आहे.

**(९) अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई :** मुद्रणालय व पुस्तक नोंदणी अधिनियम, १८६७ व त्याखालील नियम यांची अंमलबजावणी हे या कार्यालयाचे मुख्य काम होय. या कार्यालयात आलेल्या वृत्तपत्रांची, नियतकालिकांची नोंदणी करणे, त्यातील मजकुराची छाननी करणे व वृत्तपत्रांची वार्षिक सूची तयार करणे, तसेच पुस्तकाचे वर्गीकरण करून तिमाही सूची छापून प्रसिद्ध करणे आदी कामे या अधिनियमाखाली पार पाडली जातात. तसेच शासनमान्य यादीवर समावेश होण्यासाठी वृत्तपत्रांच्या खपाच्या पडताळणीचे काम केले जाते.

**(१०) साधन-सामग्री :**

माहितीच्या प्रसारणाच्या दृष्टीने महा-संचालनालयाकडे अद्ययावत अशी यंत्रणा उपलब्ध आहे. महाराष्ट्राबरोबरच दिल्ली आणि गोवा येथील कार्यालयेही ई-मेल/इंटरनेटद्वारे जोडण्यात आली असून दैनंदिन स्वरूपाचे कामकाज संगणकाद्वारे केले जाते.

सर्व कार्यालयांकडे अत्याधुनिक स्वरूपाचे संगणक, लॅपटॉप, प्रिंटर आणि स्कॅनरसारखी यंत्रणा उपलब्ध आहे. आवश्यक तेव्हा अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधण्याच्या दृष्टीने Video Conferencing ची सुविधाही उपलब्ध आहे. विविध समारंभांचे चित्रीकरण करता यावे यासाठी सर्व जिल्ह्यांत डिजिटल कॅमेरे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महासंचालनालयाच्या www.mahasamvad.gov.in आणि http://dgipr.maharashtra.gov.in या दोन वेबसाईट कार्यरत आहेत.

या व्यतिरिक्त महासंचालनालयाचे दैनंदिन काम सुरळीतरित्या चालण्यासाठी आस्थापना शाखा, लेखा शाखा इ. शाखा कार्यरत आहेत.

## (११) वित्तीय आवश्यकता

## (xi) Financial Requirements

## (११) वित्तीय आवश्यकता

## (xi) Financial Requirement

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. | (अ) कार्याचे वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | *A—Activity Classification* |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (1) |
| १ | संचालन व प्रशासन .. | 896131 | 560062 | 695220 | 588023 | (1) Direction and Administration |
| २ | जाहिरात व दृकप्रसिद्धी .. | 2499742 | 5237053 | 3696229 | 5486914 | (2) Advertising and Visual Publicity |
| ३ | क्षेत्र प्रसिद्धी .. | 11638 | 17082 | 16113 | 16971 | (3) Field Publicity |
| ४ | माहिती केंद्रे .. | 38554 | 161797 | 124241 | 168502 | (4) Information Centers |
| ५ | चित्रपटांची निर्मिती .. | 65043 | 89252 | 74877 | 94174 | (5) Production of Films |
| ६ | इतर खर्च .. | 221498 | 304615 | 281406 | 333976 | (6) Other Expenditure |
| ७ | छायाचित्रण सेवा .. | 9659 | 50000 | 40000 | 100000 | (7) Photo Service |
| ८ | प्रकाशने .. | 9924 | 17036 | 16092 | 18856 | (8) Publications |
| ९ | सामुहिक रेडिओ व दूरदर्शन .. | 925 | 3619 | 2596 | 3613 | (9) Community Radio and Television |
| | **एकूण (अ)** .. | **3753114** | **6440516** | **4946774** | **6811029** | **Total— (A)** |
| | (ब) वित्त व्यवस्थेतील साधने— | | | | | (B) Sources of Finance– |
| | मागणी क्र. प्रधानशीर्ष | | | | | Demand No. Major Head |
| | ए-६ २२२० .. | 3753114 | 6440516 | 4946774 | 6811029 | A—6 2220 |
| | **एकूण (ब)** .. | **3753114** | **6440516** | **4946774** | **6811029** | **Total— (B)** |

# लेखाशीर्ष

# Budget Head

**(रुपये हजारात/Rs. in thousand)**

| अ.क्र. | लेखाशीर्ष | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | | *A—Activity Classification* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | | (1) |
| १ | ००१- संचालन व प्रशासन, (००)(०१) प्रसिद्धी संचालक भारित (२२२० ०३९३) | 0 | 150 | 150 | 150 | ... | 001-Direction & Administration (00) (01) Director of Publicity-Charged- (2220 0393) |
| २ | ०१-चित्रपट-००१-संचालन व प्रशासन (००)(०१) प्रसिद्धी संचालक (२२२० ००४३) | 896131 | 559912 | 695070 | 587873 | ... | 01-Films-001-Direction & Administration (00) (01) Director of Publicity-Voted- (2220 0043) |
| ३ | १०५-चित्रपट निर्मिती (००)(००)(०१) चित्रपटांची निर्मिती (२२२० ०३८४) | 65043 | 89252 | 74877 | 94174 | ... | 105-Production of Films (00)(00)(01) Production of Films (2220 0384) |
| ४ | ८००-इतर (००)(००)(०१) जिल्हा माहिती कार्यालयांची आस्थापना (२२२० ००२५) | 221498 | 304615 | 281406 | 333976 | ... | 800-Other Expenditure (00)(00)(01) Establishment of District Information Offices (2220 0025) |
| ५ | ६०-इतर १०१-जाहिरात व दृकप्रसिद्धी (००)(००)(०१) पंचवार्षिक योजनेची प्रसिद्धी योजना (२२२० ००५२) | 14315 | 25353 | 24039 | 28114 | ... | 60-Other 101-Advertising and Visual Publicity (00)(00)(01) Scheme for the Publicity of the Five-Year-Plan (2220 0052) |
| ६ | ६० इतर, १०१ जाहिरात व दृकप्रसिद्धी (००)(०२) जाहिरात फलक लावणे (२२२० १०९५) | 0 | 800000 | 560000 | 1000000 | ... | 60-Other-101-Advertising and Visual Publicity (00)(02) Erecting Hordings (2220 1095) |
| ७ | ६० इतर, १०१ जाहिरात व दृकप्रसिद्धी (००)(०३) शासकीय योजनांची विशेष प्रसिद्धी मोहिम (२२२० ११७५) | 2485427 | 4411700 | 3112190 | 4458800 | ... | 60-Other-101-Advertising and Visual Publicity (00)(03) Special Publicity Campaign of Govt. Scheme (2220 1175) |
| ८ | १०२-माहिती केंद्र, (००)(००)(०१) माहिती केंद्रांची आस्थापना (२२२० ००६१) | 32149 | 53497 | 37601 | 58502 | ... | 102-Information Centre (00)(00)(01) Establishment of information Centre (2220 0061) |
| ९ | १०२ माहिती केंद्रे, (००)(०२) महाराष्ट्र माहिती केंद्र, नवी दिल्ली यांचे बळकटीकरण (२२२० १०४१) | 6405 | 5800 | 4640 | 10000 | ... | 102-Information Centre (00)(02) Strengthaning of Maharashtra Information Centre, New Delhi (2220 1041) |
| १० | १०२-माहिती केंद्रे, (००)(०३) माध्यम संनियंत्रण केंद्र (२२२० १०३२) | 0 | 102500 | 82000 | 100000 | ... | 102-Information Centre (00)(03) Media Monitoring Center (2220 1032) |

(रुपये हजारात/Rs. in thousand)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | प्रत्यक्ष खर्च सन २०२४-२०२५ Actuals Expenditure 2024-2025 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२०२६ Budget Estimates 2025-2026 | सुधारित अंदाज सन २०२५-२०२६ Revised Estimates 2025-2026 | अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२६-२०२७ Budget Estimates 2026-2027 | | *A—Activity Classification* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | | (1) |
| ११ | १०६-क्षेत्र प्रसिद्धी (००)(००)(०१) प्रदर्शन पथकाची योजना (२२२० ००७२) | 11638 | 17082 | 16113 | 16971 | ... | 106-Field Publicity (00)(00)(01) Scheme for Exhibition Unit (2220 0072) |
| १२ | १०९-छायाचित्र सेवा (००)(००)(०१) छायाचित्र सेवा (२२२० ०४१९) | 9659 | 50000 | 40000 | 100000 | ... | 109-Photo Service (00)(00)(01) Photo Services (2220 0419) |
| १३ | ११०-प्रकाशने (००)(००)(०३) अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने (२२२० ०१२३) | 9924 | 17036 | 16092 | 18856 | ... | 110-Publication (00)(00)(03) Examiner of Books & Publications (2220 0123) |
| १४ | १११-साहूहिक रेडिओ व दूरचित्रवाणी (०२)(०१) छायाचित्र सेवा (२२२० ०२०३) | 925 | 3619 | 2596 | 3613 | ... | 111-Community Radio & Television (02)(01) Photo Services (2220 0203) |
| | **एकूण . .** | **3753114** | **6440516** | **4946774** | **6811029** | **...** | **Total** |



(शा.म.मु.) एच १६७१-१८ (५०—३-२०२६)

## कर्मचारीविषयक गोषवारा Personnel Summary

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

## Directorate General of Information and Public Relations

### विवरणपत्र-१

### राजपत्रित—गट "अ" (वर्ग-१)

| क्रमांक Sr. No. (1) | पदनाम Designation (2) | वेतन स्तर (3) | पद संख्या No. of Post (4) | Designation (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | महासंचालक .. | संवर्ग पद .. | 1 | Director General |
| 2 | संचालक (माहिती) (प्रशासन, वृत व जनसंपर्क, नागपूर-अमरावती विभाग, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली) .. | S-25 : 78800-209200 .. | 4 | Director (Information) (Admn. News & public Relations Nagpur-Amravati Division, Marathwada Division Chatrapati Sambhajinagar) |
| 3 | उप संचालक (लेखा) .. | S-23 : 67700-208700 .. | 1 | Deputy Director (Accounts) |
| 4 | उप संचालक (प्रदर्शने) .. | S-23 : 67700-208700 .. | 1 | Deputy Director (Exhibitions) |
| 5 | उप संचालक (माहिती) मुख्यालय मुंबई (वृत्त, प्रकाशने, प्रशासन), उप संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय नाशिक, पुणे, कोकण भवन, कोल्हापूर, अमरावती, लातूर, छत्रपती संभाजीनगर) .. | S-23 : 67700-208700 .. | 10 | Deputy Director (Information) |
| 6 | संशोधन अधिकारी .. | S-18 : 49100-155800 .. | 1 | Research Officer |
| 7 | जिल्हा माहिती अधिकारी (३४ पदे)/जनसंपर्क अधिकारी (१पद)/ वरिष्ठ उपसंपादक (५ पदे)/वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) ९ पदे) .. | S-20 : 56100-177500 .. | 49 | District Information Officer. P. R. O. (Delhi), Senior Sub Editor, Senior Assistant Director (Information) |
| 8 | वरिष्ठ सहायक संचालक (प्रशासन) .. | S-18 : 49100-155800 .. | 2 | Senior Assistant Director (Admin) |
| | | **एकूण पदे** .. | **69** | |

**कर्मचारीविषयक गोषवारा**/Personnel Summary

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई**

Directorate General of Information and Public Relations

**विवरणपत्र-२**

**राजपत्रित—गट "ब" (वर्ग-२)**

| क्रमांक Sr. No. (1) | पदनाम Designation (2) | वेतनस्तर (3) | पद संख्या No. of Post (4) | Designation (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | स्वीय सहायक | S-16 : 44900-142400 | 1 | Personal Assistant. |
| 2 | ग्रंथपाल, मुंबई | S-15 : 41800-132300 | 1 | Librarian |
| 3 | सहायक संचालक (प्रशासन) | S-15 : 41800-132300 | 4 | Assistant Director (Admn.) |
| 4 | सहायक संचालक (माहिती) (३१ पदे), माहिती अधिकारी (२३ पदे), अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशे, मुंबई (१ पद) | S-17 : 47600-151100 | 55 | Assistant Director (Information), Information Officer, Examinar, Books and Publication Mumbai. |
| 5 | लेखाधिकारी | S-15 : 41800-1,32300 | 2 | Accounts Officer |
| | | **एकूण पदे . .** | **63** | |

**कर्मचारीविषयक गोषवारा**/Personnel Summary

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई**

Directorate General of Information and Public Relations

**विवरणपत्र-३**

**अराजपत्रित—गट "क" (वर्ग-३)**

| क्रमांक Sr. No. (1) | पदनाम Designation (2) | वेतनस्तर (3) | पद संख्या No. of Post (4) | Designation (2) |
|---|---|---|---|---|
| 1 | लघुलेखक (उच्च श्रेणी) . . | S-16 : 44900-142400 . . | 4 | Stenographer (H. G.) |
| 2 | दूरचित्रवाणी छायाचित्रकार . . | S-17 : 47600-151100 . . | 22 | T. V. Cameraman |
| 3 | दूरदर्शन चित्र संपादक . . | S-15 : 41800-132300 . . | 1 | T. V. Film Editor |
| 4 | सहायक लेखाधिकारी . . | S-15 : 41800-132300 . . | 4 | Assistant Account Officer |
| 5 | तांत्रिक सहायक . . | S-15 : 41800-132300 . . | 6 | Technical Assistant |
| 6 | अधीक्षक . . | S-14 : 38600-122800 . . | 9 | Superintendent |
| 7 | उप ग्रंथपाल . . | S-14 :38600-122800 . . | 1 | Dy. Librarian |
| 8 | उप संपादक . . | S-16 : 44900-142400 . . | 76 | Sub Editor |
| 9 | लघुलेखक (निम्न श्रेणी) . . | S-15: 41800-132300 . . | 15 | Stenographer (L. G.) |
| 10 | सहायक अधीक्षक . . | S-13 : 35400-112400 . . | 28 | Assistant Superintendent |
| 11 | प्रदर्शन सहायक . . | S-13 :35400-112400 . . | 7 | Exhibition Assistant |
| 12 | ग्रंथपाल-नि-संदर्भ सुची सहायक . . . | S-10: 29200-92300 . . | 2 | Librarian *cum* Reference Assistant |
| 13 | छायाचित्रकार . . | S-12 : 32,000-101600 . . | 14 | Photographer |
| 14 | चित्रकार . . | S-10 : 29200-92300 . . | 3 | Artist |
| 15 | प्रतिवेदक . . | S-12 : 32000-101600 . . | 19 | Translater |
| 16 | सहायक दूरचित्रवाणी छायाचित्रकार . . | S-10 : 29200-92300 . . | 7 | Assistant T. V. Cameraman |
| 17 | वरिष्ठ लिपिक . . | S-8 : 25500-81100 . . | 113 | Senior Clerk |
| 18 | लघुटंकलेखक . . | S-8 : 25500-81100 . . | 2 | Steno Typist |
| 19 | सहायक दूरचित्रवाणी चित्र संकलक . . | S-10 : 29200-92300 . . | 2 | Assistant Film Compiler |
| 20 | वरिष्ठ यांत्रिक . . . . | S-8 : 25500-81100 . . | 1 | Senior Technician |
| 21 | ग्रंथपाल . . | S-7: 21700-69100 . . | 1 | Librarian (EBP) |
| 22 | सहायक ग्रंथपाल . . | S-7: 21700-69100 . . | 6 | Assistant Librarian |
| 23 | उप दृकश्राव्य संकलक . . | S-7: 21700-69100 . . | 1 | Sub Audio Visual Compiler |

| क्रमांक Sr. No. (1) | पदनाम Designation (2) | वेतनस्तर (3) | पद संख्या No. of Post (4) | Designation (2) |
|---|---|---|---|---|
| 24 | कॉलिग्राफिस्ट . . | S-7: 21700-69100 . . | 1 | Caligraphist |
| 25 | सहायक छायाचित्रकार . . | S-8: 25500-81100 . . | 25 | Assistant Photographer |
| 26 | वाहनचालक-नि-पर्यवेक्षक . . | S-7: 21700-69100 . . | 2 | Driver-*cum*-Supervisor |
| 27 | लिपिक-टंकलेखक . . | S-6: 19900-63200 . . | 156 | Clerk -Typist |
| 28 | वाहनचालक . . | S-6: 19900-63200 . . | 91 | Driver |
| 29 | स्वागतकार (छत्रपती संभाजीनगर) . . | S-6: 19900-63200 . . | 1 | Receptionist (Chatrapatti Sambhajinagar) |
| 30 | दृकश्राव्य सहायक . . | S-6: 19900-63200 . . | 1 | Audio Visual Assistant |
| 31 | पत्तायंत्रचालक . . | S-6: 19900-63200 . . | 8 | Bradma Operator |
| 32 | जावकपत्रस्वार . . | S-5: 18000-56900 . . | 6 | Despatch Letter Rider |
| 33 | कॅमेरा सहायक | S-3 16600-52400 . . | 16 | Camera Attendent |
| | | **एकूण पदे** . . | **651** | |

**कर्मचारीविषयक गोषवारा**/Personnel Summary

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई**

Directorate General of Information and Public Relations

**विवरणपत्र-४**

**अराजपत्रित—गट "ड" (वर्ग-४)**

| क्रमांक Sr. No. | पदनाम Designation | वेतनस्तर | पद संख्या | Designation |
|---|---|---|---|---|
| 1 | मुकादम | S-5: 18000-56900 | 1 | Mukadam |
| 2 | दप्तरी | S-3: 16600-52400 | 60 | Daftary |
| 3 | शिपाई | S-3: 15000-47600 | 150 | Peon |
| | | **एकूण पदे . .** | **211** | **Total** |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई
विवरणपत्र-१ ते ४ (अ, ब, क व ड) चा गोषवारा

| अ.क्र. | संवर्ग | पदसंख्या | अधिसंख्या पदे |
|---|---|---|---|
| 1 | राजपत्रित "अ" | 69 | 1 |
| 2 | राजपत्रित "ब" | 63 | 0 |
| 3 | अराजपत्रित "क" | 651 | 6 |
| 4 | अराजपत्रित "ड" | 211 | 2 |
| | एकूण . . | **994** | **9** |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.